म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५४८९
१९९०

# शशिकला

(खंड काव्य)

★

कै. वसंतराव बल्लाळ

REFBK-0011267
REFBK-0011267

प्रभा प्रकाशन
नागपूर

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

# शशिकला

(खंडकाव्य)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ

अनुक्रम ... वि:

क्रमांक ... नों दि:

-: कवि :-

कै. वसंतराव बल्लाळ

: संपादिका :

प्रभा बल्लाळ

REFBK 0011267

REFBK-0011267

प्रभा प्रकाशन

३४४ वामन लेन, सीताबर्डी, नागपूर

प्रकाशक–

**प्रभा प्रकाशन**

३४४ वामम लेन,
सीताबर्डी, नागपूर १

प्रथमावृत्ती १९६०

सर्व हक्क–

**प्रभा बल्लाळ यांचेकडे**

मुद्रकः–

**सुधाकर मोगलेवार**

महेश मुद्रणालय, सीताबर्डी, नागपूर

# चार शब्द

कै. वसन्तराव बल्लाळ यांच्या 'स्नेहदीप' या स्फुट कवितांच्या संग्रहास माझी प्रस्तावना आहे. आज त्यांच्या 'शशिकला' या कथात्मक खंडकाव्यास पुन्हा मीच 'चार शब्द' प्रस्तावनेदाखल लिहीत आहे. वस्तुत: वसन्तराव यांचा व माझा स्नेहसंबंध तर राहोच, परंतु साधी ओळख पाळख देखील नव्हती. येवढेंच नव्हे, तर आम्ही परस्परांना पाहिलेंहि नव्हते. असें असून सुद्धां मी या खंडकाव्यास हें 'चार शब्द' लिहीत आहे, याचें कारण त्यांच्या पत्नी व माझ्या भगिनी श्रीमती प्रभाताई बल्लाळ यांची इच्छा होय. त्यांना ही इच्छा व्हावी यांत माझा वसन्तरावांशीं पूर्वजन्मींचा कांही तरी ऋणानुबंध असावा अशी माझी दृढ भावना आहे. प्रस्तावनालेखन हा माझा अधिकार नाहीं हें मी जाणतों; परंतु मी भावनाविवश आहे. तेव्हां माझ्या अनिवार्य धृष्टतेबद्दल महाराष्ट्रीय रसिक मला क्षमा करतील अशी माझी अपेक्षा आहे.

वसन्तरावांचें प्रस्तुत कथात्मक खंडकाव्य हें सामाजिक सुधारणेचें पक्षपाती आहे. मात्र समाज-सुधारणा हें काव्याचें उद्दिष्ट असलें, तरी त्याच्या रसात्मकतेला ढळ लागूं नये म्हणून कवींनीं भावनांवर

यथास्थित भर देण्याची दक्षता घेतली आहे. त्यामुळें हें कथाकाव्य आदीपासून अन्तापर्यन्त प्रवाही उतरलें आहे.

या कथाकाव्यांतील कथानक थोडक्यांत असें आहे;--

भाऊजी या नांवाचे एक जुन्यापुराण्या रीतीभातींचे व परंपरागत संस्कृतीचे वृद्ध गृहस्थ होते त्यांना शशिकला या नांवाची नव्या आचाराविचारांची कन्या व सुशीला या नांवाची दुर्दैवी विधवा सून होती. शशिकलेचें प्रेम तिच्यासारख्याच आचाराविचारानें सुधारणावादी असलेल्या राजीव या नांवाच्या एक सुंदर, शालीन व सुशिक्षित तरुणावर होते. मात्र हा तरुण निर्धन होता व त्याला आई शिवाय दुसरें मायेचें माणूस नव्हतें. 'राजीव जीवनीं राहिन मी आजीव' अशी शशिकलेची आकांक्षा होती. परंतु तिनें 'जीवन' या नांवाच्या एका जीर्णमतवादी तरुणाशीं विवाहाबद्ध व्हावें अशी तिच्या वडिलांची इच्छा होती जीवन हा दिसावयास साधा भोळा असला तरी दुराचारी होता स्त्रियांच्या शीलांची शिकार हा त्याचा आवडता विषय होता. दुर्दैवी विधवा सुशीला ही त्याच्या गोड गोड थापास भुलते व त्याच्या जाळ्यांत फसते. तिच्यावर कठिण प्रसंग ओढवतांच जीवन तिचा त्याग

करतो. जीवनाच्या या दुराचाराची माहिती सुशीला व शशिकला या उभयतां स्त्रीस्वभावसुलभ संकोचामुळें भाऊंना देऊं शकत नाहीत. त्यांना निरपराध राजीवाचाच संशय येतो. परंतु पुढें जीवन तोच प्रयोग शशिकलेवर करण्याचा प्रयत्न करतो. त्यांत तो फसतो. व त्याचें बिंग बाहेर फुटतें. त्यामुळें भाऊंचें राजीवाविषयींचे मत बदलते व ते सुधारणेस अनुकूल होतात. या मुख्य कथासूत्राला बळकट करण्यासाठी कवींनीं त्याच्या भोंवतीं अनेक पदरांची सुसंघटित व कलात्मक गुंफण केली आहे. ती सर्व उकलणें अप्रस्तुत होईल.

काव्याचें हें कथासूत्र साधें व सरळ आहे. आणि त्यांत निरनिराळ्या प्रसंगाची भर पडल्यामुळें काव्य हृदयंगम झालें आहे हें खरें. परंतु जीर्णमतवादी दुराचारी असतात व नवमतवादी सदाचारी असतात असा या काव्यांतून जो अस्पष्ट ध्वनी उमटतो तो मात्र विवाद्य आहे. सदाचार किंवा दुराचार हा कोणत्याहि मतवादावर अवलंबून नाहीं. तो व्यक्तिगत असतो. तेव्हां या काव्याच्या सुधारणावादाच्या समर्थनांतील हा धागा फारसा मजबूत नाहीं हें कबूल केलें पाहिजे.

हें येवढें एक वैगुण्य सोडलें, तर या कथा-

काव्यांतील प्रसंग मनोवेधक आहेत. कवीनीं ते रंगवतांना कधीं त्यांना मनांतील स्मृतितरंगांत गोंविले आहे, तर कधीं त्यांना साध्यासुध्या वर्णनांत ओंवलें आहे. कथेची नायिका शशिकला हिची कथानायक राजीव याच्याशीं पहिली भेट होते. त्याप्रसंगाची तिची आठवण अशी आहे,–

तोंच एक गुलाबाचें दिसलें सुम गोडसें
तोडाया चित्त त्यावेळीं आपुलें जाहलें पिसें
गेलों धावून तोडाया फूल तें मग आपण
फांदी तोच परी कैशी अकस्मात् जात वाकुन

केला हात पुढें कांटे बोचलेत तया किती
'राजीव' म्हणुनी गेलों ओरडून तदाच ती–
राजीव नयना मूर्ति आली बाई पुढें कशी
हातीं फूल नि कांटाही मौज ही घडली अशी

येउनी बोलते ते कीं, "हवें कां फूल हें तुला ?"
गोंधळे चित्त छे ! बाई, वाटे लाज मनीं मला !
"कांटा कां बोचला आहे ?" आले जवळते जरा
"कांटयानें काढणें कांटा न्याय हाच दिसे बरा"

त्यांचा हसुनिया केला दूर जों कर आपण
तयाचा बोचला कांटा त्यांच्या गालावरी पण,

आणि कवीनें सकाळचें वर्णन करतां करतां

हळूच समाजांतील अप्रशस्त नवीन तऱ्हांना चिमटा काढला आहे त्याची ही वानगी अशी आहे,–

उषेच्या अनुरागाचें प्रतिबिंब दिशेवरी
पडलें, रक्तिमा गालीं विलसे रूपसुन्दरी
रक्तिमा बघुनी भानु स्वयें आरक्त जाहला
नभांत अनुरागाचा पूर कीं वाहुं लागला

उठल्या वनिता कामें कराया मग लागती
सडासंमार्जनें त्यांची प्रातःकाळांत चालती
कांडतां कंकणाचा हा मधून उठतो ध्वनी
मुसळाची तया साथ पखवाजच वाजवी

शिक्षितांच्या घरांमध्ये अजून निजती मुली
अभ्यास करूनी रात्रीं आहेत थकल्या मुळीं
उशीरां पातल्या कोणी चित्रपट बघोनिया
निद्रा न उघडे त्यांची सूर्योदय जसे तयां !

या काव्यांत सर्वत्र अशा प्रकारचें मतप्रदर्शन कथेच्या ओघांत सहजासहजीं झाल्यामुळें हें काव्य रुचकर झालें आहे. या मतप्रदर्शनांत प्रामुख्यानें वस्तुस्थिति उघड झाली आहे यादृष्टीनें 'स्त्री हृदयाची रीति' हें संपूर्ण प्रकरण वाचनीय आहे,–

चूल, मूल हीं दोनच तिजला कर्तव्यें ठरती
स्वातंत्र्याची याविण तिजला नाहीं खिजगणती

जुनाट असल्या बुरसटलेल्या एकांगी कोत्या
स्त्री हृदयाच्या विषयिं नराच्या कल्पनाच होत्या

परंतु शिक्षण आज तयांना नवें मिळूं लागे
पुरुषांचे ते तुटूं लागती जुलुमाचे धागे

समाजकारणिं, धर्मकारणीं, राजकारणांत
स्त्रीचा फिरतो जातीनें मग स्वैरपणें हात

मुळींच पुरुषांपेक्षां नाहीं कमतरता अंगीं
सिद्ध करूनी दाखविलें हें अमुच्या ललनांनीं

कलेच्या दृष्टीने पाहिलें तर कवींनीं प्रस्तुत काव्यांतील व्यक्तिरेखा त्यांचा स्वभाव व्यक्त होईल अशा कौशल्यानें रेखाटल्या आहेत. या काव्याचा खल-नायक जीवन हा दुराचारी होता हें सुचविण्यासाठीं कवींनी त्याचें वर्णन केलें आहे तें असें,–

तिरवें पाहणें त्याचें चष्म्यांतून भिरीभिरी
पाहुनीं पातलें हास्य प्रयत्नेंच करी दुरीं
फुगवी मधुनी किंचित् वृथा नाकपुडीस तो
जाड ओठ तदा त्याचा क्रूरतेसच दावितो

केसांना तेल लावूनी बसवी चोपुनी किती
वास घाण सुटे त्याचा, लावी नाका रुमाल ती
वेष उंची तयाचा तो सुटबूट दिसे उनी
तिच्या आलें मनीं यानें आणिला काय चोरुनी ?

या काव्याच्या ओघांत कवींनीं जेथें जेथें संधि सापडेल तेथें तेथें प्रतिष्ठित ग्रंथकार व त्याचे ग्रंथ यांचे संदर्भ आणले आहेत. त्यामुळें या काव्यास एक प्रकारचें अभिजात स्वरूप प्राप्त झालें आहे,–

ध्येयवेडे जगीं सारे फसती दीन नाहक
खाण्डेकरांचे सगळे अपवादच नायक

किंवा,

किंवा हेंच खरे, वदे गडकरी 'कोडें गुलाबी' जया–
त्याचें तें सुटणें अशक्य, हृदया कांटेच यावे जया

कै बल्लाळ यांच्या कवित्वाचा एक विशेष म्हणजे त्यांचें वृत्तरचनेवरलें असाधारण प्रभुत्त्व होय. प्रस्तुत काव्यांतील प्रत्येक प्रकरणाला त्यांनीं स्वतंत्र वृत्त योजलें आहे. आणि त्याचें सारखें वाचन कंटाळवाणें वाटूं नये म्हणून मधून मधून 'गीतें' घातलीं आहे. त्यांचा 'अनुष्टुभ' वाचतांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या 'कमला' काव्याची अगदीं सहजगत्या आठवण होतें. कदाचित् तें काव्य बल्लाळाचें आवडतें असावें. बल्लाळांची भाषा संस्कृतप्रचुर असली, तरी सुंदर व सहजगम्य आहे. त्यांच्या शब्दांत प्रसंगानुसार कमलाहून कोमल अथवा कुलिशाहून कठोर होण्याचें सामर्थ्य आहे. बल्लाळांच्या अभिव्यक्तींत विचार व वाणी यांचा चारु संगम आहे. त्यामुळें त्यांचें हें कथाकाव्य

एकंदरीत हृदयंगम आहे.

या काव्यांत विद्युल्लतेच्या स्फुरणाप्रमाणें मधून मधून तात्त्विक विचारांवर आधारलेल्या कल्पना आल्या आहेत. त्या सहृदयाच्या अंतःकरणास स्पर्श केल्या-खेरीज राहात नाहींत. शशिकलेनें जीवनाशींच विवाहबद्ध व्हावे असा जेव्हां भाऊ आग्रह करतात, तेव्हां निराश झालेला राजीव वणवण करीत वनांत निघून जातो. प्रेम हें व्यर्थ आहे असें त्याला वाटूं लागते. तेव्हां तो म्हणतो,—

प्रेमाचे रबरी फुगे फुगवुनी काठीवरी नाचवा
नाचा स्वैर, तयां खुशाल मिरवा, रंगांत त्या दग व्हा !

ठेवा मानस शुद्ध, भाव असुं द्या कीं तो फुगा प्रीतिचा
कांटा अल्पहि बोचतांच फुटुनी नाशास तो जायचा !

आजच्या युगांत मराठी साहित्यांत कथाकाव्याचा जवळ जवळ लोप झाला आहे कथाकाव्याची रचना करणें म्हणजे एकादा जरतारीचा पट विणण्यासारखें आहे. त्यासाठीं अंगीं भरपूर मगदूर हवा. ती रचना करतांना दमछाकी होऊन चालणार नाहीं. कै. वसन्तराव बल्लाळ याच्या ठिकाणीं अशा तऱ्हेचें प्रचंड काव्य लिहिण्याची भरपूर शक्ति होती त्यांच्या 'शशिकला' या काव्यानें मराठी साहित्यांत एका

मूल्यवान व महनीय कथाकाव्याची भर पडली आहे. त्याचें प्रकाशन पाहण्यास ते विद्यमान नाहींत याचें वाईट वाटतें. परंतु त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी रसिक महाराष्ट्राला ही त्यांची कलाकृती अर्पण करीत आहेत हें पाहून मात्र त्यांच्या आत्म्यास अवश्य समाधान होत असावें !

श्रीधर सदन,

श्रद्धानंद नगर, -- **भवानीशंकर पंडित**

दक्षिण अंबाझरी मार्ग नागपूर–अजनी

गुरुवार दि. १५–१२–१९६०

# पुरस्कार

आधुनिक मराठी काव्याच्या विकासात, 'रवि-किरण-मंडळा'च्या कार्याला काही एक विशेष स्थान आहे. खंडकाव्याच्या निर्मितीकडे या मंडळाने साक्षेपाने लक्ष पुरविले होते. त्यांच्या काव्यांनी प्रभावित झालेल्या अनेक तरुण कवींनी त्या कालावधीत खंडकाव्ये लिहिली. कै. वसंतराव बल्लाळ हे त्यापैकी एक होत. भावगीतांच्या रचनेपेक्षा खंडकाव्यांच्या रचनेला प्रतिभेची झेप व तणावा अधिक असावा लागतो. केवळ एखाद्या उत्कट भावनेचा आविष्कार हे भावगीताचे वैशिष्टय मानले तर विविध भावनांच्या क्रिया प्रतिक्रियांनी निर्माण झालेल्या जीवनाचे दर्शन हे खंडकाव्याचे वैशिष्टय म्हणून सांगता येईल. सामाजिक व्यक्तिजीवनाशी तद्रूप होऊन त्याच्या मुळाशी असलेल्या मानवी मनोव्यापारांचे निरीक्षण करणे व त्यांचा काव्यात्मक आविष्कार घडविणे कवीला आवश्यक असते. त्यासाठी त्याच्या दृष्टीची झेप विशाल असावी लागते भावकवि हा सामान्यतः आपल्याच जीवनाच्या कमल कोषात अडकलेला असतो तर खंडकाव्याचा निर्माता कवि आपल्याप्रमाणेच इतरांच्या जीवनाशीहि समरस आढळतो. त्याचे विश्व त्याची रसिकता, त्याची सहानुभूति अधिक व्यापक

असते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 39548 वि: ...
क्रमांक 9576 नों: दि: ...

श्री वसंतराव बल्लाळ यांच्या प्रस्तुत खंडकाव्यांत या गुणाचा आविष्कार फार चांगल्या रीतीने झालेला आढळून येईल. खंडकाव्याचा निर्झर हा सामान्यत: एखाद्या कथेच्या सारणीतून वाहतो. शशिकला आणि राजीव या प्रेमिकांचे भावजीवन ही या खंडकाव्याच्या कथेची मुख्य सारणी होय. शशिकला व राजाव यांच्या प्रमाणेच भाऊ, सुशीला, जीवन, इत्यादिकांच्या आयुष्याचे लहान प्रवाहसुद्धा याच सारणीतून वाहतात. त्यांच्या भावनांचे लहानमोठे तरंग बल्लाळांनी प्रसंगोचित उत्कटतेने वर्णिलेले आहेत. पार्श्वभूमीदाखल आलेल्या सर्वसाधारण समाजजीवनाची दृश्येंहि त्यांनी काव्यात्मकतेने चितारलेली आहेत. रचनेसाठी निरनिराळ्या छंदांचा उपयोग केलेला असल्यामुळे एरवी खंडकाव्यात आढळणाऱ्या कंटाळवाण्या तोचतोपणाच्या दोषापासून प्रस्तुत काव्य अलिप्त आहे. भिन्न छंदांच्या व आवश्यक त्या उत्कट प्रसंगी भावगीतांच्या योजनेत कवीची दिसून येणारी योजक मार्मिकता कुणाच्याहि स्तुतीला पात्र ठरेल या विषयी शंका नाही.

कै. बल्लाळ यांनी लिहून ठेवलेले हे खंडकाव्य त्यांच्या निष्ठावंत पत्नी श्रीमती प्रभाताई बल्लाळ यांच्या प्रयत्नांनी आज प्रसिद्ध होत आहे. श्री बल्लाळ

हे मॉरिस कॉलेजचे एक बुद्धिमान् विद्यार्थी होते. आपल्या काळात त्यांनी या कॉलेजमधील सुप्रसिद्ध 'शारदा-मंडळा' वर चांगले प्रभुत्व गाजविले होते. तेथील वातावरणात यांच्या काव्यप्रतिभेचा विकास झाला. त्यावेळी त्यांनी भावगीते, खंडकाव्य, नाटक, स्फुट गद्य इत्यादि प्रकारची विपुल रचना केलेली आहे. त्यांतून या खंडकाव्याचे प्रकाशन त्यांच्या पत्नींनी हाती घेतले व ते नागपूर महाविद्यालयाच्या (मॉरिस कॉलेजच्या) अमृत महोत्सव प्रसंगी घडवून आणले याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व आभार मानतो. कै. बल्लाळ यांचे मित्र प्रा. कृ. व्यं पेशकार यांनी कवीची व त्याच्या या काव्याची ओळख करून दिल्यानंतर या महाविद्यालयाचे एक माजी विद्यार्थी व नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु न्यायमूर्ति श्री. ग व. बडकस यांनी या काव्याचे प्रकाशन केले. अमृत महोत्सव प्रसंगी श्रीमान् कुलगुरूंच्या हस्ते या काव्याच्या प्रकाशनाचा योग यावा हे मी मोठे भाग्य समजतो. आपल्या अभिजात गुणामुळे प्रस्तुत खंड-काव्य मराठी रसिकांच्या प्रेमाला व आदराला पात्र होईल अशी आशा व्यक्त करून पुरस्काराचे हे दोन शब्द आटोपतो.

वि· भि· कोलते

 ११२६५

" चित्तांतील विषण्णता विसरवी सन्मित्र जो मानवा
ज्याचा आश्रय सेवितांच मिळतो उत्साह त्यातें नवा
द्रव्याचें नच अन्य वा मिळतसें साहाय्य ज्याच्यामुळे
काव्यानन्द जसा तसा परि मना आनंद ज्याने मिळे १

जेथें गुंगतसे मति क्षणभरीं, त्याच्यासवें हांसतें
नाचे, खेळतसे, विशाल रमतें, आयुष्य आशाळतें
जेथे संचरतें चरांत अचलीं चैतन्य दिव्य स्वयें
जेथें थोर-लहान भेद करतां यत्नेंहि चित्ता नये २

पुष्पांचें फुलणें, दिशा उजळणें, गाणें खगांचें, दुणे-
चित्तांतील प्रसन्नता, परिसणें हें गीत शान्तस्वनें
जाणें सोडुनि ज्यास हेंच मुकणें एकत्वजीवीं-शिवीं
गुन्तोनी बसणें सुखासुखयुगी भारावणें या भवीं. ३

जेथें द्वैत नसे, नसेच लढणें—जेथें वसे शांतता
तीही शान्ति नसे स्मशानसदृशी—ती स्वर्गिची देवता !
लाभावा वर इच्छिती ऋषि जिचा, ज्यालागि योगार्चन
ती देवी वसते जिथें करुनिया स्वाराज्य तें पावन ४

वेदांचा अजुनी जिथें घुमतसे सूर प्रवाहामध्यें
धो धो धो करुनी अजूनि सरती जे स्रोत त्यांच्यामध्यें
तें हें निर्झरगीत मर्त्य हृदया जीवित्व देतें—असा
दुखांतें हरितो निसर्ग मनुजा सन्मित्र हा देवसा. ५

रे रे पावन ! पुण्यशील सखया ! आलों तुझ्या आश्रया
या दीना पदरांत घे झडकरी, अर्पी तुझी त्या दया.
माझें रक्षण या जगांत करणें दुष्प्राप्य देवादिका
देवाचें न कळे स्वरूप मजला—त्या दोष मी देउ कां ? ६

त्यायोगेंच अतां अकालिक असा संन्यास मी सेविला
आलो येथवरी तुझ्या पदतळीं कीं सौख्य लाभे मला.
सृष्टोचीं भरलीं अदृश्य सगळी तत्वें तुझ्या संग्रहीं
त्यांना दे उकलोनिया हळुहळू ज्ञेयत्व दे त्र्यत्यहीं ! ७

हो धांवे सरिता कशास्तव कुठें जाणार तां धांउनी
कां चाले नित हा प्रवाह पुढतीं कैसा तुला सोडूनी ?
बाई हे सरित ! कशास सरसी त्या दुर्जनाच्याकडे
ये ये ये परतोनि ये मजसवें बोलावयातें गडे ! ८

गिरिकुहरांतुनि कशास सरिते !
वाहतेस खळखळा
मैदानावर सन्थ असा हा
प्रवाह तव जाहला ९

प्रशान्त सुन्दर कान्त मनोहर
सोडुनि एकान्त
किलबिल गजबज नित्य जिथें हा
धरिसी कां प्रांत ? १०

निसर्ग मय हा रचितो सुन्दर
निसर्गमय भवनें
नगराजाच्या नगरावांचुनि
राज्यें यमभवने ! ११

वृक्षलतांविण गिरिकुहरांविण
उजाड मैदान
फुलेल कुटुनी केलें जरि तूं
जीवाचें रान १२

स्त्रीची धांव कुठें पतीविण दुजा जाणार ती आश्रया ?
सेवाशा पद तें पुढेंच सरते एकत्त्व लाभावया
प्रेमाचें भरतें म्हणून दुथडी वाहे नदी जीवनीं
प्रेमाचें भरतें म्हणून घर तें सोडून आलों वनीं ! १३

प्रेमाचें पडलें निबन्धन मला मी मोहिलों त्या मदें
प्रेमाचें नच हा ! अनीतिकर तें!' 'तें तोड' बुद्धी वदे
पूर्वी मी हंसलों अतां परि गमे सत्यार्थ आहे वच–
"धिक्तांच तंच मदनं च इमांचं मांच" १४

कोठें प्रेम तुझें अतां शशिकले ! कां तें असें आटलें ?
आटे जें हृदसें निदाधसमयीं तें प्रेम नोहे भलें
आलिंगोन निशीं प्रशान्त समयीं बागेंत जीं तूं मला
तीं गेलीं विरुनी दिलींस वचनें कीं नाद मेघांतला. १५

किंवा अर्थविहीन शब्द वदणें आहे स्वभावीं तुझ्या ?
स्वप्नीं जें बरळे निरर्थक वचां - ऐकोनि वाटे 'मजा.'
किंवा गोड मलाच स्वप्न पडलें ज्यामाजि मी पाहिलें–
कोणी प्रेम करीतसे शशिकला ! हा! स्वप्न तें भंगलें ! १६

किंवा कल्पित मी मनोहर अशी कादंबरी वाचतों
जेथें चित्रित नायिका शशिकला-मी नायकीं कल्पितों !
आतां तें विरलें कथानक फिकें झालें विवाहाविना
कीं मोठा वटवृक्ष फोलच गमे जो कीं फळांनी सुना ! १७

किंवा हेंच खरें, वदे गडकरी, 'कोडें गुलाबी' जया
त्याचें तें सुटणें अशक्य हृदया कांटेच यावे जया.
वाटे हा फुलला गुलाब हृदयीं उत्फुल्ल तो प्रीतिचा
हा हा ! कण्टक बोचुनी विव्हळला राजीव ह्या देहिचा ! १८

किंवा वामन हा अदृश्य कुठुनी कोरे महा हा बली
प्रेमाचा करुनी तयास सहजीं तो मागतो " रे बली !
दे भूमी मज तीन पादतल कीं पायास त्या ठेवुनी
प्रेमातें हृदयांतल्या बसविलें पाताळ–सिंहासनीं ! १९

प्रेमाचे रबरी फुगे फुगवुनी काठीवरी नाचवा
नाचा स्वैर तया खुशाल मिरवा रंगांत त्या दंग व्हा !
ठेवा मानस शुद्ध, भाव असुं द्या कीं तो फुगा प्रीतिचा
कांटा अल्पहि बोंचतांच फुटुनी नाशास तो जायचा ! २०

कां त्या आठवणी उगाच हृदयीं आतां मना काढिसी
प्रेमाचे फुटले फुगे मिळुनिया गेलेत ते वायुसीं !
गेली सोडुनि ती तुझी शशिकला आली अमावास ही
आतां किंच पुढें निसर्ग पसरे, तो पूर्णिमा दावि ही ! २१

रात्रंदीन युगायुगाहुनि उभा येथें पहा हा गिरी
त्यातें चंचलता नसेच हृदयीं. जा शान्तता–सागरीं !
येथें हे तुटलें कडे–कडकडे ही वीज आतां नभीं
स्फोटांनीं जगतांतल्या चमकतां आत्मा वदे, " तूं न भी." २२

या रानांतील ही गुहा इथुनिया गेहत्व पावे तुझी
या रानांतिल कन्दमूल अवघीं अन्नत्व होतीं तुझीं
या रानांतिल ही तुझी विलसते या प्रस्तरीं देवता
या रानांतिल पुष्प वाहुनि तिला अर्ची सुखानें अतां ! २३

आहे सौख्य कुठें परन्तु हृदयीं अन्धार चोहींकडे !
मानव्यांतुनि मी उठून वळलों या घोर रानाकडे '
गेलों मी पळुनी म्हणूनि जननी आक्रन्दुनी राहिली
पाप्याचाहि धरी न राग असली ती प्रेमळा माउली ! २४

आईच्या स्मरणें मनांतुनि पळे नैराश्य कोठें दुरीं
आईचें अठवूनि प्रेम भरतें येतें सुखाचें उरीं.
आई! दावुं कुठून हें मुख तुला काळें कसें जाहलें
येणें त्या न घजे तुझ्याजवळ तें लज्जेंत जें पोळलें २५

न्यायाधीश बघुनि घाबरत कीं जैसा गुन्हेगार जो
केला एक गुन्हा चुकून जगतीं आहे नवा त्यास जो
होतो कीं अपराध हें न कळलें माते पुरा मोहिलों !
प्रेमाच्या फसव्या वृथा मृगजळीं मी पोहण्या धांवलों २६

गेलों अंक तुझा त्यजूनि समयीं प्रेमास मी वंचिलों
मातेहूनि मला प्रिया शशिकला, आईस दूरावलो.
प्रेमाचा पथ अन्ध दुर्गम नरा हा चालतो आंधळा
गर्तेमाजि अतां फसून बसला, आक्रन्दितो वेन्धळा ! २७

गर्तेतून मला वरी उचलण्या विज्ञापिलें मी किती
मित्रांतें, स्वजनांस. विन्मुख परी झाली तयांची मति
नीतीचा अति घोर खून सहसा केला जयानें तया
पाप्याला असल्या जगांत कुणि कां देणार हो आश्रया ! २८

नीतीचा फुटला न जोंवर जगीं ज्याचा असे भोपळा
त्याचें चालतसें सुखांत, जन हा आहे कसा आन्धळा !
वित्तानें नुरतें अगम्य मनुजा झाकें अनीती सुखें
"नीतीचा अति घोर खून" म्हणुनी बोलूं शके तो मुखें ! २९

भीती येत जनापवाद म्हणुनि ज्यांनीं मला सोडिलें
त्यांचें चित्त मला कळे तळमळे तें केविं मीं जाणिलें,
त्यांना धैर्य नसे–असून अथवा होईल तें कायसें ?
कां हें व्यर्थच वैर जीवनि असें व्हावें जळीं मीनसें ? ३०

चाले नीतो अशीच मर्त्य जगतीं रागें भरूं कायसा ?
रानाचीच अतां सुखें धरियली मी शेवटीं कांस या.
नाहीं राग, नसेच प्रेम हृदयीं संन्यास जो घेतसे
ध्यावें नित्य मनांत दैवत जगीं हा धर्म त्याचा असे. ३१

गायत्री जपतां पुढें शशिकला, येते दिसोनी तरी,
सन्ध्या-वन्दन हें कुठून रविचें, तो जेथ नाही उरीं.
चित्ता आवरुनी तिला करितसे मी दूर—तो पातली
धावोनी पुढतीं पुन: शशिकला रुद्राविना एकली ! ३२

हाणूं मी किती वेळ कन्दुक अतां येतो पुन: तो वरी
दाबावा अवनीवरी करतलें यावा पुन: तो वरी
किंवा त्यास धरून ठेवुं हृदयीं ? मातें नको तेंच हें
कैसें तें करणें, अहा प्रभुवरा ! कां साहणें दु:ख हें ? ३३

रे रे पावन पुण्यशील सखया ! नाहीं दया कां तुला ?
तूं देशील मला विमोचन तुझा कीं आसरा सेविला !
प्रेमाचे असल्या जगांत नित हे जे पाठ चालायचे—
त्यांच्या पासुन दूर जाउनिन कां या सौख्य लाभायचें ! ३४

तूं देशील न आसरा जरि मला अन्यत्र जाऊं कुठें ?
ठेवावा अपुला निसर्गभवनीं हा प्राण आतां इथें
नाहीं सौख्य जनांत तें नच असे रानांत या निर्जनीं
लागावा नच शोध उत्सुक जना कां त्या सुखाचा जनीं ? ३

प्रश्नांनीं असल्या मनांत उठुनी भंडावुनी सोडिलें
त्याचें उत्तर ना मनांत उमगे, नैराश्य ज्या पातलें
चर्या खिन्न, शरीर क्लिन्न, हृदयी उच्छिन्न आशा असा
कोणी एक युवा वनांत बसला ध्यानस्थ योगेशसा ३६

सायंकाल सुरम्य मंगल अशी ती वेळ रानांतली
सृष्टी ही नटुनि थटुनि रविच्या अस्तास कीं बैसली.
यतां सूर्य वरीं नटे सुरमणी त्याच्या करी स्वागता
जातां विश्रमण्याहि, हीच गृहिणी रीती असे सर्वथा. ३७

सूर्याचीं किरणें पडूनि सरिता आरक्त ही जाहली
प्रेमाचा जणुं रक्तिमा विलसुनी ती लज्जीता जाहली
पुष्पांचा मधु गन्ध घेउनि सखा वायू तिचा पातला
गाया मंगल गीत पूत समयीं कोकीळही लागला. ३८

आला नाथ गृहा म्हणूनि मुदिता ती पश्चिमा जाहली
द्याया अर्घ्य तयास पाठवियली ही नील मेघावलि.
येथें ती क्षितिजावरी विहरते, औत्सुक्य चित्तींवसे
पाही वाटच दक्षिणोत्तरपथीं जाऊन ऐसें दिसे. ३९

आली ही रजनी समीप म्हणुनी गाती वनीं जे किडे
त्यांचा कर्कश हा असह्य असला आवाज कानीं पडें
काटा शोधूनि त्यांस, सांगुनि तया द्या कीं, "जरा थांबवा,
ऐका हें खगगीत, निर्झर करी तें गीत, या सं-रवा." ४०

वृक्षांच्या मधुनी शिरूनि करितो आवाज ऐका अतां
पर्णांचा मृदुमज्जुमज्जुल असा वायूकरी पाततां
रात्रीं जीं फुलतीं सुमें उमललीं हा गन्ध त्यांचा सुटे
येतां झोत मधून शांत हृदया हर्षानुकम्पा सुटे. ४१

"आला मंगल काल" गात सुटले पक्षी नभीं स्वैर हे.
आशेचे रविच्या सवें पसरती सन्देश कीं सर्व हे.
ते देती पसरून पक्षिगण कीं संदेश दाहीं दिशां
आतां सोज्वळ शांत मंगलमयी ही पातली कीं निशां ! ४२

आलें तोंच कुठून सुंदर असें सगीत ऐकावया
त्यांना साथ करी मधून मुरली सौंदर्य आले तया
झालें गो-कुळ हें, सुरम्य गमलें संगीत हें ऐकतां
पाही उंच करुनि मान अपुला हर्षे युवा दूरतां ४३

होता उंच परंतु मान, गळली त्याची पुनः खालतीं
आकाशीं दिसली तया शशिकला ! कां त्या छळे दृष्ट ती ?
त्याने घट्ट मिटूनि नेत्र अपुलें, वक्षासही घेतलें
त्याचे नेत्र परंतु अश्रु तरिही गाळावया लागले ! ४४

रे रे दुर्बलभाग्य मानव ! तुझ्या नेत्रांत कां आसवें ?
गातो गीत निसर्ग, चित्त तव कां गाई न त्याच्यासवें ?
वृक्षान्ती घरटयांत टुणटुण सुखें हीं सानही शावके
आनंदुनि अतां खुशाल करतीं, कां चित्त ऐसे फिकें ? ४५

गाळी जो असवें सुखांत असुनी ज्यातें दिसे नाच तें
लागावा मज शोध उत्सुक असें तच्चित्त जें धांवतें
धांवें दीनपणें वृथा मृगजळीं पाणी पिण्या चित्त तें
तेंहि त्या न मिळे म्हणून असवें नेत्रांतलीं तें पिते ! ४६

अश्रूंनीं परित्याहि हाय न शमे तो दाह अंगातला
झाले कार्य कधि अरुण्यरुदनें संपूर्ण या भूतला ?
चित्ताच्या रडण्यामुळें कधि तरी दुर्दैव कां पाझरे ?
घालावे घण त्यावरी सतत तों येती झरे हासरे. ४७

' लागे ना मज सौख्य हाय ' म्हणुनी जो आसवें गाळतो–
अश्रूंच्या पटलें कराजवळिच्या सौख्यास ओसंडतो.
राहे सौख्य सदा समीप जगतीं कोठें जरी मानव
अश्रूंच्या पटलें परंतु मुकतो ! त्या सौख्य नाहीं लव, ४८

घेवोनीं नगरांतुनी निघतसे गो–वत्स रानाकडे
जें कांहीं मिळतें तयांतहि सुखें ओलांडतो तो कडे–
दु:खाचे, मग गीत गात फिरतो रानांत, रात्रीकडे
जातो हांसत तो घरीं परततो, घेतो मुलांना कडे ! ४९

नाते सूरच गोड त्या मुरलिचे त्यांतूनि येतीं सुखें
आनंदें भरतात सौख्यच जगीं सारीं सुखेंच्या सुखें–
आकाशांत धरेवरी विपुल हीं त्यानेंच तीं निर्मिलीं
श्रीमतांसहि तोच देत असतो ही सौख्यमाला भली ! ५०

ऐसा एक सुखी युवा कोणितरी आला गुराखी तिथें
पाव्याचे मधु नाचवीत जगतीं आलाप आला पथें.
त्यातें एक दिसे युवा कुणितरी चिंतार्त रानामधें
पाहोनी हतसौख्य त्या उपजली सद्बुद्धि चित्तामधें ५१

" आहे कोण युवा कशास अथवा आला असे या वनीं ?
योगा आचरिता असेल बसला कां हा कुणी सन्मुनी ?
हाकारूं नच वा तयास चुकुनी भंगें समाधी तरी
शापानें मज क्रुद्ध विद्ध करूनी टाकील कां सत्वरी ? ५२

किंवा भूत कुणी वनीं तरुतलीं येवोनि हें बैसलें
लागे अल्प जरी तया चुकुनिही चाहूल तें कोपलें
येवोनी मग काय मानगुटिला बैसेल तें माझिया ?
व्हावें पापच मात्र पुण्य करितां ! राहूंच द्यावें तया. ५३

किंवा हा कुणि चोर येथ बसला आहे धरोनी दबा
पान्थस्थावरि वाटमार करुनी कीं लांबवावा डबा
नाहीं येथुनि पंथ दूर, जवळीं नाहीं कुठें वाट ही
चोराया अनुकूल काल बघतां हा पाहतो वाट ही. ५४

किंवा हा मजसारखाच कुठला आहे गुराखी इथे
येवोनी बसतां, थकून निजला रानांत कां हा इथें ?
त्याची वाट सखी पहात बसली ती खिन्न दारांत कीं
त्या संवेदन हें नसेलच निजे हा बापुडा दीन कीं. ५५

किंवा हा हतभाग्य कंपित असे दुःर्दैववेडा नर
जीवातें अपुल्या असेल बसला कटाळुनी पामर
जावें सोडूनि ह्यास तो करिल की कांहीं तरी वांकडें
कांहीं ना कळतें, मनास पडलें हें केवढें सांकडें ! ५६

नाहीं ह्यास जटा, न वस्त्र भगवें, अंगावरी राख ना
ह्याचा दंड दिसे न, पुस्तक कुठें, अग्नी दिसे कोठ ना
नाहीं ग्रंथ, नसे कमंडलु, नसे–नाहींच कां हा मुनी ?
आहे कोण तरी निराश नर हा येवोनि झोपे वनीं ? ५७

नोहे भूत, न हें पिशाच्च अथवा, आहे मनुष्याकृति
चोरातें कुठुनी अशी सुखकरी निद्रा घडे विस्मृति ?
नाहीं कोठ सभोवतीं कळप वा त्याच्या गुरांचा–तया
हांकारूनि बघूं ? बघूंच–अथवा राहूंच द्यावें तया." ५८

ऐसा खूप विचार तो करितसें चित्तीं गुराखी क्षण
राहे तेथ उभा, अतां करिल कीं किंचित् तरी चालन
त्या जागें करितां, करील अपुल्या जीवास तो कां इजा
आहे शास्त्र तया समीप ? भरली थंडी तया भीतिजा ! ५९

"किंवा हेंच बरें, अतां त्यजुनिया जावें घरा, ह्या इथें
येतां सूर्य वरी पुनः परतुनी यावें बघाया इथें.
जागेची जवळीं जरा समजण्या हो खूण कांहीं तरी
रेघोट्या म्हणुनी इथें करूनिया जावें शिलेच्या वरी. ६०

३१६५४ २५७८ २८-११-६९

झाला फार उशीर वाट बघणें येथें किती ही तरी
येती श्वापद येथ, येतच असे ही गर्जना भीतरीं
कां हे श्वापद ? ह्यास कां न अथवा खातील रात्रीतुनी
जीवाचें अपुल्या घडो, घडत जें, घेऊं तया पाहुनी." ६१

गेला त्या युवकासमीप, हलवी स्कन्धा धरोनी तया
होतां स्पर्श तयें स्वतंत्र उघडे केले, दिसे त्या दया.
दोघांची मिळतांच दृष्टि, सरती नेत्रांत तीं आसवें
मानव्यासच पूर की सु-यमुना घे धांव गंगेसवें. ६२

आहे एक युवा सुशिक्षित, दुजा आहे गुराखी परी
त्यांचा योग इथें विचित्र, नुरला तो भेद त्या-अन्तरीं
देवाचा सुत एक येथ दुसऱ्या पुत्रासवें जै मिळे
तेव्हां योग्यच भेद मानव करी तो दूर दुःखें पळे. ६३

शब्दांचें नच तेथ कार्य उरले, केलें मनानींच तें
नेत्रा नेत्र मिळे, मिळे हृदयही चित्तासवें भाव ते.
नेत्रांनींच तया विनन्ति करितो कीं तो गुराखी, "चला
या रानांतुनि माझिया घरकुलीं, द्या मान विज्ञाप्तिला." ६४

पापाला नच धीर की हंसुनिया पुण्यासवें बोलणें
होतें निष्प्रभ हीन, दीन, घडतें चित्तास तें कांपणें.
बोलाया शकला न-वा न उठला तो खिन्नसा पामर,
नेत्रांनींच वदें, "कृष्ण बहुत हीं हा मृत्यु वांच्छी नर !" ६५

मृत्यूची घनदाट कृष्णा पडली छाया शरीरावरी
वृक्षाची पडली तयावर तशी तो साउली-कावरी
झाली वृत्ति,मधून कर्कश ध्वनी येतात कानावरी
कोल्हयांचें रडणें, किडे किरकिरीं, येतात वायूवरी. ६६

ऐशा त्या समयीं भयानक वदे कीं तो गुराखी, ' नरा,
आहे काय तुझ्या मनांत ? रडवा कां हा तुझा चेहरा ?"
दावी बोट करूनि उंच गगनीं, पाही वरीं ना परी
तेव्हां त्या हंसुनी पुनः पुसतसें. "कां चांदणें अन्तरीं ?" ६७

प्रश्नानें दचकून तो पुसतसे, "पोलीस आहेस कां ?"
' हो हो" हांसुनि आणि हात धरूनी, बोले, "पळे चोर कां ?"
"त्यातें माग नसे कुठेंच पळण्या अंधार चोंहीकडे !"
"हा भेटे तुज मार्गदर्शक, चला बन्दिस्थलाच्याकडे !" ६८

' त्यांतुनीच अतां सुटून वळलों या घोर रानांत मी
आहे चंद्र वरी, परंतु फिरतों मी येथ रानीं तमीं !
झालों तेथुन हद्दपार—"

"वसतो तेथेंच कीं जेलर—
आवारांतच तीं स्वतंत्र विलसे, ही बाग, त्याचें घर !" ६९

"नोहे तें घर जेथ राहुनि सुखें तो ऐकतो गर्जना—
चोरांच्या, फटक्यांमुळें कितितरी होतात त्यां वेदना !
सत्तेचा पसरे मुखावर जिथें तो घूर—तो पामर
प्रेमाची नच आर्द्रता हृदयि तो नाहींच कां फत्तर ?" ७०

'वा: वा ! रे दिससी पुरेपुर मला पाषाण तूं कोरडा
न्यायानें असल्या हंसूनि करिसी आतां घसा कोरडा !
आहे फत्तर तूंच—तूं उडविली विज्ञापना वा नभीं ?
रेघोटया पुसतील कां कधितरी ज्या कोरिल्या प्रस्तरीं" ७१

"दुःखांनीं न फुटे असा करिन मी आहे खरा प्रस्तर !
मोहानें भुलवूनि कां पळविसी त्यातें भवीं दुस्तर ?
आतां येथ पडून मी फुटुनिया जाईन रानांत या

बांधाया घर आपुलें--"
"न वदणें शोभें मुखीं हें सख्या !" ७२

"जा जा येथुन जा निघून अपुल्या गेहास मित्रा सुखें
प्रेमावांचुनि चित्त स्वल्प नुरलें माझें अतां रे भुकें.
मृत्यूच्या समयीं सुखें मरिन मी कीं लाभसी तूं सखा
घेवोनी तव प्रेम वाट बघतों स्वर्गांत मी सारखा !" ७३

त्यानें घट्ट मिटून नेत्र अपुले खालावली मानही
त्यातें प्रेम नसे जगांत जगण्या खालावला मानही.
लागे तोंच कुठून चाहुल म्हणों आले तिथें कोणसें
रेघोट्या करुनी तिथें परतला, जातां गुराखीं हसें ! ७४

●★●

उषेच्या अनुरागाचें प्रतिबिंब दिशेवरी
पडलें रक्तिमा गालीं विलसे रूप सुंदरी. १

दिवाकरहि प्रेमानें करानें स्पर्शितो तिला
वायूनें उडला हातें धराया सरसावला— २

तरी पदर कांतेचा उडतोच तदा उषा
जाहली रुष्ट ती शोभे, विलसेच तरी रुषा. ३

रागानें भरतां होते रक्त ती रमणी तशी
अनुरागेंहि ती शोभे. रक्तिमाच नसो तिशीं ! ४

रक्तिमां बघुनी भानू स्वयें आरक्त जाहला
नभांत अनुरागाचा पूर कीं वाहुं लागला. ५

सरितेच्या जलामाजीं रक्तिमाच दिसे-दिसे.
अनुरागच कीं आतां वाहतो हा दिशे दिशे- ६

रमणींच्या मनामध्यें रात्रीचा अनुराग हा
अजूनि वसतो, आहे उत्साह म्हणुनीच हा. ७

उठल्या वनिता कामें कराया मग लागतीं
सडा-संमार्जनें त्यांचीं प्रातःकाळांत चालती. ८

गाईंचा झाडती गोठा शेणीं करुनि घालती
पीठ जात्यावरी कोणी दळतां गाउं लागती. ९

कांडतां कंकणांचा हा मधून उठतो ध्वनी
मुसळाची तया साथ पखवाजच गायनीं १०

शिक्षितांच्या घरामध्यें अजून निजती मुलीं
अभ्यास करुनी रात्रीं आहेत थकल्या मुळीं. ११

उशीरां पातल्या कोणी चित्रपट बघोनियां
निद्रा न उघडे त्यांची सूर्योदय नसे तयां ! १२

करुनी स्नान ह्या कोणी मंदिरा निघती अतां
दिंडीचें गीत ऐकाया येतसे मधुनी अतां १३
बसुनी गीत शालेंत भूपरागास गातसे.
गायकाचें मना गीत आनन्द बहु देतसे. १४
फिराया चालले कोणी, कोणी धांवावया तसे
कुणी मजूर हे जाती गिरणीस घसाफसे. १५
राजमार्गांत हे कोणी उगाच फिरती किती
पाहती येथेतेथें हे 'टवाळ' जन बोलती. १६
बागेंत बसली कोणी बाला गौरा मनोहरा
वेणीचा शेपटा हातीं दिसे हातांत मोगरा. १७
नाक चांफेकळी साजे भ्रुकुटचा सु-धनुष्य कीं
तीळ गालावरी शोभे उजव्या जणुं लाविलें— १८
गालबोट निसर्गानें सौंदर्यच दुणावलें.
पाहतें वाट ती वाटे कुणाची येथ येउनी १९
औत्सुक्य नयनीं नाचे दिसतें हेंच दुरुनी.
कटाळुनी उठे लागे तोडायास फुलें-फुले २०
तिचें चित्त, मुखीं आलें स्मित गोड दिसे भलें.
पूर्वस्मृति तिच्या चित्तीं उसळूनच पातली २१
मालिका सुविचारांची तदा ती गुंफुं लागलीं.
प्रभातीं एकदां आलों तोडाया सुम आपण २२
तोंच एक गुलाबाचें दिसलें सुम गोडसें
तोडाया चित्त त्या वेळीं अपुलें जाहलें पिसें. २३
गेलों धांवून तोडाया फूल तें मग आपण
फांदी तोंच परी कैशी अकस्मात् जात वांकुन २४

केला हात पुढें कांटे बोचलेत तया किती.
'राजीव' म्हणुनी गेलों ओरडून तदाच ती— २५
राजीवनयना मूर्ति आली बाई पुढें कशी
हातीं फूल नि कांटाही मौज ती घडली कशी. २६

येउनी पुढतीं बोले, " हवें कां फूल हें तुला ? "
गोंधळे चित्त तें बाई वाटे लाज मनीं मला ! २७
कांटा कां बोचला आहे ? " आले जवळ तें जरा,
"कांटयानें काढणें कांटा न्याय हाच दिसे बरा ! " २८

त्यांचा हंसुनिया केला दूर जों कर आपण
कांटा तयांचा तो बोचे त्यांच्या गालावरी पण २९

"कला !" म्हणूनि त्यांनीं तों मजला हांक मारिली
"कांटयानें काढला कांटा" हासरी वृत्ति बोलली ३०
'काटयानें काढणें कांटा' झालें हेंच अतां खरें
काटयातें फूल मानोनी चित्त हें फसलें खरे ३१

प्रीतीचा फुलला वाटे गुलाब मन अन्तरीं
कण्हेरच दिसोनीया आला तो मजला परी. ३२
राजीव सहवासीं मी राहीन पुढतीं सुखें
मनोराज्यें किती केलीं अतां तीं विरलीं सुखें
कला-राजीव प्रीतीचें चित्र सुंदर रेखिलें
रेघोटया फांसुनी आतां चित्र बेडौल जाहलें ! ३४

सारी पुरुषजाती कां अशीच फसवी असे ?
प्रेमावरण घालोनी कामास लपवीतसे ! ३५

स्त्रियांचें कार्य आहे कां प्रजाजनन एकलें ?
चूल नी मूल ह्यांनी कां क्षेत्र व्यापून टाकलें ? ३६

राजीव ! जळतें माझें चित्त मात्र निरंतर
चित्र तें पुसतां राहे परी तेंच मनोहर. ३७
काढिलें हृदयांतूनी तुम्हांला दूर मी, तरी
तुमची मूर्ति येते ती फिरुनी धांवुनी उरीं ३८
तुम्हांला विसरायाचा यत्न माझा वृथा असे
तुमचे गुण येऊनी चिदाकाश भरे कसें ! ३९
तुमच्या शिक्षणानें या देहांत उजळे प्रभा.
अज्ञान पळतें भानू तम जै पाततां नभा. ४०
उलटे ज्ञान हा ! आतां तुमच्याच वरी अहो !
कुऱ्हाडीचा जसा दांडा गोताला मग काळ हो ! ४१
असे ही निष्ठुरा बाला. नसे शशिकलाच ती
प्रियातें दूर जी सारी राक्षसीच जगांत ती. ४२
काटयांचीं व्हायचीं पुष्पें प्रीतीच्या बगिचांत कीं
खडयांना तारकाकान्ती चढावी प्रीतिनेंच कीं ! ४३
दिसावे दोष नेत्रांतें यावा राग जिथें कसा
बाजार भावनांचा हा प्रीतीचा व्हायचा कसा ! ४४
प्रीतीच्या येत बाजारीं प्रीतीचींच गिऱ्हाइकें
प्रीतीस देउनी प्रीती विकती-घेति तीं निकें. ४५
म्हणुनी वदती कोणी आहे ही प्रीति आंधळी.
दोषांनाहि क्षमा जेथें प्रीतीच जगिं माउली ! ४६
परी ती भग्नशी प्रीति अहंतेनेंच जाहली.
कळतां चूक ती आतां अनुतापांत पोळली. ४७
अनुताप अतां कैंचा तापानें पोळल्यावरी
त्याचें फळ मिळे आतां स्वर्गांत, न महीवरी ! ४८

राजीव मजला आतां करतील क्षमा कशी !
किती टाकून त्यांना मी बोललें परवां निशीं. ४९
काल नाहींच ते आले घराला अपुल्या तरी
गेलों नाहींच कीं त्यांच्या घरा आपण सत्वरीं ५०
अतां जावें घरीं त्यांच्या पडावें चरणां वरी
विनवावें तयांना कीं, 'चुकलेल्यास सावरी.' ५१
करीं पुष्प धरोनीया निघाली मग ती पुढें
नत्रांत आसवें, मुद्रा अनुतप्त, निघे पुढें. ५२
कारुण्याचीच ती भासे मूर्ति हो दुसरो जणूं
सौंदर्यास तयानेंहि वृद्धि गांभीर्य हो म्हणूं ५३
करोनी मान खाली ती विचार करते मनीं
गाळतो नेत्र अश्रूंना, पाय टाकी पथातुनी. ५४
खड्ग घेवोनि जावा कीं वीर तो समरांगणीं
अश्रुधारा धरोनी तो जातसे प्रेमयाचनीं ५५
भस्मावशेषा मदना मागाया जीवदान ती
रतीच दुसरी जाते राजीव सदनास ती. ५६
तोंच धक्का तिला लागे कुणाचासा पथामधें
पुढें गेल्यावरी पाही परतून पथामधें ५७
टवाळ नच तो कोणी–म्हातारी आंधळीं कुणी
म्हणुन चालली मार्गे–गेली तो पुढती क्षणीं ५८
जवळीं घर जों आलें, तिचा उर धडाधडे
बघतील दयेनें का राजीव अपुल्याकडे ? ५९
दार बन्द परी त्यांचें वरी कुलुप थोरलें !
हृद्भाव अश्रुरूपानें नयनांतुनि पातले ! ६०

विषण्ण हृदयें आली तशीच परते घरीं
घरी येतांच तों भाऊ पाहती वाट सत्वरीं ६१
पुसूनी अपुल्या नेत्रां तिनें केलेत कोरडे
तोंच पाठीवरी भाऊ ओढती मग कोरडे. ६२
"नुरला धर्म या कोठें जगांत नच संस्कृति
पाश्चात्य तेवढे कांदे अकलेचे अशी मति– ६३
धरून चालती सारे सुशिक्षित जगांत या
प्रेम धर्म असे त्यांचा प्रीति ही देवता तयां ! ६४
कादंबरी कथांतूनि 'प्रेमगंगा' वहातसे–
'लाजतां कां ? म्हणूनी ही नायिका नायका पुसे ! ६५
स्त्रियेचें चित्र ना जेथें असें नाहींच कोठ ही
मासिकें–जाहिरातीही–वृत्तपत्रें तशींच हीं ६६
अशां ना घट्ट बांधून ओढावे मग कोरडे–
पाठीवर तरी त्यांना नीतीचे मिळती धडे. ६७
–कुठें होतीस तूं गेली सकाळींच शशी अतां
इथें ये बैस आले हे–ओळखी कर तूं अतां ६८
नांव जीवन हें ह्यांचें खास जीवन ओतती
मेलेल्या धर्मदेहांत–राखतीलहि संस्कृति ! ६९
धर्मसंरक्षणा ह्यांनीं काढिलें एक मंडळ
गीताध्ययन नेमानें करिती रोज मंगल......" ७०
ऐकवेना पुढें कांही तिला म्हणुनी ती करी–
'नमस्कार' तयालागीं हंसुनी तिज तो करी. ७१
तारवें पाहणें त्याचें चष्म्यांतून भिरींभिरीं
पाहुनी पातलें हास्य प्रयत्नेंच करी दुरीं. ७२

फुगवी मधुनी किंचित् वृथा नाकपुडीस तो
जाड ओठ तदा त्याचा क्रूरतेसच दावितो. ७३

केसांना तेल लावूनी बसवी चोपुनी किती
वास (घाण) सुटे त्याचा, लावी नाका रूमाल ती ७४

वेष उंची परी त्याचा सूट–बूट दिसे उनी
तिच्या आलें मनीं यानें आणिला काय चोरूनी ? ७५

विरोधें वाढते प्रीति विरहें वाटते तशी
वियोगें कंपिता होते, "राजीव दिसला शशी ?" ७६

भाऊंचा प्रश्न ऐकोनी अश्रु नेत्रांत पातले
परी ते आवरी बाला, वदे, "मी नच पाहिलें" ७७

"छान छान ! नको आतां पाहूंस कधिही तया !"
ऐकतां शब्द–कां शब्द ? सुरीच हृदयांत या ! ७८

वदती अणखी भाऊ, "पळाला तो कुठेंतरी
म्हातारी पातली होती, बघाया अपुल्या घरीं ! ७९

इतुका काय मी वेडा ? रात्रीं ठेवीन कां तया ?
जांवई नच तो माझा कला पत्नी नसे तया ! ८०

कुणाच्या प्रेमपाशांत बापुडा फसला दिसे
प्रेमभंग अतां झाला––"
"आणतें मी चहा" असे– ८१

बोलुनी उठली बाला जावया जों न लागली–
"चहा मी घेत नाहीं कीं" स्वारी ती तोंच बोलली. ८२

"शहाणी वा ! शशी माझी चहा घेतील ते कसें ?
राजीव सारखी त्यांना धर्माची चाड कां नसे ? ८३

आण दूध तयालागीं–कॉफी वा आण जा क्षणीं–"
चहानें धर्म कां जाई ? कॉफीनें न कसा ?–मनीं– ८४
विचार पातला, आलें–हंसूं, ती आवरी तया
धर्म वादळ कां आहे पेल्यांतील चहाचिया ? ८५
धर्म धर्म अशी काय चीज नांदे जगांत या
कॉफीनें न बुडे कैसा, चहा हा मृत्यु कां तया ? ८६
"सुखराम, जरा त्यांना दूध दे पाठवून जा."
स्वयंपाक्यास सांगून खोलींत अपुल्या वळें ८७
राजीव जननी तेथें पाहतां बसली तिला–
स्मरलें कीं पथामध्यें पाहिलेलें असें हिला. ८८
"दिसला कां कुठें माझा हिरा शशिकले तुला !
परवांपासुनी कोठें दिसे राजीव ना मला.
राजीवाविण मी कैसें–"
"माई, ते भेटले मला. ९०
जरा घाईंत होते ते, गेलेत सुरसारला."
शब्द मिथ्या असे गेले मुखांतून तिच्या तरी
दुःखावेग मनीं आला उसळून चिदंतरीं. ९१
आवरून तया बोले, "येतील परतून ते.
आज किंवा उद्यां–"
"बाले, मुखीं साखर घालितें." ९२
पुसुनी अपुल्या नेत्रां म्हातारी परते न जों
फोडुनी बांध आला तो दुःखपूर मनांत जो. ९३
बोलुनी काय गेलें मी राजीव कधि भेटले ?
भेटतील कधीं कां ते ? पोळाया चित्त लागलें ९४
राजीव जीवनाचें जें चित्र बेडौल जाहलें
रेघोटया फासण्याचें तें पाप माझेंच भोवलें ९५

असें काय तुझें त्यांनीं केलें शशिकले वरें
भावनावश चित्ताला जे निखारे दिलेस तूं ? ९६
हवें काय तुला होतें ?
"चला प्यायास कीं चहा
भाऊ जीवन बाहेरी तुमची वाट पाहती." १७
सुशीला पातली तेथे बोलवाया तिला, पुन:
जीवना पुढतीं जाणें धजवेना तिच्या मना, ९८
पाहुनी कीं सुशीला ही रडते कां शशी अशी
जवळीं जाउनी बोले, "रडतां कां अवेळ ही" ९९
"लहान अजुनी वैनी तुम्हीं आहांत वाटतें--
रडण्याविणही पाणी कधीं नेत्रांत पाततें. १००
चहा नको मला आतां घेतला मी--"
"कला, कले"
भाऊही जोरजोरानें हांकारायास लागले. १०१
बाहेर बसवां भाऊ वदले, "चलतेस ना ?
प्रदर्शन बघायातें जीवनांचें--तुझ्याविना-- १०२
मीहि जाणार नाहीं--"तो पातलें हें तिच्या मना--
प्रदर्शन बघायाची असह्या मज कल्पना. १०३
पाहिलें मी अतां येथें प्रदर्शनचतें असें
धर्मसंरक्षणाचें तें--
"धर्माचें अपुल्या असें १०४
वेदकालीन वस्तूंचा त्यांनीं संग्रह आणिला--
चला जाऊं बघायातें--"
:'बोलली ती, "असें ? चला." १०५

# प्रेमाचें नंदनवन

शशिकला

अंगणांत मुलें सारीं चंद्रिकेंत जमोनिया
खेळती खेळ बाल्याचें रूप ये तयां. १
भाकरी-चटणी-कांदा खाउनी ती कशीतरी
सुखाने खेळती आतां-दुख नाहींच अंतरीं. २
गोपाळ पडला आहे खाटेवर बघे वरी
निशा-चंद्रविलासातें पूर येतो नभान्तरीं. ३
चंद्राच्याजवळीं आहे रोहिणी ती मनोहरा
चंद्रप्रभा पडोनी ती दिसते रम्य पाण्डुरा ४
सत्पर्षिमण्डळामध्यें शोभते ती अरूंधती
वसिष्ठमुनि-संयोगें पुनीता दिव्य ती सती. ५
शुद्ध प्रेम दिसें तेथें भरलें पूर्ण अंबरी
मांगल्य हृदया देतें मूर्त गांभीर्य अंतरीं ६
प्रेमानें भरला सारा विश्वगोल निरन्तर
प्रेमावाचून त्याला कां आधार दुसरा तर ? ७
प्रेमाला कसला आहे आधार जगतांत या
प्रेम हेंच सुखाचें ना अधिष्ठान रहावया ? ८
प्रेमाचा मिळतां चारा जगतो जीव या जगीं
मग दुख कसें नांदे जगांत कुठुनी उगीं ? ९
सुखाच्या चंद्रिकेमध्यें मेघांची विपदा कशी
दुधाच्या सागरामाजीं विषबिंदु कुठें निशीं ? १०
तोंच अंधार झाला कीं कांहीं काळ ढगांमुळें
गोपाळाभोवतीं आलीं बसलीं सर्व तीं मुलें ११
"गोष्ट सांगा अम्हां बाबा, अम्हाला झोप येइ ना
राजाची वा प्रधानाची, सांगा-सांगाल गोष्ट ना ?" १२

उत्साह बघुनी त्यांचा गोपाळ हंसला जरा
निश्चित्त पूर्ण सौख्याचा बाल्यकाळ असे खरा १३
उचली सानुल्यातें तो घेई वक्षावरी तया
चुंबुची गाल त्याचे ते कितीदां तृप्ति ना तया १४
कुरवाळूनि त्याला तो वदे, " सांगूंच कां तुम्हां ?"
" राजाची-" बोलती कोणी, "प्रधानाची हवी अम्हा!" १६
"ऐका होती कुणी राणी तिचें नांव असे सुशी-
सांगूं कां ?" "हो" " नको, कोणा उगाच मग सांगशी " १६
" नको थट्टा अम्हां ऐशी सांगा गोष्ट सुरेखशी
नातरी तुमचा गट्टी फू करूं मग ती कशी !" १७
"एक होता कुणा राजा तयाला दोन बायका
दोन पुत्र मुली चार विलासास पुसूं नका. १८
सोन्याचा राजवाडा तो बगीचा गाड तो किती
सैन्य मोठें तयाचें तें हत्ती घोडे महारथी. १९
राज्य विस्तीर्ण होतें कीं इंद्राचें जणुं अंबरीं
दासदासी दिसंदीस करिती नित्य चाकरी. २०
राज्ययोग्य तयाचे ते प्रधान बहु शोभती
न्यायानें, नीतिने राज्या सुखानें नित हांकती. २१
परी खिन्न सदा राजा, आनंदी न दिसे कधीं
निराशा ती मुखीं, चर्या हीन दीन सभेमधीं २२
एके दिनीं तयालागीं प्रधान वदले तया
" चर्या कां खिन्न राया ही नसे योग्य बघावया. २३
काळजी ही कशाची कां चिंता लागे तुम्हांप्रती
सांगा आम्हांस, ती आम्ही करूं दूर यथामति २४

नसे तुष्ट प्रजा राजा खिन्न ती बहु अंतरीं
तुम्हां खिन्न बघोनी ती हंसेना कधिह्णी तरीं. २५
नसतां सूर्य तों कैसी चंद्रास मग ती प्रभा
कुमुदें फुलतीं कैशी चंद्रही नसतां नभा २६
वदा चित्तातलें सारें शल्य भाव नको दुजा
खिन्न आम्ही तुम्हां वंदू यथा राजा तथा प्रजा." २७
"अहो मी खिन्न का आहे ? नसे चिंता न काळजी
धन्य मी तुमच्या संगें, स्वर्ग साजे घरा अजीं" २८
बोलला तो असें राजा, परी संतुष्ट ना प्रजा
दिसंदिस दिसे काया क्षीण, क्षीण दिसे प्रजा २९
एकांत समयीं राजा विचार करि अंतरीं
दिसतों खिन्न कां मी हो नसतां काळजी उरीं ३०
रोग काय मला झाला कसलासा भयंकर
स्फुलिंगें अल्पशा पेटे घर जैसें भराभर ३१
तसें आंतून माझें कां शरीर जळतें—नको
मनांत कल्पना ऐशी बेंधाळ मुळिही नको. ३२
राजवैद्य तयाचे तैं निदान करिती तरी
चिन्ह कांहींच रोगाचें दिसेना मुळि भीतरीं ३३
नसतां अल्पही व्याधी चिंता रायास लागली
दिसंदीस तयाची ती कायाही क्षीण जाहली ३४
सोडुनी राज्य राजा तो निघे मग वनाप्रती
युवराजास मंत्री ते राज्यावरति स्थापिती ३५
वनांत तरुच्या खालीं बसला खिन्न पामर
तोंच एक कुणी आला आनंदी तेथे तो नर. ३६

राजा वा रंक वा कोणी मरायातें यदा सजे
तदा त्या मरूं द्यायातें कोण अन्य कसा धजे ३७
नरें त्या प्रार्थिलें यावें 'माझ्या घरकुलीं सख्या,
नव्हे योग्य तुला ऐसें मरणें हे मरणें हें वनांत या.' ३८
रायाचा मरण्याचा तो निर्धार जणुं जाहला
हले ना, न उठे, तेथें बसलेलाच राहिला. ३९
तदा त्या मानवानें त्या दगडावरि ओढिल्या
रामनाम स्मरोनीया रेघोट्या शुभदा भल्या. . ." ४०
'गोपाळ' म्हणुनी आई इतुक्यांत वदे तया
"बाळांनों जा निजा आतां पुढची गोष्ट हो उद्यां" ४१
"गोपाळ ! ये जरा येथें ऐक गीत सुरेखसें
कोण गातें दिसें ना तें चित्त माझें परी हंसे." ४२

"प्रेमाची भूल भुलाई
भ्रांतिच अवघी तिथें कमाई
जीवाचे नाजुक धागे
गुंतुनि जाती प्रेम न लागे ४३
एक मार्ग त्या नगरिं दिसावा
गर्तेतचि परी जीव फसावा.
गुलाब फुलले दिसती वाटे
उरिं कवटळतां रुतती काटे ४४

मायेचा मुळिं हा बाजार
मोहाची लूट तेथ अपार
जा परतुनि येथुनि जा जा
जीवातें भुलवुं नको जा ४५

घे कृपाण कृतिचें हातीं
घावांची करि सरबत्ती
गाळ घाम तूं निज निढळाचा
प्रेमी हंसतिल, करतिल मौजा" ४६

गीत तें ऐकतां अश्रू नयनांतुनि पातले
आलिगुन तया कंठीं दोघेहि खिन्न जाहले. ४७
आईचीं आसवें खालीं जमिनीवर पातलीं
गोपाळनेत्रिचीं आसूं सवें त्यांच्यांत जाहलीं ४८
गातें कोण बघायातें निघे गोपाळ भोवतीं
औत्सुक्य अंतरीं नाचे उठतीं अंतरीं स्मृति ४९
इतुके दिन जीं दुःखें मनांत दडलीं—अतां
उसळूनि पुनः आलीं नव्या जोमांत एकदां ५०
कडेवरति रस्त्याच्या युवा गात कुणी असे
पाहतां सूक्ष्म तों त्यातें विस्मयें पुढतीं दिसे. ५१
रानांत तरुच्या खालीं हाच जीव दिसे मला
प्रभाव हरिनामाचा दिव्य हा दिसला मला ५२
रामानें धाडिलें ह्याला अपुल्या सदनाप्रती
समदुःखी अम्ही दोघे हीच योग्य सुसंगति ५३
गोष्ट चित्तांत तों आली ऐकवीली मुलांस जी
भलतें बोलुनी गेलों मुलांजवळ कीं अजी ! ५४
प्रेमवेडा वृथा ह्यातें गणिलें मी मनामधें
प्रेमाची फसवी रीति दिसली ह्या जगामध्यें ५५
कृतिचा दिव्य यानें ना सन्देश दिधला मला
घणाचे घाव घालोनी गाळावा घाम तो भला ! ५६

सन्देशें पातले अश्रू नयनांत पुन: तया
जवळी जाउनी बोले, " क्षमा होईल ना सख्या ! "५७
विस्मयें त्यासही तैसा धक्काच जणुं लागला,
" करायातें क्षमा कोणा अधिकार नसें मला. ५८
देवाच्या घरचा पापी गुन्हेगारच मी असे
मानाचें जगणें नाहीं, मराया धैर्यही नसे ५९
सुखाच्या मोहजाळीं मीं गुंतोनी बसलों सख्या
बांधलें बिसतंतूंनीं, फसलों कर्दमांत या ६०
उचलील कधीं मातें—"
मुरारे पार्वतीपते !
भलते बोल कां ऐसे काढावे सखया ?" वदे. ६१

" जीवन घनसंग्राम
मुखानें राम राम घे नाम
भवसागरिं तूं तडफसी रे
निजदु:खांनीं व्याकुळसी रे
घडे कां रडण्यानें तव काम ? ६२
दु:खांतहि लव धीर धरी रे
दिनदयाघन प्रभुजवळीं रे
तुला तो दाविल अपुलें धाम
मुखानें राम राम घे नाम " ६३

आईच्या चरणीं माथा ठेवतां ती वदे तया,
"शतायुषी मुला हो, का वेड साजे जिवास या ? "६४
"इतुकें कासया माते दिलें आयुष्य या जिवा
आहे तेंच नको मातें—"
तुझे नांव कळे न वा " ६५

" राजीव म्हणुनी सारे वृथा देहास बोलती
राजीव लोचनाचें त्या आजीव सुख ना मति." ६६
" सावराया चुका होतो राजीवा वेळ का कधीं
आजपासून या लोकीं निराळी दृष्टि घे सुधी." ६७
पुनः तें पद गाते ती, राजीव ऐकतो तया
" जीवन घन संग्राम
मुखानें राम राम घे नाम" ६८
राजीव निजला नाहीं तोंच आवाज जाहला,
" धांवा पळा, पुढें या या-इकडे-तिकडे-कुठें ?
आग आग! अरे शिंग वाजतें कां इथें कुठें ?" ६९
शहराच्या तटापाशीं सैन्य आलें जमोनिया
"नगरांत कुणी झोपे ?" पुसे सेनापती तया ७०
" नसे कोणी पुरीमध्यें आळशी एकही नर.
इथें हो पातले सारे राखाया अपुलें घर" ७१
" पहा प्रसंग हा बांका अपुल्यावर पातला
प्रेमधामस्थ राजानें घाला हा थोर घातला. ७२
सैन्य मोठें असे त्याचें झुंजार बहु वीरही
सिद्ध झाले लढायातें, सिद्ध व्हा सत्वरीं तुम्हीं." ७३
देवाचें नाम घेवोनी कर्तव्यपुररक्षणा
सैन्य सारें जमे, चाले पहारा, होत गर्जना. ७४
दिनांत युद्ध चाले तें घनघोर भयंकर
कर्तव्यपुरचे योद्धे मरती हा ! भराभर ७५
किल्ल्यांत अवघे अंतीं उरले वीर ते दहा
चालतें काय त्यांचें हो सैन्य जेथें जमे महा. ७६

मुखानें राम गावोनी हातांनीं लढती तरी
धैर्यशौर्यें तयांच्या त्या दिपले सुर अंबरीं ७७
पर्वताचा घडे कैसा परी उच्छेद, तीक्ष्णही
असलें शस्त्र तें मोठे. स्वयें भंगेल खड्गहि ७८
दुरात्म्यास चावोनी रक्षील कुठनीं स्वतां
अबला युवती स्वाध्वी बळी जातेच ती वृथा ७९
अपुले देह टाकोनी धारातीर्थीं सुवीर जे
मरणें जगती येतें, अमृतत्व तयांस जें ८०
काळाच्या जिकुनी क्रौर्या मृत्यूच्या मस्तकावरी
शौर्याचे गीत गाते ती तयांची तेथ वैखरी ८१
असो. शिर धरोनीया हातावर दहारथी
झुंजती रामसे शौर्ये थक्क झाले महारथी ८२
मनोराज तयांचा तो असे सेनापती सुधी
तयांना लढण्यातें तो देत उत्साह संगरीं ८३
पहारा करिती रात्रीं डोळ्यांना झोप कोठुनी
तोच आल्या तयांच्या त्यां अंगना धाउनी रणीं ८४
गळां टाकूनि हातातें रडती सर्वही तदा
" नको हा ओढणें मृत्यू, नको ही क्रांति भीतिदा."८५
आसवें बघुनी त्यांचीं अश्रु नेत्रांत पातले
कुरवाळुनि त्यांना तें वक्ष:प्रांतींहि धारिलें ८६
" पहाना, अपुल्या बाळां शावकां वा जरा तरी
करावा तह आतां कीं जाऊं दे राज्य संगरीं." ८७
शब्द ते साहणें त्यांना अशक्य घडलें कसें
जयांनीं घाव शस्त्रांचे साहिले सुम-हारसे. ८८

राष्ट्रप्रेम तयांना ते देतें घाव भयंकर
पत्नीप्रेम वीरांचे ते हार घाली निरंतर ८९

युद्धाच्या असिधारांनीं देह घायाळ होतसे
राष्ट्रप्रेम परी त्यांचें दिव्य मंगल होतसे ९०

करपल्लव प्रीतीचे टाकिती पाश भोंवतीं
राष्ट्रासवें तयांचीहि मानहानी घडेल ती. ९१

पत्नी कीं राष्ट्र ऐसें हें द्वंद्व मोठेंच पातलें
प्रेमधामस्थ राजाचें सैन्यही हलकावलें ९२

नंनदवन प्रेमाचें कसें आहे मनोहर
सुखदु:ख करी जेथें वास एकत्र भास्कर ९३

प्रेमाच्या बगिच्यामध्यें प्रेमाचीं फुललीं फुलें
कृतिचे तीक्ष्ण कांटेही पुष्पापुष्पांत लागले ! ९४

फुलांना वास प्रीतीचा कृतींना गन्ध मानाचा
नराच्या जीवना लागे योग हा मानप्रीतिचा ९५

एक घ्यावें दुजें तोंच नराला साद घालितें
आकर्षण घडे ज्याचें जास्त तें त्यास जिंकिते ९६

म्हणावें क्रूर त्या कैसें एक सोडी जरी नर
बळी एक न देतां जें, मिळतें न दुजें जर. ९७

असो तदा सुवीरांनीं ललना गाढ चुंबिल्या
कपोल रक्तिमा शोभे तदा त्या मनिं लाजल्या ९८

आलिंगून प्रियातें त्या हर्षयुक्त मनें तदा
शृंगार करिती नाना सीमा नाहींच त्या मुदा ९९

वीरही गाढ प्रीतीनें त्यांचें ते केंस गुंफिती
वेणीचे पेड ते दोन हृदयेंच गमे मती १००

वर्षाव चुंबनांचा तो यदा झाला तयांवरी
कपोलरक्तिमा शोभे अरुणोदय अंबरीं १०१

वर्षाव चुंबनांचा तो तरी चालूंच राहिला
रक्तिमा इतुका वाढे भोंवतीं दिसु लागला. १०२

प्रेमाच्या सागरामध्यें वनिता तुंब पोहती
देहसर्वस्व अर्पोनी प्रियातें अति गुंगती. १०३

डोंब तोंच उठे कैसा आगेचा कुठुनी तरी
पेटलीं सगळीं वस्त्रे हाहा:कार नभांतरीं· १०४

'जोहार' वदती त्यातें वीर केवल जाणती
राष्ट्रप्रेमामधें कैसे प्रेमभावच पेटती ! १०५

अरुणोदय जों झाला तों दिसे रणकन्दन
प्रेमधामेश कीर्तीचा फडाडे ध्वज पावन १०६

इकडे रणमैदानीं दहा प्रेतांतुनी निघे
ज्योत एक चढे स्वर्गीं, आत्मा तो अमरत्व घे. १०७

स्वर्गांत अप्सरा गाती गीत तें करि स्वागता.

" जीवन घन संग्राम
मुखानें राम राम घे नाम
जीवन घन संग्राम" १०८

गीत तें ऐकतां डोळे उघडून बघे तदा
राजीव घाबरा झाला, झालें कन्दन हें कदा ? १०९

पहातों तों दिसे आई देवाजवळ बैसुनी
गीत गाते आळवीते देवास मग पूजुनी ११०

"दुखांतहि लव धीर धरी रे
दीनदयाघन प्रभु जवळीं रे
तुला तो दाविल अपुलें धाम
मुखानें राम राम घे नाम." १११

"गोपाळ" म्हणुनी हांक ऐकाया तोंच येतसे
राजीव पुढतीं जाई पहाया येत कोणसें. ११२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 39६५४ वि: ३७०३
क्रमांक ७५३१ नों दि: २८

कपाळावरती आठचा सुरकुत्या पडल्या किती
भुवयांच्याहि केसांना शुभ्रता पातली अती १
दांत तोंडांत ना एक बोळकें जणु जाहलें
मिशांचें केंस येवोनी ओष्ठद्वयहि झांकले २
साठ वर्षे वया झालीं, जोशी सांगावया नको
अंगकाठी तरी त्याची तरुणा ! तूं बघूं नको ! ३
काठी हातांत डोईला मुंडासें शुभ्र बांधिलें
पायांत वाहणा होत्या, खांद्यावरति कांबळें ४
चर्येत अनुभूतीचें प्रतिबिंब दिसे, तया
वृत्तींत भरलें वाटे गांभीर्य फुलवावया ५
बालातपाचीं किरणें पडलेंली शिरावरी
वसिष्ठनन्दिनी वाटे बसलेली हिमावरी ६
"पुढें येऊन राजीवा "राम राम" करी, हंसे
"गोपाळ अमुचा कोठें ?" म्हणुनी त्याजला पुसे ७
नमस्कारूनि वृद्धाला विनयें वदला तया,
"आंत आहे". दिली खाट सांगे त्यास बसावया. ८
राजीव जातसे जों न हांकारायास त्याजला
"महाराज जरा थांबा" म्हातारा तोंच बोलला. ९
" कृपा करूनि सांगावें मजला कोण आपण ?
सावकार ? क्षमा व्हावी...."
"आहे मी एक ब्राह्मण.... १०
शूद्राहून परी झालों शूद्र मी—"
"वच शोभन !
ब्राह्मणांना कसें येई हीनत्वीं मग जीवन." ११

ऐकतां जीवनाचें तें नांव गोपाळ जाहला
मनांत बहु दु:खी नी रडाया मग लागला. १२
बाहेर पातला तैसा नमस्कार करी तया
अधोवदन बैसे तो, म्हातारा वदतो तया १३

"तुम्हांला रडवायातें आलों येथवरी नसे
तुम्हांवांचून या जीवा अन्य पाश जगीं नसे. १४
रडायाचें किती आतां, शोभेल रडणें तुम्हां ?
नरजन्म रडायातें फक्त कां दिधला तुम्हां ? १५

प्रीतीच्या वा कृतीच्याहि मार्गांत मिळती नरा
कांटे, ते साहण्याचें ज्या धैर्य धन्य जगीं खरा. १६
गोपाळ ! तुमच्या मार्गीं आली ही धोंड भासतें
तुम्हांला दु:ख या विश्वीं, परी दु:ख नसेच तें १७

दु:खाचें रूप घेवोनी सुख येतें नराप्रत
आशेच्या तीव्र वज्रानें करावें दु:ख आहत. १८
फोडावी कवची तोंच आंत सुंदर खोबरें
दु:खांच्या कवचीमध्यें सुख हें भरलें बरें. १९
रामाचें नाम गावोनी कर्तव्य करणें जगीं
जीवनाच्या पथामध्यें भीती त्या नच वावगीं २०

रडाल जर कां आतां–मुख तें बघणें नको–"
'मामा हे शब्द या कर्णीं ऐकणें मुळिही नको." २१

गोपाळ मानसामध्यें गीत राजीव गातसे
मनाला शांति येवोनी रडण्याचें जाहलें हंसें. २२

घे कृपाण कृतिचें हातीं
घावांची करि सरबत्ती
गाळ घाम तूं निज निढळाचा
प्रेमीं हंसतिल करतिल मौजा." २३

परी त्या सूक्तिशब्दांनीं चित्ताला स्वल्पहीं नसे
समाधान, पुन: दु:खें कावरें चित्त होतसे. २४
'मायेचा दुनिया आहे बाजार' वच शोभतें
शास्त्रग्रंथांत किंवा त्या कीर्तनांतच साजतें २५
'कृपाण कृतिचें हातीं घे' म्हणे नर गायनीं
तोच खिन्न पडे कैसा येवोनीं निर्जनीं वनीं २६
सहानुभूतिचा शुष्क शब्दांचा खेळ हा असे
परोपदेशे पांडित्य नराला नित येतसे २७
असे आयुष्य हें युद्ध ध्येयाचें व्यवहारशीं
कृतीची जोड ज्या लाभे अपेशी न अहर्निशीं. २८
उच्चतत्वें वदायातें मुखानें कष्ट होत कां ?
'हवें स्वातंत्र्य आम्हांला' म्हणाया खर्च येत कां ? २९
कथा नी कीर्तनें सारे ग्रंथ तीर्थाटनें तशीं
मनाचा दाह थोडाही शांतवाया हवींतशीं ३०
दु:खाचें रूप घेवोनी सुख येतें नराप्रत'
शब्द हे ऐकण्या गोड, काय सत्यच बोलत ३१
आयुष्य न लढाई ती नसे यज्ञ न सागर
धुमसे दु:खलाव्हेचा ज्वालामुखि भयंकर ३२
दिसावी टेकडी सान गर्द रान समोवतीं
दऱ्या खोरीं झरे नाले नद्या सुंदर वाहतीं ३३

भूगर्भी चालना होतां उन लाव्हेस येतसे
अश्रूंचा पूर दाटोनी नयनांतुनि येतसे ३४

निसर्गें दिघलें त्यातें जें आवरण सुंदर
धुवोनी पार जातें तें संहार करि भेसुर ३५

मानवी जीवनाचाही ज्वालामुखिच कां नसे ?
सुखाचें रूप घेवोनी दु:ख हें फसवें असे ३६

धारांत अश्रुबिंदूंच्या--
"राम राम" करी कुणी
पाहतो तों दिसे त्यातें गोविंद मग अगणीं ३७

गोविन्दामागुनी आले कृष्णा रूपा नि शंकर
'राम राम" करी त्यांना "दिसे ना आज भास्कर?"३८

"शहरांत असे गेला माल आणावयास तो"
कृष्णा मोटारवाला तो वदता, लव हांसतो ३९

"पाहुणे कोण हे आले येथें आज ?" पुसे तया
"राजीव नांव हें यांचें..."
"योग्य तें नच ऐकण्या. ४०

स्वयें दु:खी, करी दु:खी दुसऱ्यांनाहि तो नर
सुखाच्या सागरामध्यें विषबिंदुच पामर. ४१

निराशा जीवनामध्यें..."
"भलते बोल कासया ?
स्वत:च्या विषयीं ऐसे शब्द योग्य तुला सख्या." ४२

"तें असो," वदतो कृष्णा, "ऐका वार्ता सुरेखशी"
"ऐकिली काल गांवांत, चिंता लागेच मानसीं. ४३

शहरांत कुणाचेंसें असे संस्कृति मण्डळ
धर्माचें सोंग घेवोनी करिती फक्त गोंधळ.'' ४४

पुराणवस्तु आणोनी मांडिलेलें प्रदर्शन
श्रीमंतें एक देऊळ दिधलें त्यास बांधुन ४५

ऐश्वर्य देवळाचें त्या सागावें काय मी तुम्हां
पुरें होतांच बांधून दिसेल मग तें तुम्हा...'' ४६

''चऱ्हाट वळलें मोठें,' वदे गोविंद तो मधें
' चिंतेचे चिन्ह आहे कां इवलेंसेंहि त्यामधें ? ४७

अपुल्या देवळांतील पुजारी नच तूं कुणी
दक्षिणा कीं बुडे...''
''हो हो. दक्षिणा मग कोठुनी ? ४८

ऐकतों कीं इथूनीच देव नेतील आपुला
पाटलाच्या करामध्यें धन देतांच...'' थांबला— ४९

कृष्णा न वदला कांहीं गोपाळ मग गर्जला,
''कुणाची माय व्याली कां न्यायातें राम आपुला ? ५०

''कित्येक दिवसांहून अमुचा राम हा इथें
कृपाछत्र असे त्याचें आम्हांवर सदाच तें ५१

अमुच्या पूर्वजानीं त्या वदिले अर्चिलें किती
रामानेंच दिली आम्हा कर्तव्याप्रत जागृति ५२

रामानेंच दिला आम्हां राजीव अमुचा सखा
पुढें होऊन सर्वांच्या लढे तो शंभुसारखा. ५३

''चला जाऊन रामातें दुःख सांगूं मनांतलें
देहांत प्राण जों आहे पाहिजे त्यास रक्षिलें. ५४

बिशाद पाटलाची ती आहे काय अशी महा ?
पैशाचा लोभ ज्या व्हावा टेवही द्यावयास हा ! " ५५
राजीव बदला ऐसें, गद्गदून वदे तदा
गोविंद, "पुढतीं जाऊ पाटलाच्याकडे बघा. ५६
'गोष्ट ही सत्य आहे कां, विचारूं त्यास आपण.'
"करूं सर्व यथाकाल. जरा दम धरा पण" ५७
टाळ घेवोनि ते सारे निघाले मग मन्दिरीं
'श्रीराम जयरामा'चा घोष नांदे दिगन्तरीं.
राजीव चालला त्यांच्या सवें रस्त्यांतुनीं मनीं
विचार चालले, झाला पुनर्जन्मच जीवनीं. ५९
ध्यावा चहा सकाळींस वाचावें वृत्तपत्र तें
कलेस शिकवायातें जावें मग तिच्याकडे ६०
तिच्याकडुनि येतांच जेवोनी मग ऑफिस
सिनेमा वा फिरायातें संध्येचा सरला दिस. ६१
खावें प्यावें मनीं ध्यावें युवतीस कुणा तरी
'असे प्रेम' वदावें हें, 'माझें शुद्ध तिच्यावरी.' ६२
प्रेमाच्या असल्या बाता युवका ! काढसी किती
परांची तुजला गादी हवी नित्य मऊच ती. ६३
जीवनाच्या पथामध्यें गुलाब दिसती तुला
दडल्या कंटकांची कां आहे बा कल्पना तुला ? ६४
यशाचा मार्ग पुष्पांनीं मुळीं आंथरिला नसे
तुडवावे यदा कांटे, सुख हातास येतसे. ६५
'माझें घर, प्रिया माझी, माझी ही छान मोटर'
ह्या कोत्या कल्पनांनीं कां भरिशी तव अंतर? ६६

पहा गोपाळ हा साजे गुरूच तुजला न कां ?
मरण्या बसतां रानी आला हाच तुला सखा. ६७
असतास जरी मेला वनांत रडतें कुणीं ?
जगाचे असतें झालें नुकसान विशेष कीं ? ६८
तरुणीच्या नकारानें सरे आयुष्य का तुझें ?
तुझें तें कसलें—जातें नष्ट होऊन जें दुजें. ६९
"गोपाळ म्हणुनी गौळी आहे कां तुमच्यामधें ?"
पुसे त्यास कुणी मार्गी, "तो पुढें" त्यास तो वदे.
गोपाळा घेउनी गेला नर बाजूस तो जरा
न कळे काय त्या सांगे, हंसरा होय चेहरा. ७१
असो दिंडी वळे मार्गा रामाच्या देवळाकडे
आरती करुनी सारे येती मग घराकडे ७२
"संग्राम जीवनीं आला." राजीव वदला तया.
गोपाळहि वदे त्याला, "असे सिद्ध लढावया. ७३
लढायाचेंच हें माझें ब्रीद चाले दिनांहुनी
लढून जगतीं आलों, जाईन लढण्या रणीं ७४
लढतां लढतां मेलों चंद्रलोक मिळे मला
शिरांवरति शोभेल चंद्राची दिव्य ती कला" ७५
शशिकला हरवली गली ती विलयाप्रत
उजेड जीवनीं माझ्या सूर्याचा फक्त सांप्रत ७६
विसरूनच जायच्या तिच्या त्या गोडशा स्मृति
विसरू म्हणतां कैसी परी होईल विस्मृति ? ७७
लढायातें दिलें होतें तिनेंच मज धैर्य ना.
'कांटचानें काढणें कांटा' अजून स्मरतें मना. ७८

बागेंत पातली होती बाला फुल खुडावया
लपून बसलों होतों तिचें रूप बघावया. ७९
तिनें हात पुढें केला तोडाया सुम गोडसें
हळूंच ओढुनी फांदी दाबलें अपुलें हंसें ८०
"राजीव!" म्हणुनी हांक आली कानावरी यदा
कांटा घेऊन कीं आलों पुढेंजवळ मी तदा ८१
"कांटचानें काढणें कांटा" गेलों बोलून आपण
काढण्या कंठकातें त्या केलें तें करधारण! ८२
"कराचा काढणें कांटा गोष्ट सोपींच ती असे
"मनांतील...."
परी कांहीं बोले नच पुढें कसें. ८३
टाकुनी मान ती गौर सांद्यावर पडे शशी
फिरला अपुला हात केसांवर तिच्या तशी– ८४
दूर झाली अकस्मात रागानें वदते, "अहा!
पावित्र्य मनिचें साजे, तुमचा धर्म काय हा?" ८५
जातांच ती घरामध्यें लागले शब्द ने मना
खरेंच रुसली मिथ्या किंवा हें नच कल्पना. ८६
मोह होता मला झाला बागेंत बघतां तिला
एकांती बसली होती बाला सुंदर प्रेमळा ८७
बाग सुंदर ती शोभे तरुणी तीहि सुंदर
उन्मत्त भावनाचें तें तारुण्य अतिभास्वर. ८८
जातां निघून रागानें आईची जाहली स्मृति
एकदां वदली होती,
"मोहानें फसते मति ८९

घडेना उच्च ध्येयाचे कार्य कांहींच ही जरी
वाहुनी मानसा जाऊं नये देऊंच तें तरी ९०

जरी देत नसे कांहीं प्रकाश जगताप्रत
खद्योत तरिही राहे गगनांत प्रकाशत. ९१

तारुण्यांत मनीं राहे भावनावेग दुर्दम
विवेकाचा नसे त्यातें बांध त्या घडतो भ्रम." ९२

येतांच वच आईचे मनांत गमलें तया
बरें रागावली बाला जीवातें सावरावया. ९३

संग्राम जीवनीं झाला तेव्हांपासुनि तो सुरूं
आतां त्यास निराळें हें रूप आलें, पुढें सरूं ९४

प्रेमाच्या बगिचामध्यें प्रेमाचीं फुललीं फुलें
कृतिचे तीक्ष्ण कांटेहि पुष्पांपुष्पांस लागले. ९५

कांटयानें काटुनी कांटे आणूं सर्वहि तीं फुलें
रामाच्या चरणीं ठेवूं मनोभाव तदा फुले. ९६

जिवलगा, पाहूं रे किती वाट
हिंडतें, धुंडीते होई न भेटी रे ।।

गायनीं तिजला आली समाधीच जणूं खरी
कळे ना जाहली वेळा जाण्याची जीवनाघरीं १

मुखानें सूर येती ते चित्तही गुंतलें तरी
अदृश्य कुठल्या पाशीं, कासावीस घडे उरीं. २

शोधतें मी कुणा आतां, माझें मज कळेच ना
हुरहूर परी लागे, कशाची नच कल्पना ३

राजीव येथुनी गेले—गेली त्यांच्यासवें स्मृति
आशा सन्देशही गेला त्यांच्यासह चमत्कृति ४

राजीव सहवासाच्या विसरायास त्या स्मृति
जाहले कष्ट थोडे कां ? परी त्या स्मरते मती ५

देवाचा भक्त एखादा सोडावा निर्जनीं वनीं
पशूंच्या गर्जना येती ऐकाया तेथ नेउनी ६

किंवा त्या कोंडुनी द्यावें अंधारांत अहर्निश
कळावा न तया केव्हां उगवे मावळे दिस ७

तुकारामास सोडावें स्वर्गीं वा बदिंवासि ही
तरी गाईल वाणी ती 'पांडुरंग'च तेथ ही. ८

तसेंच जाहलें माझें राजीवाविण जीवन
जीवनाच्याहि संयोगे मिळालें नच चालन ९

आठवे मानसीं माझ्या तेंच सोज्ज्वळ वर्तन
विरोधें वाढते प्रीति जीवना अजि पाहुन १०

जपाया आवडी माझी जपतो हा खुळा किती
दाक्षिण्य दिसलें त्याचें बघतां तें प्रदर्शन ११

आणिला एक त्यानें जो दावाया आरसा मला
'बघा ह्यांत' असें केलें मी यदा तोंच लाजला. १२

'खरेंच चुकलों, हां हां पहा हा दुसरा अतां'
पाहतां तोहि मी केले हास्य तेंच पुनः तदा १३
परवां नच कीं गेला सिनेमा बघण्यास तो
'कपाळ दुखतें माझें' म्हणतां तोहि राहतो. १४
एकदा वदलों होतों राजीवास, 'कधीं तरी
चलावें फिरण्यासाठीं दूर दूर कुठें तरी.' १५
ऐकतां वदले होते, 'शोभे हें आपणांस कां ?
वडील अपुले-' कोठें दाक्षिण्य हृदयांत का ? १६
दाक्षिण्य म्हणजे सारी स्त्रियांची खुशमस्करी
गोड नांवांत ही आहे विषारी लपली सुरी १७
दाक्षिण्य पुरुषांचें हें अपेक्षित कसें असें
सुशिक्षितहि मोहाच्या वचनांनीं, घडे कसें ? १८
तोंच ठोका घड्याळाचा झाला एक तदा शशी
आली भानावरी पाहे, 'अहो मी स्वस्थशी कशी !' १९
कधीं ना फिरण्या गेलों जीवनासह आपण
जावें आज फिरायातें तयाच्या सह कीं पण २०
'चलतां का ?' पुसे जेव्हां सयुत्सुकच जीवन
तदा 'हो' म्हणुनी गेलों, पाळावा शब्द कां पण ? २१
पेटी ठेवून देऊन बसली आरशापुढें
लागली वेषभूषेतें, तिचें चित्त परी उडे २२

पुसला लावतां येतो रंग ओठावरी पुन:
भगल्या प्रेमरगाला चढे कां रंग हो पुन: २३
तरुणी जीवितामध्यें करते प्रेम एकदां
तेंहि अन् हृदयातून, फसतां न जडे कदा २४
प्रेमाची कांच ही आहे हृदयें प्रतिबिंबतीं
लागतां आस थोडीही असूयेची फुटेल ती २५
एकदां फुटतां सांधे कधीं कांच जगांत या
प्रेमाची फुटतां कांच न ती शक्य जुळावया. २६
अनसूया हवी तेथें नायिका तरुणी सदा
विवेकमेरु तो व्हावा नायकाच्या मनीं सदा २७
जगांत सौकुमार्याची सीमा होत जिथें अशी
लता ही प्रीतीची राहे एकटीच अहर्निशीं २८
करावें कितिही खोटें प्रीतिचें तें प्रदर्शन
अलंकार वृथा होती प्रेतावरति भूषण. २९
जाहली वेषभूषा, ती पातली बगिचामध्यें
रस्त्यावरूनिया कोणी 'नमस्कार' तिला वदे. ३०
'कोण बाई तुम्हीं ?'
'सांगू ? कुठुनी ओळखाल कां ?
परवांच्या सभेमध्यें हार मी घातला न कां ? ३१
योग्य तें अथवा आहे—थोरांतें सर्व जाणती
जाणेल कुठुनी सर्वां थोर—'
'बाई करा पुरें !' ३२
'थोरांतें जाणती सर्व' थोर मी जाहलें कशी ?
घालतां हार कां होते थोर कोणीहि क्षुद्रशी ? ३३

जीवनाच्या मुळें झालें थोर मी सहजें अहा !
द्यायचें कां न त्यातें हें प्रेम माझे, अतां पहा! ३४
ध्येयाचा साज तो सारा दुरूनी फक्त डोंगर
आणतां व्यवहारांत लागती मात्र फत्तर ! ३५
ध्येयाच्या मारिती बाता राजीव अपुल्यापुढें
जरा मी रुसतां खोटें दुःखांचे तुटले कडे ! ३६
ध्येयवेडे जगीं सारे फसती व्यर्थ पामर
खांडेकरांचे सगळे अपवादच नायक. ३७
ठेवावें ध्येय चित्तांत. परी योग्य मुळीं नसे
दुसऱ्यांच्याहि माराव्या भावना कां उगाचसें ? ३८
जीवनांच्या मुळें झालें थोर मी जगतांमध्यें
राजीवाविणही चालें अतां माझें सुखामधें. ३९
ध्येयाच्या उच्च बातांनीं वृथा मी फसलें किती
येतां विचार हा चित्तीं आली फिरून ती वरी. ४०
पहाते आरशामध्यें प्रतिबिंब तदा हंसे
ध्येयाचा धूर डोळ्यांच्या वरी श्यामल येतसे. ४१
पाण्यानें धुतलें तोंड टाकिलें पुसुनी पुन:
अंबाडा सोडिला वेगें विंचरीं केंस ती पुन: ४२
कंगवा फिरतो जेव्हां लांब केंसातुनी तिच्या
मुक्तता जाहली वाटे ध्येयाच्या बंधनांतुनी ४३
सोडूनी मुक्त केसांना पाठीवरति गातसे
गायनें चित्त बालेचें फिरूनी मग उल्लसे ४४
अंबाडा सोडूनी जातां वेणी ही गुंफिली तिनें
'राजीव जेथ तेथें हे आले जीवन' ती म्हणे. ४५

बघतां आरशामध्यें भासलें तिज पातले
हळूच मागुनी आणि जीवनें नेत्र झांकले ! ४६
आरशांत परी होतें दिसलें बिंब त्यामुळें
वदली, 'व्यर्थ सारें हें, नांव येथेंच बिंबलें !' ४७

कल्पना स्पर्शतां चित्ता रोमांच फुलती वरी
करतों पाप कां आहे ? आहे कां कल्पना वरी ? ४८
राजीवें मिटले नेत्र कधीं शशिकले तुझे ?
प्रत्येक समयीं हांसे विचारें चित्त या तुझें ? ४९

ध्येयाचा शुद्ध तो आहे दगडी देव पामर
मानवी भावनांनीं कां फुटावा त्यास पाझर ? ५०
एकदांच बगीचांत दाविला हेतु आपुला
क्षणीं त्या रुसतां खोटें ध्येय मेरूच लाजला. ५१
नीतीचा वाटलें केला व्यर्थ खूनच आपण
विरागें तो कुठें गेला लपवायास आनन ! ५२
नीतीचीं ब्रीद वाक्यें ती नीतिग्रंथांत शोभतीं
आचरूं म्हणतां सारीं जाते कुंठुन ही मति ! ५३
कला नि शास्त्र ह्यांच्यांत एक नांदे विरोध हा
भावना पोसते एक, दुजें ध्येय धरी महा. ५४
शास्त्रावाचून चालेना नराचे, वच हें खरें
भावनांविणही त्याचें चाले ना तितुकें खरें. ५५
विजेच्या शक्तिनें चाले कितीही यंत्र तें खुळें
आहे तसेंच कां सारें मानवी मन वेंधळें ? ५६
यौवनीं प्रणयाच्या त्या उठाव्या लहरी मनीं
ह्यांत दोष कुणाचा कां ? व्यर्थ रागावणीं न कां ? ५७

तोंच एक तिच्या चित्ता आठवे या क्षणामध्यें
सुनीत एक केलेलें मैत्रिणीनें, तयामधें—— ५८

पुसते तीच वृद्धांना, व्यर्थ कां कोपतां आम्हां ?
हो असे पत्र शांतेचें माझ्याच जवळीं अतां. ५९

आलमारीतुनी काढे पत्र तें वाचलें पुन:
सुनीत गोड शांतेचें–ऐकवूं आज जीवना ! ६०

" चष्म्यांतून करुन वक्र नयनें माझ्याकडे पाहतां !
अब्रह्मण्य घडे असें समजुनी कां व्यर्थ वैतागतां ? ६१

येतें कां अतिमानुषत्व मनुजा केसांस जैं पक्वता ?
तारुण्यास निखंदणें सहज कां येतां तया वृद्धता ? ६२

केलें दुष्कृत काय हें अम्हि जरी आम्हांवरी कोपतां ?
दृष्टी ही अमुची निसर्गसहजा सौंदर्य जें शोधतां. ६३

प्रीतीची फुलबाग यौवनदशा लावण्यशाली असे
सौंदर्यान्वित रम्यवन्य युवती तेथील राणी असे. ६४

जातां यौवन पार तें उलटुनी जाईल ती मौजही
वृद्धांनों ! तुमच्या पथावरि तदा येऊं निसर्गें अम्हीं !

चष्म्यांतूनि करूनि वक्र नयनें पाहूंच नाहीं परी
वृद्धा जेवि विराग तेवि युवका प्रीती सुनीती खरी. ६६

वृद्धांनों ! मग कां उगाच अपुल्या पुत्रांवरीं कोपतां ?
आशीर्वाद तयांस द्याल तुमची आहेच ती योग्यता !"

सुनीत वाचतां झाला तिला आनंद अंतरीं
काढुनी एक उंचीचें नेसे पातळ सत्वरीं. ६८

पाहूनी आरशामध्यें गॅलरींतुनि ती बघे
टांगे-घोडे नि मोटारी धांवती किति सत्वरें. ६९

धरून चाललें हात आईचा कुणि बालक
मोटार पाततां माता कडे घे मग बालक. ७०

फिराया निघती कोणी तरुणी युवकांसह
कित्येक ओळखीच्याहि दिसती तिजला तिथें. ७१

जीवनाच्या घरीं जाया निघाली मग ती शशी
'पहा आलोंच मी पांच मिनिटांत, पहा कशी.' ७२

वदलें कोणसें वाटे आलें भासे जिन्यामधें
आवाज जीवनाचा तो, 'आले तेच' मनीं वदे. ७३

जिना चढुनिया आला तोंच जीवनही वरी
'चलायाचें न कां ?' त्यातें पुसे शशिकला-तरी ७४

बोलतो शब्द ना एक पहातच उभा असे
'पाहतों तें खरें कां हा ?' भाव नेत्रांमधें वसे. ७५

'चलायाचें न कां' त्यातें पुसे शशिकला पुन:
'नसे शक्य' वदे, 'केवी यायची तुज कल्पना !' ७६

शब्द हे ऐकतां चित्ता धक्काच बसला तिच्या
अशाच भावना माझ्या नेहमीं कां जळायच्या ? ७७

'आलेंच पाहिजे तुम्हां फिराया आज जीवन !'
ऐकतां शब्द तो बोले, 'चला जाऊंच आपण. ७८

थांबशील जरा कां ग ? येतों सांगून मी तया
कचेरींत न जायाचें शक्य हें कळवावया.' ७९

'हो हो अवश्य जा' बोले. गेला जीवन सत्वरीं
सुशीला करते काय बघाया मग जातसे. ८०

सुशीलेच्याच खोलींत कुणी बोले दिसें तिला
ऐकतां कान देवोनी वाटे जीवन बोलला ८१

तोंच जीवनही आला बाहेर इतुक्यामधें
'चलावें' वदला तीतें बघतांच जिन्यामधें ८२

उत्साह जितका होता फिराया जायचा तिला
तितका ओसरे सारा, वदे परि, 'अतां चला.' ८३

परी रस्त्यांतुनी जातां पुनः संतुष्ट होतसे.
लोकांच्या दृष्टिच्या योगें तिचें चित्त पुनः हंसे. ८४

कितीक जन हांसोनी नमस्कारिति जीवना.
दृष्टींत भरला वाटे पूर्ण आदर हें मना. ८५

अशाच्या संगतीमध्यें रहाया ज्यास सांपडे
तयाच्या भाग्यरेषेची सीमा मुळि न सांपडे. ८६

'पुनः मी तुमच्यासंगें फिराया नच येईन.'
जीवना वदली तेव्हां हंसे शशिकला. 'पण– ८७

इतकें रुसण्याचें कां ? तयाचें काय कारण ?'
'मुक्यानेंच कसें बाई चालावें मग मी पण. ८८

जे जे जाती इथोनी हे तितके तुमच्या सवें
वृथाच बोलती सांगा माझ्यानें मग बोलवें ?' ८९

शब्दांच्या मधुनी आला स्तुतीचा दर्प जो तया
तयानें मोहुनी गेला. आलें त्यास हंसावया. ९०

इतुक्यांत करी त्यांनें 'नमस्कार' कुणी वदे,
"'निघालांत कुठें ? जातां अतां कां देवळामधें ?" ९१

"हो जरा आज जायाचें शंकरास असे मनीं."
'शंकरास?" पुनः बोले, "यायचें किति लांबुनी !" ९२

'सोमवार असे आज, घ्यायचें शिवदर्शन."
'खरेंच, इतुक्यासाठीं घ्यावें देउळ बांधुन." ९३

"प्रयत्न करितों आहे, भाऊसाहेब देतिल
कन्या त्यांच्याच ह्या...."
' हो, हो झालेंच मग देऊळ." ९४

"बरें" म्हणुनि गेला तो दूर तों तिजला वदे
"पहा हवेंच आहे तें देऊळ शहरामधें ९५

तिकडे आडगांवांत रामाची मूर्ति सुंदर
आहेसें वदती सारे, आणावी येथ ती तर." ९६
"आणूं देतील कां मूर्ती स्थापिती जी तिथें कशी ?
विरोध करती सारे...."
" आहे किमत कायशी ? ९७

विरोधास तयांच्या त्या पैशानें वळतील ग
पैशाचा मान आहे त्या वळवी सगळें जग." ९८

शब्द हे बोचले चित्तीं पटले नच ते तिला
पैशानें मारणें कां हो गरिबांच्याहि भावना. ९९

गरिबांच्याहि चित्तांत रामाची भक्ति कां नसे ?
नसे द्रव्य म्हणोनी कां भक्तीचा हक्क त्यां नसे ? १००

उद्यां ते जमती सारे अपुला राम रक्षण्या
द्रव्याचा धूर येवोनी प्रार्थना त्या बुजायच्या ! १०१

उठले जर ते आतां तयांचें व्हायचें हंसें
सारें जगच पैशाचें दास योग्यच होतसे. १०२

करावा शक्य तो सारा विरोध मग आपण
आणणें मूर्ति ती येथें कृत्य हें नच शोभन. १०३

विचारें या पुनः आलें विरागाचेंच झांकण
तिच्या चित्तावरी आली खिन्न ती मग होऊन. १०४

खिन्नतेंत परी झाला तिचा निश्चय कीं मनीं
खेडुतांच्याच जायाचें शक्य तों मग सेवनीं. १०५

राजीव काढला होता चित्तांतून तिनें जरी
तयाच्या शिक्षणानें हा केला निश्चय हो तरी -- १०६

किति कातरवेळा झाली बाई अजुन
कां परतायाचें झालें नच तिकडून ? १
कां कचेरीत ते अजून असतिल बसले ?
कां अकरापासुनि काम न त्यांचें सरलें ? २

परि पांच वाजतां रोज व्हायचें येणें
मग आज बाइ कां उशीर त्यांना होणें ? ३
हा गुलाब होता बागेमधि खुललेला
तोडुनी प्रीतिनें कोटावरि लावियला ४

'हें फूल आजला मुळीं न बघ वाळेल
राहील जसेंच्या तसेंच, तूं बघशील' ५
'इश्श, हें काय भलतेंच वदावें सखया
दो क्षणांत सारा रंग जातसे विलया.' ६

'कां मनांत तुझिया येंत उमर खय्याम
दे प्राशन करण्या सुरा मला अभिराम ७
जाईल फुलाचा रंग भंगुनी जरिही
तरि गोड स्मृतींचा वास त्याजला राही' ८

बोलुनी असें मग जवळ पातले बाई
वारितें न मी तों चुंबन घेऊनि जाई ९
प्रतिबिंब प्रीतिचें हृदयांतिल उठलेलें
तें अखंड रंगीं गालांवरि चढलेलें. १०

उन्माद प्रीतिचा झाला मनमोहाळ
अर्पिली प्रीतिची मजला मोहनमाळ ११
त्या गोड स्मृतीनें घालवायचा दिवस
ती स्मृतिच होतसे मीलनास जणुं नवस १२

वन्सं नी दीर ते कला नि माधवराव
नित करावयाची चेष्टा त्यांस सराव. १३
‘ बगिचांत बिचारा गुलाब झुरती भारी ’
वेणींत पाहुनी फूल म्हणाली स्वारी १४

‘ कां दिली तुम्हाला त्यानें अपुली वकिली ? ’
मी पुसतां स्वारी खुद्कन गालीं हंसलीं. १५
‘ उगवला न त्याच्या भाग्याचा तो दिवस
मज वकील व्हाया, वैनी, अजुनी वरिस. ३६

या मुळें बापुडा मला म्हणाला होता,
‘ मग जीवनयज्ञीं अनंतरावच होता. १७
ती पत्नी त्यांची लुटते रोज बहारी
मज उमलायाची पहा जाहली चोरी.’ १८

‘ चोराचा उलटचा हव्या कशाला बाता
पत्रास काय ती ! व्यर्थ वकीली करतां! ’ १९
ऐकतां बोलणें खूपच हंसलीं सारीं
मग लाजलाजुनी गप्प बैसली स्वारी. २०

हा विनोद फुलवी अंतरांत प्रणयातें
कधि वाटे सांगिन हितगुज आज प्रियातें. २१
येतांच घराला हंसतिल बघुनी मजला
मग हसेन मीही गुलाब, बघुनी खुलला २२
‘हा गुलाब दिनभर तापानें ना सुकला ?’
‘ परि फुलूं शके तो पुनः जरी चिमलेला. २३
घटमुखांतुनी वरि सिंचित होतां नीर ’
ते येतिल बोलुनि असें जवळ मग फार २४

37548
नाशिकला

'इश्श हें काय' मग ठरीव म्हणुनी दूर
जाईन पळोनी, धडधड करिलच ऊर. २५
' हें पहा, आज मी थकलों आहे फार
मुळि पळवेना मज, वयही नच कां थोर ?' २६
विनवणी करोनी सादर करितिल अर्ज
'कां थकवा इतुका यावा बाई आज !' २७
परि काय कल्पना करित अशी मी बसलें
चंद्रास मानित्या स्त्रीमुख कविवत् फसलें, २८
मनमोहक असुनी बाई काव्यच फसवें
नसतांहि पंख तें उडतें नभिं विहगसवें. २९
कल्पना नभींचा गोड गोड संचार
प्रत्यक्षीं परि दुःख नाचतें स्वैर ३०
कल्पनावारुतें लगाम कुठला बाई
कोशांत त्याचिया 'अशक्य' शब्द न राही. ३१
भलभलते म्हणुनिच विचार चित्तीं येती
झालें न यायचें म्हणुनी भीती देती. ३२
असतील फिराया गेले मित्रांसहित
किंवा ते बसले असतिल गप्पा करित ३३
कां लहान अजुनी हरवाया आहेत ?
जातील कसे वा मोडुनि मनिचा हेत ? ३४
या परी वारितें चित्ताला मी कितिही
तरि समाधान त्या नाहीं हो लवलाही. ३५
जाहली निजानिज, निजलीं बाई सारीं
एकटी पाहतें टकमक मी अंधारीं. ३६

ह्या कला वाचतां पुस्तक झोपीं गेल्या
नाहींत काळजी निद्राहर त्यां उरल्या ३७

राजीव लोपला, गेला पळुनी जों न
तो जीवन आला, विधिचे तिज वरदान ! ३८

परि मनांत मजला हेवा कां वाटावा ?
तों अज्ञ जीव ना हेवादावा ठावा ! ३९

'तो अज्ञ जीव ना हेवादावा ठावा'
अनसूय कसा परि स्त्रीचा जीव रहावा ! ४०

राजीव बोलतां क्षणभर मजशीं, पाही
तों ठाण असूया मांडुनि चित्तीं राही ! ४१

भलतीच परी मनि येउ न शकते शंका
राजीव तिचा तो मंगलमय नाहीं कां ? ४२

राजीव बोलले काय आज तें सगळें
नित सांगत होती मजला ती लडिवाळें ४३

'राजीवजीवनीं राहिन मी आजीव'
तो वदुनी होता गेला भोळा जीव. ४४

तारुण्यप्रांगणी पडलें पाउल पहिलें
त्या भोळया जीवा जगिचें वारें कळलें. ४५

राजीव भृंग तो बघतां फूल नवीन
हौसेंतच गेला असेल बापुडा उडुन ! ४६

शशिकला फूल हें क्षणभर बसलें चिमुन
फुललें न पूर्ण तें, म्हणुनि न गेलें सुकुन. ४७

जीवनें त्यावरी सिंचन करितां थोडें
गंगेंत, वाटलें, अपुले न्हाले घोडे. ४८

अनुभूति जाहली मनास तिचिया आतां"
देईल ती नच वाहुनि अपुल्या चित्ता ४९

हे येथें निजलें मजेंत माधवराव ?
हा घोरत पडला येथें अन् मधुराव ? ५०

वाराहि झोपला, शांतच सारें गगन
हा चंद्र झोपला, सुन्न जाहलें भुवन. ५१

एकटीं परी मी जागी काय म्हणून ?
कुणि नेली माझी झोप बाई चोरून ? ५२

या अखंड विश्वीं मीच आगळी राहे
या जगांत कुणि कां मत्सम दुःखी आहे ? ५३

मी वाट पाहतां थकलें सायंकाळीं
जिवलगा पाहुं मी वाट किती या वेळीं ? ५४

तारका सांगती चंद्रा निज हितगूज
तों चंद्र देतसे किरणांचा त्यां साज ५५

ही उत्सुक वेलीवरती कलिका हासे
दंवबिंदूंना ती साद घालिते भासे ५६

येऊन प्रभातीं हळुहळु ते तिजजवळीं
चुंबितील तिला तों, लाजे कलिका भोळी. ५७

मी कुणा सांगणें मनिचें कढणें रुसणें ?
ठेवुनी मनांतच वरवर प्राप्तच हंसणें ५८

हो, पटे मला तें सुनीत अजि शांतेचें
जे त्यावेळीं भासे वच रडक्याचें. ५९

"पूर्वीचें फिरलें अदृष्ट म्हणुनी या यातना मन्मना
हा हा ! निष्ठुर दैव दावित कसें क्रूरत्व या जीवना! ६०

'नोहे जीवित दुःखपूर्ण' म्हणुनी सांगोत वेत्ते मला
सौख्याच्या कलिकेंत अश्रुजल जें सामावलें--! ६१

हांसे जीव वरून तुष्ट दिसतो, चित्ती परी सर्वदा
दुःखांचा अति दाह जो धगधगे पाहूं नका तो कदा, ६२

ठेवा दूर स्वदुःख तें हृदयिच्या अंतर्गृहीं हांसवा
हांसोनी जगतास, तैं जुळतसे आशा नि सिद्धी-दुवा. ६३

ज्याचें तत्व असें असेल जगतीं जीवास आशा कुठें-
जेथें बंध धरोनि दुःख हलकें होई-निराशा सुटे? ६४

दारिद्रीं मरणें क्वचित सुखकरी होईल या जीवनीं
संपत्तींतहि मारितां हृदय कां होतो सुखाचा धनी? ६५

सोन्याची जरि रास येउनि पडे जीवा सुखाशा नसे
दुःखांतेंहि सहानुभूति-जल पैं सौख्याप्रती नेतसे." ६६

परि सान्त्वन करण्या मनिचें माझ्या कोण ?
मी दुःख वदूं ज्या हक्कानें-तो नच येत ! ६७

गत जन्मींचें कीं पापांचे समुदाय
मम सौख्य मारण्या धाडितसे प्रभुराय ! ६८

जरि आज मला त्या पापांची जाणीव
नाहींच, तरी तीं येतीं हळु गाळीव. ६९

तें गायन शिकणें बाल्यि विलया गेलें
नानांच्या रागें राग भंगुनी गेले ! ७०

किति उत्सुकतेनें टवकारावे कान
जों ऐकायातें यावें कुठुनी गान. ७१

किति मजेंत शिकणें स-र-ग-म नव रागांचे
तानांत भानही समूळ हरपायाचें ! ७२

परि 'लक्ष नसे तव मुळिंहीं घरकामांत'
'जा' आई बोले, "थांबिव तव तें गीत." ७३

ऐकतां शब्द हे नाना रागें भरले,
"जा नाचायातें खुशाल आतां" वदले ! ७४

प्रार्थना करि तसे कलिका दंव बिंदूंना
तो नेलें खुडुनी मुरगाळुनिया माना ! ७५

परि पुढें वाढलें वय जों जितकें माझें
तों राग पित्याचा–वाढे म्हणुनी ओझें ! ७६

ना रूप, रंग ना. शिक्षण नच–अंगांत
एकही कला ना–घेइ न कुणि पदरांत ! ७७

वय वाढ वाढलें–झालें एकोणीस
'ही कुळांत कुठुनी' वदती 'आली अवस.' ७८

जरि क्षुद्र असावी कण्हेरिची ती कलिका
कां वसंत येतां फुलण्या होइ न चटका ? ७९

ती भिकार पर्णी अपुल्या डोलत राहे
जरि भृंग एकही तिला न मुळिंही पाहे. ८०

ती लाजलाजते मुरडुनि अपुल्या ठायीं
मधु विलासांत ती तरिही तन्मय होई. ८१

भरभरे फुले हा वसंत भरज्वन्निचा
तो चित्तीं माझ्या रंग भरे प्रणयाचा ८२

मग लिहूं लागलें गोष्टी मी प्रणयाच्या
त्या काव्यप्रांगणिं चित्तवीचि हंसण्याच्या ८३

'अनसूया' घेउनि नांव छापिल्या गोष्टी
हें कळतां नाना परंतु झाले कष्टी ! ८४

अन् कडाडले ते, 'छान राखिसी नांव !
हे नव्हते स्वप्नीं पाहियले मी भाव !' ८५

त्या दिनीं वाटलें जगतीं जीवन नाहीं
मज जगण्यासाठीं, भाग्यच अडवें येई ! ८६

नरजन्म फक्त कां ज्वालामुखि दुःखांचा ?
वरि शांत परि हा आंत डोंब आगीचा ! ८७

त्यांतुनीं स्त्री असे खंदक रसरसणाऱ्या
दुःखांचा राहे अंगारच भकणाऱ्या ८८

आजन्म तेवतें नीरांजन प्रभुपुढतीं
नच ठावें त्यातें देव दगड वा पुढती. ८९

पाषाण कोरडा कुठल्या बरडावरचा
शेंदूर फांसुनी हां बस् ! देव व्हायाचा ९०

लावुनी नेत्र मग कुठवरि त्वां तेवावें
नीरांजन दीपिके ! फळतिल कां तव धांवे ? ९१

मी शांत पहुडलें अंगणांत त्या समयीं
चाहूल लागली—जवळ कुणीं कां येई ? ९२

हो, नराकृती ती जवळ पातली बाई
अन् चटकन वांके चुंबण्यास लवलाही ९३
ही कण्हेर प्याया भ्रमर कोठला आला
कां जन्म तिचा नच सफल आजला झाला ? ९४
परि आर्यत्वाचें रक्त खेळतें होतें
सीता नि रुक्मिणी जीवित स्मरणी येतें. ९५
जरि उत्सुक होतें प्रणयरसातें सु-मन
तरि आर्यत्वाचें साहवे न त्या मरण. ९६
उसळून सत्वरीं, मारियली मी लाथ
थोबाड रंगलें, पळतो तो भयभीत. ९७
त्या क्षणींच माझी पाठ मात्र थोपटली
नानांनीं वदले, 'लाज आज राखियली !' ९८
हा प्रसंग जिकडे तिकडे गेला, झाला
मग गाजावाजा, मोद मनीं मग झाला. ९९
हा प्रसंग ठरला सौभाग्योदयकाल
श्रीमंत घराणें विवाहिं मज लाभेल ! १००
हें जिणें पातलें सौख्यीं क्षणभर जीवा
तों आज पुन: हा डोंब वरी उसळावा ! १०१
किति कातरवेळा झाली बाई अजुन
कां परतायाचें झालें नच तिकडून ? १०२
चाहूल लागली तोंच कुणाची मजला
जों पाहे तों मग जीव कसा गोंधळला ? १०३
तो आला माझ्या समीप पुसलें कुंकू !
अन् वदे हांसुनी, 'करिसी कां तू कां कूं ?' १०४

'चल् चहाटळा ! तूं कोण दुष्ट पुसतोस
अबलेचें कुंकू ? प्रश्न असा पुसतोस ! १०५

कां लाज नसे तव अंतरांत ? तूं कोण ?
तूं कोण मला तें सांग अधीं तूं कोण ? १०६

कां पुढेंच येसी, सरसी पुढतीं कैसा ?
कां जाती तुटुनी पाय तुझे व अपैसां ?' १०७

मी वदे असें तों, येत हळूच पुढें तो
माराया त्यानें हात न पुढतीं येतो ! १०८

हें जीवन माझें असेंच—
सरली रात !
भंगलें स्वप्न तें—काव्य विरे गगनांत १०९

तो जीवन उठला 'गौरी गौरी' म्हणुनी
त्या दिसली बाला निजलेली नव तरुणी १
झोपेंत तिचा तो पदर जरासा सरला
बाजूस, तिचा तो रम्य भाग त्या दिसला २
पडुनिया स्वप्न जी भीती होती चित्ता
उरली न मुळिंही, 'स्वप्नच तें' हें कळतां ३
परि उलटें झालें प्रसन्न मानस त्याचें
मग गौरीजवळीं मनांत ये बसण्याचें. ४
तो हात धरूनी बसला मग तिजजवळीं
पाहतां हांसला कुंकुमतिलक कपालीं ५
'हव्यास फुकाचा हवा कशाला तुजला ?
था जगीं कोणता धनी तयाला उरला ?' ६
ते दूर कराया भालावरिचे केस
तो फिरवूं लागे हात आपुला खास. ७
'चल' चहाटळा, तूं कोण दुष्ट पुसतोस
अबलेचें कुंकु ?'
'काय बरळतेस ? ८
कोणास बोलसी आहे ना तुज ठावें
कां उगाच असलें स्वप्नामधि बरळावें ?' ९
तैं डोळे उघडुनि बघतें मग तों गौरी
पाहते आपुल्या पुढें धर्म-गिरि-धारीं ! १०
गांवांत उभ्या ह्या कीर्तिगीत गातात
प्रेमाने सारे-जीवन पुढतीं येत. ११

दावण्या आपुलें धर्मविरिचें प्रेम
तो बांधित आहे मन्दिर नव अभिराम १२

पायांत त्याचिया मजसम कष्टीजीव
चेंगरे तरीही कुणा न ती जाणीव १३

मम ओरडणें तें अरण्य रुदनच झालें
प्रार्थना नि धावे मुळिंहि न कानीं आले. १४

कां पायावरती दुःखाऱ्याच उठावें
सौख्याचें मन्दिर ? श्रीमंतें बांधावें ! १५

पायांत चालतें रडणें नित्य जिवाचें
देईल हात त्या कुणी न कधि यायाचें ! १६

परि मीच भाबडी वेडी जगतीं ठरलें
मोहाच्या पाशीं गुंतुनि अधुना फसलें. १७

हें हवें कशाला होतें वैभव मजला
जें मिळवायातें सोडियलें मी पतिला. १८

अन् आलें याच्या मागुन बाई फसुनी
तें स्वप्न भंगलें–
'बसशी कां ग रुसुनी ? १९

कां कुणीं तुझा उपमर्द आजला केला
कां दगडू तुजला उलटुन कांहीं वदला.' २०

'दगडू न बिचारा चुकला कांहीं कधिही
ती वदते, 'चुकणें त्याच्या धर्मी नाही.' २१

'कां अशी फारशी स्तुती तयाची चाले ?'
हे शब्द मनाला कांपत तिचिया गेले. २२

'परि खिन्न जरा मी झालें आहे बाई
आतांच मला जें स्वप्न पडे भयदायी.' २३
'वा:! आलों होतों मीहि स्वप्न सांगाया
तूं सांग तुझें तें–बसतों मी ऐकाया.' २४
'स्वप्नांत पाहिलें–रानीं निजलें होतें
पतिदेव जवळही माझ्या निजले होते. २५
किती वेळ चालला अमुचा मधु संवाद
मुळि नव्हता त्याला खंड–झोप तों येत. २६
कुणि कृष्णमूर्ति मजजवळ पातली बाई
अन् लागे पुसण्या कुंकू ! वा नवलाई !' २७
तों जीवन हांसे पोट धरुन मोठ्यानें
'कुणि अडविल कां ग कृष्णातें हट्टाने ? २८
तो कृष्ण देव ना ? विश्व कुटुंबच त्याचें
वाहुनी त्याजला युवति पुष्प द्यायाचें ! २९
ह्या गोकुळवासी सुंदर गोपी तरुणी
ऐकतां बांसरी येतो त्याच्या भजनीं. ३०
तूं राधा सुंदर लाभलीस ग मजला
मी कृष्णदेव ना तुझाच प्रियकर काळा.' ३१
बोलुनी असें तिज जवळ ओढलें हृदयीं
त्यायोगें बाला दुःख विसरुनी जाई. ३२
परि नसे तिला मुळिं मनांत कीं जाणीव
पाशांत खलाच्या फसतो आहे जीव. ३३
तिज वदे दुष्ट तो: 'स्वप्न सांगतों माझें
मज दिसे काल कीं शौर्य तुझें बहु साजे. ३४

मी बांधित आहे मन्दिर जें अभिराम
तें पाडायालें आले धांवुनि कोणी ३५
तो पुढें म्होरक्या घेउनि सकला आला
धोंडे नि दगड तो खूप फेकता झाला. ३६

पोलीस पातले, त्यांचेंही चालेना
तों गोंधळ झाला एकच झाली दैना. ३७
मम सर्व पळाले साथीदारहि दूर
अन् शत्रू आला उभा पुढेंच समोर. ३८
करणार वार तो डोक्यावर जों माझ्या
तों लाठी गळली, पडली खाली त्याच्या. ३९
मी वळून पाहतों तोंच तूंच दिसलीस
मज कळली नाही जादू जी भरलीस. ४०

तों घट्ट तुला मी आलिंगन मग दिधलें
अन् उठुनि पाहतों, स्वप्नच तें हें कळलें.' ४१
'श्रीराम रक्षणा समर्थ तो सकलांचा
तो करो नि संकट सर्व हरो, मम वांच्छा– ४२
जे दुष्ट आपणां त्रास द्यावया बघती
श्रीराम तयांची करील माती माती.' ४३
'वा: भोळी राणी गौरीदेवी अमुची
ही वृत्ति भाबडी अशीच होय खुळ्यांची ! ४४
कोठला देव अन् राम तोहि ग कुठला ?
करणार काय तो फत्तर खाणीमधला ! ४५
'हीं अशींच चालतीं सर्वच सोंगें ढोंगें
तीं करुनि करावें सर्व भाविकां नंगें ४६

हा धर्म आमुचा–'

"पुरे कराना बाई—

बोलणें काय हें – ?"

"दैवत तुजविण नाहीं. ४७

तूं सीता माझी राम तुझा मी सखये
मी कृष्ण रुक्मिणी तूंच जगीं या विजये. ४८

ही मंगल घटिका उदया आजच आली
अन् मन्दिर अपुलें––"

जादू अपुली कळली ४९

हें मन्दिर अपुलें नाहीं कांहीं सखया
ते श्रीरामाचें अन् सीतेचें राया ५०

कोठले कोण जन मंदिर बान्धुनि देती
श्रीराम एकला––'

'फत्तर काळा जगतीं ५१

'हं आज व्हायचा सुरू पायवा त्याचा
तो कार्यक्रमही अतांच उरकायाचा ५२

अध्यक्ष आमुचे भाऊजी रघुवीर
ते आज सकाळीं कोनशिला धरणार.' ५३

'मी मुळीं आजला ऐकत नाहीं तुमचें
तो मंगल उत्सव मनांत ये बघण्याचें !' ५४

ती गौरी वदली हातीं कर घेवोनी
'अन् उठली वेगें आवरसावर करुनी. ५५

तूं काय येऊनी सांग तिथें करणार ?
तुज कळतें कांहीं ?'
'हो हो'
अन् रुसणार.' ५६

'मी रुसेन अथवा–'
'हंसेन,
तुमचा नाहीं–
तो प्रश्न-तुम्हां काम दुजें कां नाहीं ?' ५७

अन् अखेर घेउनि तिजला जीवन गेला
तों दिसला त्याला जमलेला जनमेळा. ५८

आबाल वृद्ध ते सर्व तिथें जमलेले
पाहून जीवना कौतुक चित्तीं आलें. ५९

हे भाविक सारे खरेंच कां असतील ?
छे ढोंगी सगळे नंबर एक बनेल ! ६०

हे येथें येउनि कुटती टाळ जरीही
चित्तांत प्रभूचें नांवहि त्यांच्या नाहीं. ६१

'हो, नमस्कार हं' भाऊजीस वदे तो
शशिकलेस करतां वन्दन किंचित् हंसतो. ६२

'ह्या गौरीदेवी–' सांगे जो कलेस
तिज बघतां वाटे पाहियलेलें हीस. ६३

'ह्या कोण ? ' विचारी 'तयास तुमच्या सांगा
मज स्मरतें ह्यांना पाहियलेलें —सांगा.–' ६४

‘ ही आहे माझ्या मामांची हो मुलगी–’
मनिं गौरी हंसली ऐकुनि असली सलगी. ६५
परि कलेस कसली शंका स्पर्शुनि गेली
आठवते कां शंका मनिं ही आली ६६

कीं संभ्रम अपुल्या मनास आहे झाला
परि शक्य नसे हें स्पष्टच स्मरतें मजला. ६७
ह्या कुठल्या आल्या नवीन गौरीदेवी ?
मज वाटे भरली ह्यांतच बनवाबनवी ! ६८

भलतेंच साम्य हें कसे बरें उमटेल
ते चर्येवरचे भाव कसे लपतील ? ६९
ही एके दिवशीं घरास आली होती
उरलेलें अन्नहि घेउन गेली होती ! ७०

घरधनी हिचा तो गाय राखतो माझी
परि गेला तोही–स्मृति कां फसवी माझी ? ७१
जीवनीं भरे कां ह्यांच्या काळेंबेरें ?
ह्या मधुनी होईल काय ग चित्त थरारे ७२
‘कां ओळखलें तूं नाहिंस ह्यांना बाळे ?’
तिज जवळीं येउनि भाऊ तिजला वदले. ७३
‘ते दख्खनचे जे प्रसिद्ध रंगोशास्त्री
त्यांच्यांच पातल्या आज इथें आर्यस्त्री. ७४

त्यांनाच निमंत्रण गेलें होतें माझें
परि वेळ न त्यांना म्हणुन न येणें त्यांचें ! ७६
तरि हरकत नाहीं गौरी देवी आल्या’
तों गौरीदेवी मनांत अपुल्या हंसल्या ! ७६

वाटलें तियेला सांगुनि तें टाकावें
परि शब्द कसे ते वदनामधुनी यावे ! ७७

एकदां करावें असत्य भाषण जेव्हां
लागतों कराया नित्यच नर तो तेव्हां ७८

अन् जीवन तिजला बडवुनि हांकलतील
मग सोडुनि त्यांना कोठें ती जाईल ? ७९

'श्रीराम राम जयराम राम तों चाले
मग लक्ष्य तयांचें तिकडे सारें वळलें ८०

तो जीवन पुढतीं होउनिया सकलांच्या
गद्गदून काढी मुखांतुनी ही वाचा ८१

"हे भाविक जनहो वन्दन माझें सकलां
हा प्रसंग मंगल बघण्या जे जे जमलां ८२

कलियुगांत कोठें महत्व धर्मा नाहीं
देवास मनांतुनि मानत नाहीं कुणिही. ८३

सर्वत्र मजला दांभिकतेचा थाट
म्हणुनीच जाहले सर्व दुष्टही धीट ८४

परि जमाव बघुनी आज इथें हें वाटे
हे खरेच भाविक-मोद मनीं मम दाटे ८५

या कोनशिलेतें भाऊजी धरतील
तों धर्मस्मृतिचें शिंग उच्च वाजेल. ८६

मज फक्त सांगणें प्रसंग एकच आहे
गांवांत आपुल्या नारायण जो राहे ८७

रात्रींत त्याजला काल स्वप्न कीं पडलें
स्वप्नांत तयाला रामचन्द्रजी दिसले.” ८८

निघतांच शब्द हे एकच जयजयकार
‘श्रीराम राम जयराम’ चालला गजर ! ८९

“परि पुढचें परिसां वदले राम तयाला,
‘मी पडलों आहे गड्या एक बाजूला. ९०

हें मन्दिर मजला मनांतुनी रे रुचलें
मज येथें बसवी आणुनि मनिं हें आलें.’ ९१

हा चमत्कार मी तुम्हास जो सांगितला
तो नारायण पण खराच वेडा झाला ! ९२

श्रीराम राम तो गर्जत सदनीं राही
हें कार्य करावें अपुल्या भाग्यी येई.” ९३

इतुकेंच बोलुनी जीवन खालीं बसले
तों बोलायातें भाऊजी मग उठले. ९४

“हे भाविक जनह्यो वन्दन घ्यावें माझें
तुमच्यासारखा रामभक्त जो साजे ९५

कलियुगांत होईल तितुकी तरि प्रभुसेवा
करण्याची इच्छा मनांत माझ्या देवा ९६

या साठीं मन्दिर प्रभुचें बांधुनि दिधलें
मज वाटे सार्थक जन्माचें मम झालें ९७

‘ही कोनशिला मी धरणारा तो कोण
प्रभुजीच करी हें माझ्या करविं जाण. ९८

परि प्रसंग पुढचा बिकट पातला आहे
तो बघणें आहे कुणाकुणाला साहे. ९९

सुरसारीं अपुली राममूर्ति जी राहे
ती येथें येणें प्राप्तच आलें आहे. १००

परि अज्ञ जीव ते उगाच जर लढतील
तरी काय करावें प्रश्नच आज पडेल—" १०१

"तो राम हलविणें इष्ट तुम्हांला नाहीं."
इतुक्यांत बोलली कोणी तरि हें बाई. १०२

"शशिकले, काय हें तूच असें वदतेस?"
"हो भाऊ, माझी मान्यता न अपुणांस!" १०३

"चल वेडी कुठली स्वस्थ जराशी बैस."
ती उठली, वदली "घाला मग हैदोस—!" १०४

# ७३ प्रीतीचा रंग उडाला ! शशिकला

नील नभाची प्रशान्त सुन्दर गभीरता गेली
आणि तयावर मेघांची मग गर्दी ही झाली १
पाउस नाहीं–ऊनहि नाहीं–भासे कोन्दटलें
विषण्णतेचें भणभण वारें सर्व दिशां सुटलें २
सांज सकाळीं रोज दिसावी अरुण उषा लाली
कवि वदती ही दिग्वदनावर प्रीतिच कीं खुलली ३
जरा फिरावें इकडे तिकडे मौज ह्यांत वाटे
परंतु भरली उदासीनता नगराच्या वाटें ४
सृष्टिदेवता खिन्न जाहली सुनें सुनें भासे
गायन, नर्तन, वाचन, वादन कुणास नच सोसे ५
सुमनें चिमलीं--बसलीं अपुल्या गाळुनिया माना
पवना येउनि तूं तरि रिझवी हंसवी रे त्यांना ! ६
झुळझुळ वाहे उदासवाणी नदी दिसे थकली
पूर्वीची ती खळखळ पात्रीं तिच्या न मुळिं उरली ७
सुमना, पवना, सरिते, देवी उषे, सख्या अरुणा !
काय जाहलें सांगा भरली कां ही हो करुणा ? ८
काय ओढवे प्रसंग बांका स्वर्गींच्या देवा
काय चालला विष्णुपदाशीं त्यांचा हो धांवा ? ९
कोण मातला असुर काय हो भूवर वा नाकीं
म्हणुनि देवता अमुची अपुलें सौन्दर्यहि टाकी ! १०
कलियुग आलें संपत भरला काय घडा त्याचा ?
प्रलयकाल कां आला जवळीं भेसूर नाशाचा ? ११
काय जाहलें तेंच कळे ना परि रुसवा कां हा
बोला बोला वनदेवींनो, टाका रुसवा हा १२

वनदेवींनो तुम्हींच रुसतां आणि कुणा बाई ?
रुसवा तुमचा घालविणारें तुम्हांविणें नाहीं १३
अमुचें कढणें रुसणें मनिचें तुम्हांस सांगावें
तुम्हींच रुसतां काय तरी मग आम्ही बोलावें ! १४

चूक आमुची काय जहाली तें तरि सांगा ना
तुम्हांवाचुनि कोण अम्हांला रक्षिल बोला ना १५
कसें मनांतिल समजावें तें तुमच्या ग बाई
मनकवडेपण तें आम्हांला तुम्हीं दिलें नाहीं ! १६

उगाच आम्हीं फुशारक्या कां माराव्या असल्या
तुम्हांवाचुनि बाता अमुच्या साऱ्या हो फसल्या ! १७
तुम्हीच अमुच्या सूत्रधार अन् कर्णधार देवी
तुम्हांवाचुनी कोण यशाचा मार्ग अम्हां दावी ? १८

प्रीतीचा कां रंग उडाला भीती मनिं भरली
असेल हें जर मरणाविण मग गति आम्हां नुरली. १९
मरणांतहि पण अन्त्य पळीं कां मिळायची नाहीं
मांडी तुमची अंगाई ती—भाग्यच कां नाही ? २०

वनदेवीनों, बाळांचें हें मरण पाहवेल
झालें असलें काय सुकावी प्रीतीची वेल ? २१
प्रीतिवेल ही तुम्हींच अगणिं अमुच्या लावियली
फुलें प्रीतिचीं यथाकाल तिज सुन्दर तीं आलीं २२

आणि धरेवर स्वर्लोकींचा सुरगणही येई
सकलांना त्या अवनीवर पार जागा मग नाहीं २३
वाटत होतें दिव्य आमुची प्रीतीची वेल
वनदेवींनीं लावियलेली कधिहीं न सुकेल २४

प्रीति देवता रतीच येथें येउनिया गाते
अनंग येथें येतो--त्याने सौन्दर्यहि येतें २५

प्रीतिबाग ही फुलली अमुचीं प्रीतिफुलें हंसलीं
परन्तु सुकुनों हाय फुलें तीं आज कशीं गेलीं ! २६

अजून घुमतें हृदयीं अमुच्या प्रीतीचें गान
जें गातांना एकरसानें हरतें नित भान २७

त्या गीताचे सूर जुन्या त्या स्मृती मना देती
अन् मरतांना प्राण आमुचे फारच तळमळती २८

वनदेवींनों, ऐका ऐका गीत अतां ऐका
प्रीतिवेल ही सुकतां चाले विषण्ण तें ऐका २९

गाणारी ही बाला एकच गमली जरिही हो
तिच्या सारख्या सर्वच तरुणी फोडतात टाहो ३०

कले ऐकवी तुझें गान तें अपुल्या देवींना
मग बघतों मी येइल करुणा काय तुझी त्यांना ? ३१

“प्रीतीचा रंग उडाला !
फुलबाग आमुचा सुकला.
तूं जीवाचा प्राण
तूं माझें रे जीवन
परि जीव ह्यामधें फसला ३२

तूं प्रकाश विश्वांत
तूं आनन्द मनांत
गगनांतच तो रे विरला ३३

तूं जीवन--संज्योत
तूं जीवित मूर्तिमन्त
तो दूर दूर अतां सरला" ३४

खिडकींमध्यें कला येउनी तेव्हां हो बसली
गीत गाउनी खिन्न मनाशीं अधिकच ती झाली. ३५
मन:पटावर आठवती तिज झालेल्या गोष्टी
राजीवातें बघतां पुढतीं झाली ती कष्टी ३६
प्रीतीचा तो रंग उडाला भेसुर भासे ती
अन् मालवली अपुली तेंव्हां जीवाची ज्योती ! ३७

प्रीतीचा रंग उडाला !

राजीवांच्या सहवासाचें चित्र रेखिलेलें
रेघोटया परि फांसुनि त्यावर फाडुनि तें दिधलें ३८
अंबाडा तो सोडुनि अपुला वेणी सोडियली
पाठीवरती तेव्हां वाटे मुक्ति खरी झाली. ३९
राजीवांच्या सहवासाचें जीवन मम सरलें
आणि जीवनीं जीवन अपुलें एक असे केलें ४०
योग्यच झालें राजीवांनीं मजला सोडियलें
राजीवांचें महत्व जीवा आतां ह्या कळलें ४१
पश्चात्तापें आतां जळलें जीवन हें सरलें
राजीवांच्या पुढेंच परि तें हवें अतां पडलें ! ४२
राजीवांच्या सहवासाची योग्यताच नाहीं
या जीवाला—नाहीं तितुकी माझी पुण्याई ! ४३
परन्तु त्यांच्या उपकारांचें ओझें मी वाही
हेंच करावें जरी व्हायचें त्यांतुनि उतराई. ४४

अनुक्रम ... दि: ...
... नां: शशिकला

धर्माचें हें सोंग चाललें घरांत माझ्या जें
ढोंग आणणें उघडकीस हें ब्रीद मला साजे. ४५

राजीवातें माझ्या होती ढोंगाची चीड
फेंडावें तें असेल त्यांची मजला जरि चाड ४६

असते येथें तरी तयांनीं केलें हें असतें
परि त्यांच्याविण कार्य आपणां प्राप्तच आलें तें ४७

भाऊजी रघुवीर ! तुम्हांला वन्दन मी करितें
पिता नि कन्या नातें अपुलें क्षणात या सरतें ! ४८

क्षमा करावी बोलला परि विसरूनि जावें या
धर्माचें हे सोंग पाहवे तिला न परि राया ४९

राजीवा ! शशिकला तुम्हाला वन्दन ही करितें
करितां वन्दन परि ती अपुल्या मनांत घाबरते ! ५०

कृत्य तुम्हांला ठावें माझें कितपत हें रुचतें
रुचलें नाहीं तरी मनींचें कार्य सर्व करितें ५२

मम प्रीतीचा रंग उडाला–चढवाया फिरुनी
प्रयत्न केला तोही फसला–गातें रडगाणीं ५२

मम प्रीतीचा रंग उडाला–जीवन हें सुकलें
आणि जीवनीं एक होउनी पुन: न तरि फुललें ५३

मम प्रीतीचा रंग उडाला–हतभागी बाला
रडते, देते बोल आपुल्या अधुना नशिबाला ५४

मम प्रीतीचा रंग उडाला–सुटलें घरदार
शून्य मनानें विरहत फिरणें जगांत मी स्वैर ५५

मम प्रीतीचा रंग उडाला--झालें बेचैन
राजीव ! मम जीवनदेवा ! संभाळा प्राण ५६
आणि हुंदके देत कला ती बसलेली खिन्न
'दिसला माझा हिरा ?' ऐकतां झालें मन सुन्न ५७
डोळे भरूनी वरी पाहते माता ती दिसली
राजीवांची, बघतां तिजला घट्ट तिनें घरली ५८
घळघळ ओघळ नयनांमधुनी, शब्द नसे येत
हृदयामधलें दुःख उफाळे प्रियजन भेटीत ! ५९
राजीवांचें नांवहि भाऊ कधीं न घेतात
म्हणुन कलेच्या मनास ते नच सान्त्वन देतात. ६०
'आणि जीवनीं जीवन अपुलें मिळवी' म्हणतात
मला कळेना उलटी त्यांची वेगळीच रीत ! ६१
भाऊंची ही कशास–सगळें विश्वच उलटें हें
संन्याशाला फांसा चढवी--सोडी चोरां हें ! ६२
जीवितभर ते थोर बिचारे निकरानें लढती
मृत्यूनन्तर हळहळुनी जन पुण्यतिथ्या करिती ! ६३
"आई, गेले सोडुनि अपुले अपणां राजीव
मुळींच अपुल्या दुःखाची त्यां नाहीं जाणीव ! ६४
पुरुषांचें हें हृदय कोरडें शुष्क असें बाई
स्त्री हृदयाच्या कोमलतेची कल्पना न येई ! ६५
स्त्रीहृदयातें परन्तु ठावें एकच अवधान
एक मनानें घ्यावें त्यातें–एकच तें घ्यान ६६
आणि भावना--तपोयोग तो फलतो मग त्यांचा
पुरुषांच्या मग हृदयामधुनी पाझर यायाचा ! ६७

म्हणो भावनाशील अम्हांला कुणी भाबड्या वा
हीच भाबडी वृत्ती देते सौख्याचा ठेवा ! ६८

आई, अपुलीं कोठवरी हीं असवें गळणार
राजीवाच्या जवळीं नच हा प्रवाह जाणार· ६९

त्या प्रीतीचा रंग उडाला सोडुनि घरदार
वृद्धपणीं या म्हातारीला कुठला आधार ? ७०

परन्तु आहे मजला माझ्या मनांत विश्वास
एके दिवशीं परतुनि येतिल राजीवहि खास ! ७१

या राजीवा ! परतुनि येथें गोंधळ हा चाले
माता रडते–हंबरते ती–अश्रु तिचे सुकले.” ७२

“कले सांगसी सान्त्वन करण्या गोष्टी या मजला
कळती साऱ्या परन्तु तरिही धीर न चित्ताला ७३

फळावयाचें कारण मजला सांगितले नाही
पळुनी केव्हां गेला तेंही कळलें मज नाहीं ७४

आजवरी मी वेडी जगतीं जिवंत हो राही
मृत्यूपूर्वीं बघेन बाळा आशा मनि येई ७५

माझा होता गोजिरवाणा सुन्दर राजीव
मजला त्यानें दुःख न दिधलें कधिही आजीव ७६

राजीवाचा पिता अकस्मात् मृत्युमुखीं पडला
त्याच घडीला जीवाचा या तन्तु असे तुटला ७७

परन्तु होता गोजिरवाणा दोनच वर्षांचा
जिवंत ठेवी या विधवेला लळाच पुत्राचा ७८

अर्धा अपुला घांस तयाच्या घालुनिया ओठीं
वैधव्याचे दिवस कंठिले--आशा मज मोठी ७९
आणि वाढतां वय तो झाला समजदार भारी
वाटे फेडिल पांग आपुले अपुला कंसारी ८०
परन्तु झालें काय तयाला कळलें मज नाहीं
दुर्दैवाचा फेरा फिरतो कधीं कसा बाई ! ८१
मजला वाटे--घरी कशाला उगाच जाऊं दे
भलती शंका मनांत असली कशास येऊं दे ?" ८२
"आई, आलें काय मनीं तें बोला मजपाशीं
दुःख आपुलें एकच नाहीं काय बरें बाई !" ८३
"राग यायचा बाळे तुजला नसेल सांगेन"
"रागवण्याचें काय बाइ त्या कारण समजे न." ८४
"तुम्ही आजच्या मुली तुम्हांला राग कसा येई
तें समजे ना म्हणुनी म्हणतें---"
"इश्श, काय बाई– ८५
मनांत आलें असेल जें जें बोला तें सारें
रागवण्याचें काय त्यामधें––"
"हंसोत हंसणारे, ८६
परन्तु आम्हां माहित आहे तरुणांची रीती
राजीवाच्याकडे पाहुनी शंका ये चित्तीं." ८७
"शंका कसली ?"
"छे छे ! नाहीं तसें मुळीं कांहीं
परन्तु आलें मनांत माझ्या––"
"काय बरें आई ?" ८८

"रागवायची आतां मजवर एक खास तरुणी
राग जाणती परन्तु लटका करिती जे कोणी ८९
मजला वाटे राजीवाचें प्रेम कलेवरती--"
"इश्श, काय हें आई--शंका कसली ही भलती!" ९०
"भलती अथवा सलती राहो-खरी परी आहे
राजीवांविण या नयनातुनि अश्रुमाळ वाहे" ९१
राजीवांच्या जननीचे हे शब्द कला ऐकी
आणि अन्तरीं भाव तियेचा खवळुनि तिज टाकी ९२
हो म्हणवे ना नाहीं म्हणवे कसें तिला बाई
प्रश्न अपेक्षित केला ऐसा तिनें न हा बाई ! ९३
हो म्हणतां कां राजीवांची होइल तिज भेट
नाहीं म्हणतां--असत्य वदण्या इतुकी नच धीट ! ९४
नाहीं म्हणतां-परन्तु कुठुनी चोरी लपते ती
स्त्री हृदयाची स्त्रीहृदयाला स्पष्ट कळे रीती ! ९५
हो म्हणवे ना-परन्तु भरले नेत्र आसवांनीं
वक्षावर तिज धरते माता अपुल्या हातांनीं ९६
एक सारखी वाहत राहे अश्रूंची सरिता
मार्गच नाहीं प्रेमालागीं जगतीं यापरता. ९७
प्रेमाचे ते पाश मनाचे नाजुक जरि असले
हृदया त्यांनीं परन्तु आहे घट्टपणें धरलें ९८
कथा नि कादंबऱ्या सिनेमा दाविति प्रेमातें
उत्कटतेनें स्पष्टपणानें-तितुकें नच होतें ९९
प्रेम लागतें मनांत अपुल्या लपवुनि ठेवाया
मुळीं वाच्यता प्रेम न साही जातें तें विलया १००

उगाच अपुल्या कढत बसावें जागीं प्रेमानें
'कधीं प्रीतिचीं कधि विरहाचीं गावीं तीं गानें १०१
'आहे माझें प्रेम तुझ्यावर' सांगाया धीर
होतच नाहीं–एकच लागे मनास हुरहूर १०२
कथा नि कादंबऱ्यात खेळे तरुणी तरुणाशीं
प्रेमाचा तो मार्ग जीवनीं इष्ट न तरुणासी ! १०३
अबोल असलें प्रेमच होतें पूर्ण मूर्तिमन्त
आणि यशाचा ठावठिकाणा जवळीं त्या येत १०४
राजीवानें होतें अपुलें हृदयी सांठविलें
प्रेम कलेनें होतें हृदयीं आवरून धरिलें ! १०५
उच्छृंखलता दोघांनाही आलेली नव्हती
खऱ्या प्रीतिची हीच एकली एक असे रीती १०६
या प्रीतीचा रंग उडाला भासे जरि जगता
अदृश्य राहे परि प्रीतीची चित्तीं उत्कटता १०७
हें राजीवा होतें सगळें आईनें कथिलें
विपर्यास परि त्याचा केला त्या राजसबाळें ! १०८
ध्यानीं आलें राजीवाचें प्रेम तिच्या जेव्हां
कलेस बघतां शंका आली तिच्या मनीं तेव्हां १०९
तिला वदे ती, "बाळे, आलें ध्यानीं हें माझ्या
परन्तु कां मग पळणें नशिबीं आलें बाळाच्या ? ११०
खुल्या दिलानें सांग मला तें झालेलें सगळें
राजीवाचें आहे खासच कुठें तरी चुकलें." १११
डोळे पुसुनी अपुले लागे बाला बोलाया
"वदलें होतें त्यांना––वदवे कांहि न काला या." ११२

परन्तु वदली अखेर सारें, "कांटचानें कांटा
असा काढला—प्रेमाला मग फुटला हा फांटा !" ११३

"आलें ध्यानीं माझ्या सारें, राजसबाळा रे
शुक्राचार्यां लाजविलें तूं कृत्यानें या रे ११४

ये ये धांवत वाट पाहते शशी तुझी आतां
आणि वाहते आर्त रवानें तुजला तव माता ! ११५

झालें नाहीं भलतें हातुन, राख घालसी कां—
असली—सोडुन देई ये रे सोड तुझा हेका." ११६

आणि कलेला आलिंगुन ती म्हातारी बसली
घळघळ माला नयनांमधुनी अश्रूंची सरली ! ११७

"कला, तुम्हांला हांक मारिती भाऊ बाहेर"
निरोप आला तिजला वाटे रागें भरणार ! ११८

शशिकला

# स्त्री हृदयाची रीती

८४

स्त्रीहृदयाची स्त्रीहृदयाला स्पष्ट कळे रीती
स्त्रीहृदयाच्या दऱ्या नि खोरीं इतरां नच दिसतीं १
वरुनि दिसावा स्त्रीहृदयाचा प्रशान्त सागर जो
आंत खळाळे प्रचंड, दिसतो कुणा, भोवरा तो २
स्त्रीहृदयाच्या प्रशांत पृष्ठावरी पोहतात
असंख्य नर परि, गभीरता ते मुळीं न बघतात. ३
स्त्रीहृदयाच्या सौन्दर्यानें मोहुनि ते जाती
स्त्री हृदयाची मात्र कळेना स्वल्पहि त्यां महती ! ४
स्त्री हृदयाला कुठुनि भावना ? मानपान तोही
ठाण मांडुनी हीच कल्पना पुरुषमनीं राही ५
स्त्रीचें जीवन पुरुषावांचुनि शून्य शून्य सारें
पुरुषावांचुनि स्त्रीला नाहीं दैवत ही दुसरें ६
हीन, दीन वा रोगी किंवा मूर्ख कसा असला
तरी स्त्रियेचा पती तियेला देवच ठरलेला. ७
सासू आणिक दीर नणन्दा तिचा सासराही
यांची सेवा करण्यावाचुनि धर्म तिला नाहीं ८
चूल, मूल हीं दोनच तिजला कर्तव्यें ठरतीं
स्वातंत्र्याची यावीण तिजला नाहीं खिजगणती ९
जुनाट असल्या बुरसटलेल्या एकांगी कोत्या
स्त्रीहृदयाच्याविषयिं नराच्या कल्पनाच होत्या १०
परन्तु शिक्षण आज तयांना नवें मिळूं लागे
पुरुषांचे ते तुटूं लागती जुलुमाचे धागे. ११
समाजकारण धर्मकारणीं राजकारणांत
स्त्रीचा फिरतो जातीनें मग स्वैरपणें हात १२

मुळींच पुरुषांपेक्षां नाहीं कमतरता अंगीं
सिद्ध करूनी दाखविलें हें अमुच्या ललनांनीं १३
परन्तु अजुनी अम्हां वाटतें स्त्रीच्या हृदयाचा
थांगहि पुरुषा लागत नाही, नच लागायाचा ! १४
स्त्री हृदयाची रीती पुरुषा कळायची नाहीं
स्त्रा हृदयाच्या कोमलतेची कल्पना न येई ! १५
उगीच कांहीं मनांत उसळुनि दुःख तिच्या यावें
परन्तु पुसतां तिला पतीनें कांहि न बोलावें १६
मुले नि बाळें पुरुष जेवतां उरतें जें कांही
कोरडीच ती भाकर अपुली एकलीच खाई १७
संसारातें पडेल जेथें लहानही छिद्र
अंगावरचें वस्त्र टाकुनी बुजवी सर्वच. १८
उणीव अपुली संसाराची दिसों न देई ती
स्त्रीहृदयाची पुरुषाला कां कळायची रीती ? १९
'पतीवांचुनी स्त्रीला दैवत नाहीं' वदतां जे
तत्त्व त्यांतलें मौलिकतेनें खरोखरीं साजे. २०
स्त्रीहृदयातें भाविकतेनें पूर्ण भारलेलें
मुळीं तयांच्या निसर्गात हें खरोखरीं भरलें २१
जें जें कांहीं सुन्दर किंवा ध्येयशील भासे
पूजन त्याचें करणें ह्यांतच सार्थकता भासे. २२
कुळाचार ते, व्रतें गृहांतिल वैकल्यें अपुलीं
अजुनि चालते रूढी स्त्रियांची रीतच ठरलेली २३
स्त्रीचें जीवन त्यागामधुनी सुरू जसें होई
पतिदेवाच्या वेदीवरती त्यागुनी ती देई ! २४

पतीवाचुनी तिजला दुसरें दैवतही नाहीं
एकनिष्ठता बघुनि जिण्याची होते उतराई ! २५

हरहर ! पतिच्या मृत्यूनन्तर जीवन्मृत होते
आणि जीवनीं उदासत्राणी मंगलता येते. २६

नटणें थटणें हंसणें फिरणें सरतें तें सारें
जीवितभर तें सर्व दिशांनीं भणभणतें वारें २७

विनोद करितां हांसतसे ती वरूनी जरि जगतीं
आणि अन्तरीं पूर्वस्मृतिचे तरंग मग उठती २८

क्षण दो क्षण जों संग लाभला तिच्या मना पतिचा
उदास जीवन नन्तर बघुनी ओघळ अश्रूंचा २९

ऐन उमेदी तारुण्याची मुसमुसलें अंग
परी पांढरें कपाळ उडवी सारा तो रंग ३०

'तरुणी विधवा' दोन शब्द हे एक यदा होती
कारुण्याची मनापुढें ती येते हो मूर्ति ! ३१

चार दिशांनीं, खालीं वरती, आजूबाजूला-
प्रेमाचा मधु सुगन्ध गगनीं सर्व दूर भरला ३२

रोज रोज त्या कानांवरतीं वार्ता ती येते
अमक्याचें या घडीस आतां शुभ मंगल होतें ! ३३

नाचत जाती दारावरूनी वरातिचे घोडे
वाटे व्हावें सामिल-पायीं पडले परि खोडे ३४

फटक पांढरें कपाळ झालें अशा करण्टीनें
मंगल कालीं मिरवावें कां उगाच तोऱ्यानें ? ३५

छे छे ! जाउन जगआड अन् पैलतिरावरती
घळघळ ओघळ अश्रूंचे ते भिजविति ही धरती ! ३६

वाटे धरती माता देईल आतां जरि ठाय
परी जिवाची आशा तिजला सुटते नच हाय ! ३७
धडधड भडके चिता स्मशानीं पतिची ती जेव्हां
जीवन्मृत हें शरीर वाटे टाकावें तेव्हां ३८
मायबाप सरकार तयाला गुन्हां असें वदतें
स्त्री हृदयाची रीती त्याला काय खरी कळते ? ३९
पूर्वरंग तो प्रीतीचा मनिं आठवीत जगतीं
श्वास चालतो म्हणून जगणें हीच असे रीती ! ४०
दीर नणन्दा, जावा, यांच्या खस्ता खातांना
दिनभर नाहीं उसंत तिचिया कोमल हातांना. ४१
प्रेमळतेचा शब्द एकही कानीं नच येई
जिणें असें हें तिच्या नशीबीं श्वानाचें येई. ४२
परन्तु यांतहि सुधारणा हळु होऊं लागतसे
विधवाचाही विवाह व्हावा वदती जन ऐसे. ४३
क्रमाक्रमानें झाले कांही विवाह नगरात
तोंच अभागी जीव मानसीं आशा धरतात. ४४
सुधारणेचा हळूहळू हा आक्रमीत पंथ
क्रमाक्रमानें समाज चाले पुढें पुढें संथ ४५
पतिविरहाचें दुःख मनाचें ओसरतें जेव्हां
पुनः करावें सुरूं जीवना येतें मनिं तेव्हां ४६
स्त्रीहृदयाची पुरुषांना कां–कळे अतां रीत
स्त्रियांनींच कीं केली असली पुरुषांवर मात ? ४७
पुनर्विवाहामुळें मिळावें जीवन जीवाला
पुनर्विवाहामुळें मिळावें चालन भाग्याला ४८

पुनर्विवाहामुळें स्त्रियांवर उपकारच झाले
सुकलेले ते गुलाब गालांवरचे मग फुलले. ४९
परी सुखाचें जीवन इतुकें सहज काय साध्य ?
प्रसन्न व्हावें क्षणांत कुठुनी दैवत आराध्य ? ५०
सुधारणेनें गुलाब फुलले जरिही असतील
मुळातले परि कांटे कुठुनी समूळ झडतील ? ५१
कांट्यावांचुनि गुलाब नाहीं सृष्टीभर कोठें
पिवळा--हिरवा भगवा किंवा कसलाही तेथें ५२
सुधारणेचा मार्ग चालतों एकसारखा तो
तरी समाजा सौख्याचा मुळि लेशहा न मिळतो. ५३
स्त्रीहृदयाचा थांगहि पुरुषा कळायचा नाहीं
स्त्रीहृदयाची रीती पुरुषा कळायची नाहीं ! ५४
जोंवर स्त्रीच्या हृदयाची त्या कल्पना न येई
सुधारणेचा तोंवर त्यांचा मार्ग चुकत जाई ५५
स्त्रीहृदया रे अजून सुटलें ग्रहण तुझें नाहीं
अरेराव तो पुरुष चालवी तरी कारवाई. ५६
जुलुमाचें जें पूर्वी होतें प्रचण्ड थैमान
भोग्य वस्तु ही स्त्री पुरुषाची ऱ्हास तिचा मान ५७
पतीवांचुनी दैवत स्त्रीला नाहीं मुळि दुसरें
पतीवांचुनी स्वतन्त्रता तिज कुठली अन्य बरें ! ५८
जुनाट असल्या बुरसटलेल्या एकांगी कोत्या
चार स्त्रियांनीं जुन्या कल्पना घालविल्या होत्या. ५९
दाक्षिण्याचें नांव घेउनी तीच अरेरावी
सौम्यपणानें क्रूरपणातें आपुल्या तें दावी. ६०

नांव लोपलें एक, ठेवलें दुजें म्हणूनी कां
अमृत व्हायचें काय विषाचें– अशक्य नाहीं कां ? ६१
दाक्षिण्यांतुनि खुषमस्करिही करिती ढोंगी ते
सभ्यपणाच्या नावाखालीं असभ्यता लपते ! ६२
शाळा-शिक्षण संस्था साऱ्या यांत चाललेली
सुधारणेच्या नांवाखालीं केवळ लाथाळी ! ६३
आणि त्यांतुनी पुरुषांची ती दिसते मर्दुमकी
सभ्यपणानें हतभागीला देती ते धमकी. ६४
एकलकोंडी कुणी बिचारी पकडुनिया गाय
आंजारुनि अन् गोंजारुनि तिज फसविति ते हाय ! ६५
'लग्न तुझ्याशीं करीन' म्हणुनी तिजला ते वदती
नरहृदयाची फसवी असली चालतसे रीती. ६६
प्रेम आपुलें, जीवन अपुलें, सर्वस्वहि देती
स्त्रीहृदयाची भोळी असली त्यागपूर्ण रीती ! ६७
आणि शेवटीं अनाथ विधवा रडत कशी बसली
तोंड दावण्या जगास तिजला जागा नच उरली. ६८
पंढरपुरच्या यात्रेला मग तिनें वळायाचें
नातरि कुठलें तळें तियेला जवळ करायाचें ६९
अशीच बसली खिन्न मनानें एक कुणी बाला
अश्रूंचे ते बिन्दु वाळले दिसती त्या गालां ७०
खिडकीमधुनी पाहतसे ती भयाण अन्धारीं
आणि पाहतां डोळ्यापुढतीं येते अन्धारीं ७१
नगरामधले सारे भाविक कीर्तिगीत गाती
कुणा दिसावी मिणमिण असली गरीबशी पणती ७२

भाविकतेनें मानभाव तो काय तिला वदला
तिच्या मानसीं विचार भलता कधीं नसे शिवला. ७३
आर्यस्त्रीचें रक्त पुरेपुर तिच्या शरीरांत
वहात होतें—दुर्दैवानें पुरी वासलात— ७४
लावियली, तिज कळुनी आलें गुलाब समजून
कण्हेर होती धरली आपण हृदया कवळून ! ७५
भाऊजी तर पुरे पुरीतिल भास्कर धर्माचे
पळभरही तिज घरांत कुठुनी राहूं द्यायाचे. ७६
तोंड जगाला कसें दावणें काळें झालेले
मृत्यूवांचुनि कोण आपुलें अतां तिला उरलें ? ७७
बाळपणीं ती कुरूप म्हणुनी आवडे न कोणा
रूप नसे, तिज शिक्षण तेंही नसे कलाहीना. ७८
सरगम शिकणें बाळपणांतच तिचें पूर्ण सरलें
नाना रागें भरतां सारे राग पळुनि गेले ! ७९
अनसूया हें नांव घेउनी लिहिल्या मग गोष्टी
परन्तु कळतां तेंही नाना झाले हो कष्टी. ८०
तेव्हा पासुनि वाटे जगतीं जीवन तिज नाहीं
जगण्यासाठीं गतजन्मीचें पाप आड येई ८२
कला वन्सं तरि करतिल कुठुनी मदत आपणांला
स्त्रीचें जीवन समर्थ नाहीं स्वत्वरक्षणाला ! ८२
स्त्रीचें जीवन समर्थ नाहीं स्वत्वरक्षणाला
कला वन्संही भुलतिल त्याच्या मोहक वचनांला ८३
काय करुं मी घरांत कुठुनी भूत शिरे बाई
अब्रूची अन् कुलशीलाची लाज सर्व जाई. ८४

मेल्यानें त्या कलंक माझ्या कुळास लावियला
टाळ वाजवी भाविकतेनें असला तो काळा ८५

कसें कलेला सांगू हें मी कुठल्या तोंडानें
आढ्यावरचें पाप ओरडे परंतु मोठ्यानें ! ८६

होतें पडलें अंगणांत मी शांतपणें जेव्हां
आला होता कुळबुडवा तो जवळीं मम तेव्हां ८७

उसळुनि होती मारियली मी मुखावरी लाथ
मला कळेना कुठुनि पातलें धैर्य शरीरांत. ८८

गाजावाजा लग्नाचा तो झाला मग माझ्या
धैर्यशील ही सून भाउजी वदती ही वाचा ८९

परि दुर्दैवें पुराच अपुला साधियला डाव
अकस्मात मम पतिदेवांना उचलुनि ने दैव. ९०

आणि तेधवां धर्मनिधीनें लालुच लावियली
जळली माझी बुद्धि कशी ती क्षणांत त्या चळली ९१

कलेस गेले सोडुनि जरिही तिचेच राजीव
तरी दूर ते नच केव्हांही जातिल आजीव. ९२

येतिल परतुनि एके दिवशीं अखेर सदनास
मग कां आपण ओढुनि घ्यावें नाहिं जीवनास ? ९३

जीवन जरिही कला वत्संना ओढाया बघती
तरी तयांची फसवणूक ही व्हायचीच होती. ९४

म्हणुनि होउनी आपण आतां चोरावर मोर
जीवनांस त्या अपुल्या हृदयीं द्यावा आधार. ९५

आणि आचरी तसेंच, पुढती त्याच्या नित जाई
एके दिवशीं अखेर साधुनि ओढुनि मज घेई ! ९६

इतुके दिन जो धरण बान्धुनी अडवियला होता
प्रणयाचा तो पूर मनांतिल सरतो खळखळता ९७
चोरुन अमुच्या रोज चालती गोष्टी बागेंत
आणि तेधवां नहात होतें प्रीतिचद्रिकेंत ९८
आणभाक अन् वचनें अमुचीं–शपथविधी झाला
वाटे आतां दुर्दैवाचा काळ असे सरला ९९
प्रीति चोरटी चालू होती अवखळ रसरसत
झालें मीलन अमुचें एके रात्रीं ज्योत्स्नेंत १००
क्षणांत त्या मी स्वर्गसुखाला झिडकारित होतें
क्षणापासुनी जीवाचें या वैधव्यच सरतें ! १०१
प्रीतिसंगमा अखेर आलें जेव्हां मधुर फळ
तेव्हां कळुनी चुकला माझा प्रियकर दुष्ट खळ ! १०२
'शक्यच नाहीं, माझा नाहीं गर्भ तुझ्या पोटीं
असेल दुसऱ्या कोणाचा तो' शब्द येत ओठीं ! १०३
मुक्या मनानें प्रीतीचें मी मरण साहिलें तें
परि ती झाली कुबुद्धि मजला–कशास तरि रडतें? १०४
मुक्या मनानें लूटू दिलें मी त्यातें सर्वस्व
मुळीं कल्पना शिवली नाहीं–तिचेंच वर्चस्व– १०५
चालू होतें हृदयीं माझ्या भोळ्या ह्या असल्या
परन्तु साऱ्या सौख्यकल्पना मनांतल्या फसल्या ! १०६
आणि खरोखर मृत्यूवांचुनि कोण दुजा मजला–
असेल जगतीं मित्र कुणी वा मैत्रिण हृदयाला १०७
येइल मजला हात द्यावया येथें तरि कोण
बांधबूंध ही झाली माझी — निघती हे प्राण १०८

"दार आपुलें उघडा वैनी कोंडुनि कां घेतां ?"
प्रश्न ऐकतां असा कलेचा भीति पडे चित्ता १०९
आणि जाउनीं दारापाशी उभी जरी झाली
दार उघडण्या शक्ति न अंगीं तिच्या असे उरली! ११०
"वैनी, वैनी" एकसारखें बाहेरुनि चाले
आणि आंतुनि हृदयीं धड धड तशीच ती चाले १११
दारावरती एक सारख्या थापावर थापा
आणि आंतुनि हृदय टाकतें धापावर धापा! ११२
"वैनी वैनी" एकसारखें बाहेरुनि चाले
आणि अन्तरीं जिवन्त हृदया अबोलपण आलें ११३
"वैनी वैनी" चिडून चढत्या आवाजी वदतें
आणि आंतुनी टपटप माळा अश्रूंची सरते. ११४
प्रीतीच्या मधु हिंदोळ्यावर झोके घेणारा
जीव घालतो साद जिवाला तिथें पोळणाऱ्या ११५
"वैनी वैनी" एकसारखें बाहेरुनि चाले
अखेर आंतिल अबोलतेला जीवन मग आलें ११६
आणि पाहतां पुढें कलेला आलिंगुन घेई
कडेलोट त्या क्षणीं मनांचा उभयांच्या होई ! ११७
एकसारखी वाहत राहे अश्रूंची सरिता
मार्गच नाहीं प्रेमालागीं जगती या परता. ११८
अखेर पुसुनी नेत्र अपुल्या पदरानें वदतें,
"वैनी झालें काय तुम्हांला, दुःखाचें भरतें– ११९
उचंबळूनी असें आजला कां म्हणुनी येई
दादाची कां आज विशेषें स्मृती अशी होई ? १२०

रडण्यानें कां कधीं तरी तें होणारें चुकतें ?
व्यर्थ बापुडें हृदय जागचें जागीं ना झुरतें ? १२१

तदा आपुला आवरुनी तो मनिचा आवेग
वदते ती तिज असें सुशोला वैनी सोद्वेग, १२२

"सांगुं काय मी वन्सं तुम्हांला कसें तरी बाई
जा जा सोडुनि मजला येथुनि—मीच अतां जाई — १२३

काळें करुनी जगांतुनी या कायमची जातें
कुलशीलाची रांगोळी जी आर्यस्त्री करतें !" १२४

"वैनी झालें काय तुम्हांला काय बोलतां हें ?
धर्मशील हो भाऊजींची सून बोलते हें ? १२५

कन्या त्यांचीं शब्द काय हे ऐकुनि घेताहे ?
ऐकुनि त्यांना निमुटपणानें कसे तरी साहे ? १२६

भलतें सलतें वदनांमधुनी काढुं नये बाई"
अखेरोस तिज तिची कल्पना स्पष्ट कळुन येई १२७

हृदयामधले खालीवरती तरंग ते होती
स्त्री हृदयाची स्त्रीहृदयाला स्पष्ट कळे रीती ! १२८

"जा जा वन्सं, प्राशन केले औषध मी आहे
जा जा येथूनि निघुनि—पळांची सोबतीण आहे" १२९

"वैनी झालें काय तुम्हांला काय बोलतां हें ?"
तोंच सुशीला वक्षावरती मूर्च्छित पडताहे ! १३०

# येशिल का परतून?



''राजीवाचें नांव पुन: तूं जरी काढशील–
जन्मभरी मग पस्तावा ग करीत बसशील १
गेला काळें तोंड करूनी इथुनी निघुनी तो
ल्चांड अपुलें, बरें जहालें, घेउनि तो जातो. २

धर्माची त्या चाडच नुरली सब् गोलंकार
भ्रष्टपणाची सीमा कांहीं उरली न समोर ३
कुणावरी तरि प्रेम तयाचें बसलें मज भासे
पहिल्या एका दृष्टिशरानें–जीवाचें हांसें– ४
करूनी घेउनि अतां पळाला–नांव तरी घेसी
कशास त्याचें ? चालविली कां असली मखलासी ? ५
काय तुझ्या तो दोस्त जिवाचा कुणी सोबती वा
पैसे अपुले घेउनि गेला पळुनी कुळबुडवा ६
आणि तयाची म्हातारी कां तुझ्याकडे येते
घालविलें मी आज तियेला–काय काम होतें ? ७
गुप्त चालल्या काय घरांतुन तुझ्या कारवाया
शिगें फुटलीं डोक्यावर कां तुझ्या अशीं वायां ? ८
ध्यानीं धर कीं लपंडाव हा तुझा फसायाचा
स्पष्टपणानें सांग मला तव हेतु मानसींचा ९
श्रीरामाची मूर्ति आणणें इथें मला प्राप्त
विरोध त्याला तुझा असे कां ? कसलीं तूं आप्त १०
राजीवाची शिकवण उलटी अशी गळां आली
धर्माची तूं केलिस माझ्या राखडरांगोळी ! ११
एकसारखा पहात आहे शेफारत जासी
एकादशिच्या दिनीं फुटाणे खुशाल तूं खासी. १२

श्रीरामानें स्वप्नीं येउन विचार सांगितला
इथें यावया जीव तयाचा आहे आसुरला १३
श्रीरामाच्या इच्छेला या विरोध करण्याची
छाती आहे काय त्रिलोकीं कुठल्या वीराची ! १४
जोंवर त्यातें आणियलें मी येथवरी नाहीं
नारायण तो तोंवर वेडा होउनिया राही १५
वेड नसे तें डोकें फिरलें म्हणून झालेलें
श्रीरामाची कृपा तयावर—भाग्य तया आलें ! १६
विरोध साऱ्या जगतानें जरि मजला एकवटुनी
केला तरिही जीवन आणिक टाकी मी करूनी १७
बिशाद आहे अम्हां कुणाची विरोध करण्याची
कृपा दृष्टि ही आम्हांवरती आहे रामाची. १८
'विरोध माझा असे तुम्हांला' शब्द बोलतांना
काय जिवाची भीती नव्हती मुळीं तुझ्या प्राणा ? १९
कांहीं नाहीं—यापुढतीं तें चालणार नाहीं
गमजा तुमच्या पोकळ असल्या ऐकणार नाहीं ! २०
दोन दिनांचा अवधी तुजला विचार करण्यातें
घडगत नाहीं विरोध करतां तुमच्या जीवातें २१
आज पासुनी अवघ्या पांचच आतां महिन्यांनीं
देउळ माझें अर्पण करणें रामाच्या भजनीं. २२
काय मानसीं तुझ्या येतसे सांगुन तें टाक
गरळ आपुलें राजीवाचें एकदांच ओक." २३
"इश्श, काय हें भाऊजीं वच असलें बोलावें
जरा तरी मम शब्द येवढे ऐकुनिया घ्यावे." २४

"विरोध अपुला पुन: जरी तो आतां वदशील
तरी शब्द ते ऐकुनि मजला मुळीं न हांशील २५
बोल बोल ती पोपटपंची ऐकूं मजला दे
राजीवानें काय पढविलें ते तरि पाहूं दे." २६
"राजीवांनीं कांहीं मजला नाहीं सांगितलें
गेल्यानन्तर येथुनि आपण देउळ बांधियलें २७
राजीवांच्या मागुनि आले जीवन अन् त्यांनीं
बांधविलें हें देउळ असलें अपुल्या पैशांनीं. २८
बोलत नाहीं या विषयीं मी कांहीं आतांच
परन्तु पडला आहे माझ्या पुढें एक पेंच. २९
उचलुनि एका जागेवरूनी देवाची मूर्ती
हलवावी तरि कशी मनाला पडते ही भ्रान्ती ! ०
इथला उचलुनि ठेवावा जो दुसऱ्या जागेंत
देव काय तो दगडासम कुणि उचलुनि नेतात ? ३१
पैसा नाहीं त्यांच्या जवळीं म्हणुनि मारणें कां
त्यांची भक्ती ? भक्तीचा कां श्रीमन्तां ठेका ? ३२
त्यांना कुणिही आपुलकीनें मदत न देतात
म्हणुनि लावतां हक्काची कां अशी वासलात ? ३३
पैशाची ज्या ऊब मिळें तो मस्तवाल चोर
सभ्यपणानें असभ्यतेचें वर्तन करि स्वैर ३४
पैसा नाही म्हणुनि तयांना भावनाहि नाहीं
पैसा नांहीं म्हणुनि तयांना भावनाहि नाहीं ! ३५
परन्तु हेका तुमचा हा कां तीच मूर्ति येथें—
आणायातें काय प्रयोजन तुम्हांस हो होतें ? ३६

जरा बोलतें स्पष्टपणानें क्षमा असू द्यावी
काळें वेरें लपलें, नाही--अपुल्या तें गांवीं ३७
जीवन नाही जितुका दिसतो धर्मशील तितुका
देऊं यांतें तुम्हां पुरावा भरभक्कम मी कां ? ३८
परन्तु मजला खात्री करूनी घ्यायची आहे
आज तुम्हांला धोक्याची ही समज देव आहे.'' ३९
''काय बोलसी कले, जिभेला नाहीं कां हाड ?
धर्माची बुज मुळींच नुरली कांही ही चाड ४०
ध्यानी धर कीं अवधी तुजला दोनच दिवसांचा
नाहीं तर मग तुला आसरा नाहीं सदनाचा ४१
राजीवाच्याकडे निघूनी खुशाल जा बाळे
नातें सरलें हाय हाय ! मग विसरूनि जा अपुलें'' ४२
शब्द बोलतां भाऊजींच्या अश्रु लोचनांत
बघुनि कलेला क्षणभर हृदयीं गहिंवरुनी येत ४३
बघुनि पित्याचें प्रेम अमोलिक अजन तिजवरचें
वाटे बोलुन गेलों भलतें भलतें भाषण दु:खाचें. ४४
राजीवांच्या कडे निघूनी कशी तरी जाऊं
अफाट धरती वरती त्यांना कुठें तरी शोधूं? ४५
मग कां दुखवुनि वृद्ध पित्याला सोडुनिया जावें
कानीं येतां वैनीची तो स्थिती कसें व्हावें ? ४६
दादा गेला सोडुनि त्यांना एकुलता एक
आई पाठोपाठच गेली, उरलें मी एक ४७
वैनीला ते घरांत अपुल्या प्रेमें वागविती
बघतां तिजला कितीक वेळां भडभडतें चित्तीं ४८

तिजला झालें मूलबाळही नाहीं दुर्दैवें
लाजिरवाणें तिला व्हायचें मूल अतां बरवें ४९
निज दुःखानें वैनी झाली भ्रमिष्ट आहे ती
आकाशाची कुऱ्हाड पडते भाऊंच्यावरती ! ५०
आणि त्यांत मी अभागिनी कां बोलुनि बसली ही
प्रीतीची ती धुंदी अजुनी गेली कां नाहीं ? ५१
राजीवांनीं केलें काळें तोंड कुठें अपुलें
परंतु वेडें हृदय तयांच्या प्रीतीनें भरलें ५२
भाऊजींना सोडुनि कोठें कले अतां जाशी
वृद्धपणांतिल दुःख तयांचें कसें तरी बघशी ? ५३
पायांवरती डोकें ठेउनि वदते त्यांना ती
"क्षमा करावी बालेला या-आणादी मूर्ति. ५४
करणारी मी विरोध असली कुठली अन् कोण ?
काय पात्रता माझ्या अंगीं तें मज समजे न. ५५
मूढपणानें बोलुनि गेलें कांहीं तरि भलतें
क्षमा करावी बालेला या-विसरा सारें तें." ५६
शेल्याच्या मग पदरानें ते डोळे पुसती तों
"कला, सुशीला बोलाविते तुज" जीवन हें वदतो. ५७
"वैनी शुद्धीवरती आली काय ?" विचारी ती
वाट न बघ तां उत्तर येतें काय, धांवते ती. ५८
तिथें पलंगावरी आपुल्या पडलेली दिसली,
कलेस बघतां दीनपणें ती स्फुंदुनिया रडली. ५९
परंतु बोलूं शके न कांहीं मनांतलें नीट
"बाळ, सोनुलें" आणि "मुंबई" वदते अस्पष्ट. ६०

वदतांना परि गालावरूनी अश्रू घळघळती
स्त्री हृदयाची स्त्रीहृदयाला स्पष्ट कळे रीती ! ६१
"वैनी, आहे काय जायचें मुंबईस आतां ?"
विचारते तिज कला घेउनी हात तिचा हातां. ६२
परन्तु सुकले नेत्र मिळाले तिच्या लोचनास
कसली तरि अन् भीति कलेच्या वाटे चित्तास ६३
"बाळ, सोनुलें--ओढुं नका तें—तोडुं नका बाई'
मधून असलें कांहीं तरि त्या मुखांतुनी येई. ६४
पाण्याची मम घडी कलेनें ठेवियली—भाला
एकवार तिज बघुनि लागला तिचा तदा डोळा. ६५
भाऊजी अन् जीवन, डॉक्टर देवकुळे येत
"तिजली आहे" कला बोलली, "वैनी इतुक्यांत."६६
"हरकत नाहीं' म्हणतच पुढतीं डॉक्टर ते झाले
नाडी पाहत हात तियेचा धरुनी ते बसले. ६७
'बाळ सोनुलें, कोण नेतसे—बाळ सोनुलें ते'
झोपेंतच ती पुन:पुन: हे शब्द असे वदते. ६८
शब्द ऐकुनी भाऊजींना धक्का जणुं बसला
काय बोलते असे कळेना विधवा ती बाला ६९
बाळ सोनुलें कुठलें आणिक कधी तिला झालें
रघुवीरांचें नांव आजला काय बरें मळलें ? ७०
धैर्यशील ही सून आमुची म्हणत जिला होतों
काय तियेची उलटी करणी ? फांस अम्हां पडतो. ७१
बदफैली ही अखेर ठरली उलटचा चालीची
मुळावरी ती आली अमुच्या फुटक्या दैवाची. ७२

रूप नसे जरि शिक्षण नाहीं तरी धैर्यशील
म्हणुनि तियेला पसंत केलें, ठरली बदफैल ७३
वर्षातच त्या पोराला हो घालवून दिधलें
आणि अतां हें नांव आमुचें काळें ना केलें ! ७४
केवळ माया तिच्या गुणांवर म्हणुनि तिला ठेवी
माहेरीं मी पाठविलें तिज नाहीं-ही व्हावी— ७५
अशीच फजिती लिहिलेलें हें माझ्या दुर्दैवी
भालावरती—दैवच अथवा सारें हें करवी ! ७६
पाप कशानें धुवुनी जाइल काय करावें मी
घरांत तिळभर सौख्य नसे मज मुळिंही आरामीं ७७
रडलों म्हणुनी केवळ माझी समजावण केली
पोरीनें त्या-तरुणीची मज रीति पुरी कळली. ७८
एकच जीवन आहे मजला खराच आधार
त्याच्या करवीं करणें कृत्यें धर्मांचीं चार. ७९
बांधविलें मी देऊळ आहे गावीं रामाचें
काम राहिलें केवळ आतां मूर्ति आणण्याचें ८०
बांधिन म्हणतों एक इमारत कन्याशाळेची
आणिक दुसरी गरीब लोकां जागा बसण्याची. ८१
परन्तु झालें तोंड कसें तें काळें भाऊजी
लपावयाचें कसें कुठें अन् काळजीच ताजी. ८२
कोण तरी हा कुळबुडवा तें कळेल कां मजला ?
परी सुशीला शुद्धीवरती नाहीं या काळां ८३
तोंच अकस्मात् उठून बसली जागेवर बाला,
"राजीवा, या बसा इथें, कां लाजतसां बोला ? ८४

रामाचें तें देऊळ अमुचें टाका पाडून
धर्माचें तें सोंग अम्हांला मुळींच बघवें न."— ८५
बोलुन इतुकें पुन: जशीच्या तशीच ती निजली
हात कपाळावरी ठेउनि कला तिथें बसली ! ८६

राजीवाची कसाब करणी काय फळे ऐसी
तरीच काळें करुनी गेला चोर दूर देशीं. ८७
वैतागानें भाऊ उठल, वदले "राजीवा !"
गले निघुनी, जीवन, डॉक्टर हांसत दुर्दैवा. ८८

आणि सुशीलेपाशीं जाउन कला असे बसली
वस्तुस्थितिची स्पष्ट कल्पना तिला खरी आली. ८९
राजीवाचें कृत्य हेंच हें भाऊना गमतें
परन्तु इंगित ठाउक मजला खरेखुरें होतें. ९०

जीवनदेवा, संभाळा हो घडा पुरा भरला
पापांचा, त्या विलंब आता मुळीं नसे उरला. ९१
राजीवांच्या वरतीं माझ्या कुम्भाड हें आलें
क्षणभर जीवनराव आमुचे तयातुनी सुटले ९२

जीवनरावा, कीतीक असले बळी अतां घ्याल
गौरीदेवी आणि सुशीला—कलेस पकडाल ? ९३
प्रयत्न तुमचा चालू आहे सर्व जाणतें मी
परन्तु कळला मजला सारा, पहा हाणतें मी. ९४

भाऊजींचा तुम्हांवरी दृढअजून विश्वास
अजून कळला करणी तुमची नाहीं विश्वास ९५
तोंवर अपुलें कृत्य चालवा कलेस भुलवाया
झाडावरचा पाला नाहीं कला परी राया ! ९६

कच्च्या गुरुचा चेला नाहीं कला वरें तुमची
डंख मारतां जरा तियेला–जीवच घ्यायाची. ९७

साधूभोंदू आणि खळांची रीत तिला कळतें
जीवनदेवा संभाळा निज–"बाळ सोनुलें तें" ९८

वदे सुशीला पुन: पुन:–ती कला घडी ठेवी–
तिच्या कपाळावरती तेव्हां गुंगी तिज यावी. ९९
आणि देउनी औषध तिजला झोप जशी येई
तशीच उठुनी खोलीला ती अपुल्या मग जाई. १००
जातांना तिज हांक मारुनी भाऊजी वदले,
"कले, सुशीला उद्यां जायची मुंबईस बाळे, १०१
राजीवांच्या उपकारांचें ओझें उतराया
तिला जायचें दूर ! काय हें असे भागधेया ! १०२
आणि धाडतों जीवनरावां सोबत तिजलागीं
श्रीरामाच्या कृपा प्रसादें भीति नसे अंगीं. १०३

सुरसाराहुन आले येथें आजच पाटील
आणि आणण्या राम अनुज्ञा ते मज देतील. १०४
म्हणून जाणें शक्य नसे मज मुंबईस आतां
करुनि तयारी सगळी दे–हो जासी काय स्वतां ? १०५

मुंबईस मग जीवनरावां सोबत होईल
औषधपाणी करण्यासाठीं जर तूं जाशील. १०६

हो, अन् दुसरें, राजीवहि तो आलेला येथें
आहे कामासाठीं कांहीं—तुझेंच तें दिसतें १०७
सूनबाइला फसवुनि गेला आणि अतां तुजला
भ्रष्टविण्यातें आला आहे-कळलें हें मजला." १०८

पुढें ऐकवे तिला न कांहीं म्हणुनी ती वदते,
"स्त्रीसंघाचें काम इथें मज आहे आलें तें— १०९
माझ्या वांचुन कोण दुजे तें उरकुनि घेईल
मीहि तयाला 'नाही' वदलें होतें हो काल. ११०
सांगणार मी नव्हतें, आलें परन्तु ऐकविणें—
श्रीरामाचीं करतों आम्ही रोज रोज भजनें १११

नारायण तो वांचव अमुचा म्हणुन प्रार्थना ही
चाले अमुचा–परन्तु गेली नव्हती वाला ही. ११२

पश्चात्तापें आतां माझें हृदय पोळलेलें
राजीवाचे ढोंग तयाला पुरेंपुरें कळलें. ११३
म्हणून म्हणतें जाउन तेथें मीही गाईन
श्रीरामाचें प्रभुजीचें तें पवित्र गुणगान. ११४

परन्तु सखुला देतें माझ्या सोबतीण त्यांना
करील सारें औषधपाणी–सोबत वैनींना." ११५
हर्षभरानें वदती भाऊ, "ठीक ठीक जा जा.
करो प्राथना-खऱ्या व्हायच्या अतां सुरू मौजा ११६
छबुली माझी रस्त्यावरती अतां सरळ आली !
आणि मनाला प्रसन्नता या वृद्धाच्या आली." ११७

राजीवाचें ढोंग मनाला पुरेंपुरें कळलें !
ढोंग ह्यांतलें परन्तु नाहीं भाऊंना कळलें. ११८
कलाहि झाली रामभक्त अन् आतां या घडिला
राजीवाचें नांव ऐकतां जीवच हुरहुरला. ११९
जाऊं कोठुनि जीवनरावा 'सोबतीण' म्हणुनी
जन्माची मी दावेदारिण त्याच्या ही असुनी. १२०

परन्तु आतां फोडावें तें कसें बरें बेंड ?
काढावी त्या नीचाची मी कशी बरें धिंड ? १२१
काय सांगुनी टाकूं सारें माझ्या भाऊंना
विपर्यास परि केला आहे त्यांनीं एव्हांना १२२
वैनीच्या त्या शब्दांवरुनी त्यांना हें वाटे
राजीवानें असति पेरले सुखामध्यें कांटे. १२३
परन्तु उगवे सूड भावना वैनींच्या चित्तीं
बघवे त्यांना देउळ नच तें, म्हणून बोले ती. १२४
राजीवातें सांगतसे ती पाडुनि तें टाका
सोन्याचा तो कळस उखडुनी दूर दूर फेका ! १२५
राजीवा ! हें काम तुम्हांविण करील हो कोण ?
ढोंग समजलें आम्हां--परि तें जमेल तरि कुठुन ? १२६
राजीवाची पुन: तियेला स्मृती मनीं आली
गांभीर्याची छटा तियेच्या मनावरी भरली. १२७
भाऊंच्या परि करितां तिजला राजीवा दूर-
लोटुनि देणें प्राप्तच आलें--लागे हूरहूर ! १२८
गेलें कोठें कळलें तिजला नाहीं राजीव
म्हणून गेला भिउनी स्त्रीचा भोळा तो जीव १२९
आणि पित्याचे अश्रू पाहतां खचे तिचा धीर
आंतुनि हृदया डांचतसे कीं झालें मी चोर १३०
मनीं एक अन् बोलुनि जातें सहजच दुसरेंच
खास पित्याशीं हा रे देवा नीच कला नीच ! १३१
राजीवाचें ढोंग मनाला पुरें पुरें कळलें
भाऊजींशीं असत्य असलें सहज किती बोलें ! १३२

परन्तु एका देवाला तें ठावें हृदयींचें
असत्य भाषण सत्याला तें झांकुन द्यायाचें! १३३
आज–उद्यां वा परवा येतिल माझे राजीव
भांड्यामध्यें पडेल माझा क्षणांत त्या जीव १३४
मनांतलें हें किति दिवसांचें तयांस सांगीन
आणि करावें काय तयांना असें विचारीन. १३५
राजीवा, मम जीवन देवा! या या धांवून
वाट पाहती अपुली माझे देहातिल प्राण १३६
भावगीत ती गाऊं लागे तेव्हां शांतेचें
एकरसानें गातां तिजला अर्थ कळायाचे १३७
समरसतेविण काव्याची ती गोडी नच कळते
समरसतेनें काव्याची ती गुप्त रुची कळते १३८

जीवींच्या जीवलगा!
जीविताचे धागे
माझे तुझ्या संगें
बांधलेले. १३९
जीवींच्या कल्पवृक्षा!
वेलीचे ह्या तन्तू
फांदीफांदीनें तूं
गुंडाळले. १४०
जीवींच्या परमेशा!
फुलांची मी माला
घालाया तुझ्या गळां
आसुसलें. १४१

जीवींच्या सहचरा !
जीवाच्या ज्योती या
तुला ओवाळाया
लावलेल्या. १४२

जीवींच्या पंचप्राणा !
माझें तूं जीवन
जिणें तुझ्याविण
शून्य झालें १४३

जीवींच्या जादूगारा !
तुझ्या भेटीसाठीं
प्राण माझा कंठीं
उचंबळे. १४४

जीवींच्या विहंगमा !
तुझ्या रूपावर
चित्त माझें स्थिर
जडलेलें. १४५

जीवींच्या प्राणसख्या !
तुझ्या पायांवरी
आयुष्याची दोरी
घरंगळें. १४६

जीवींच्या राधेश्यामा !
होई देवदूत
किंवा यमदूत
रागावले १४७

जीवींच्या प्रियकरा !
येशिल कां परतून ?
प्राण घे उचलून
व्याकुळले ! १४८

गालावरचे अश्रु तियेच्या तसेच ते सुकले
गडबड्नी ती उठे, 'चालले' कोण असें वदलें. १४९

वैनी आणिक जीवन दोघे बसले टांग्यांत
'येशिल कां परतून ?' बोल हे येती वदनांत ! १५०

# ओळख हृदयाची !

शशिकला

या अफाट धरती वरी कुणाचा कुणा असे आधार
स्वार्थच साऱ्या चराचराचा एक खरा व्यापार १
अपुल्या पोळीवरती ओढुनि घ्यायातें तूप
ल्हानमोठे उत्साहानें झटती जरि खूप २

'राष्ट्रासाठीं रणांगणावर वीरांनों या पुढें चला'
शब्द बोलतो नवयुवतींचें हार यायचे यदा गळां ३
'देशासाठीं जीवित अपुलें करूं रणावर कुर्बान'
शब्द बोलतां प्रचण्ड मिळतो टाळचांचा त्या सन्मान. ४

राष्ट्रभक्ति वा देशभक्ति वा साऱ्यांतुनि तो दडलेला
स्वार्थं खळाळे गुप्तपणानें चित्तामधुनी भरलेला ५
स्वार्थपायीं मनुष्य मुकला मानव्या अपुल्या
स्वार्थपायीं सद्‌वृत्तीही त्याच्या गारठल्या. ६

शेजाऱ्याचे शेजाऱ्यातें नाहीं मुळिंही अवधान
पैशापायीं भांडणतंटे रोजरोजचे गर्जून ७
काय दिसावें दृश्य याहुनी अधिक आणखी वेंगडे
सख्खा भाऊ भावावरती फेकतसे कीं दगड-फडे ८

स्वार्थ नि पैसा या दोघांनीं मानव्याची ज्योत
मालवुनी ती पार लावली-हिंडा अन्धारांत ९
असेच चालूं द्या ना आतां डाव आपुलें घडीघडी
जमला अधला-पैसा--जाते व्यर्थ सारखी घडी घडी! १०

या वृत्तीनें मनुष्य अपुल्या मानव्यातें मुकला
पैशाविण त्या पंथ जीवनीं हाय न दुसरा उरला ! ११
स्वार्थाचा मुळि भरला जेथें एकच मोठा बाजार
पैसा--पैसा हाच जिथें मुळि ठरला एकच व्यवहार. १२

गळा कापुनी शेजाऱ्याचा खिसा भरावा हाच जिथें
असे कायदा--मानव्यातें जागा राही कशी तिथें ? १३

सतत्वांचा प्रचंड असला नर हृदयांतच जो अंश
परमेशानें ठेवुनि दिधला होता--झाला निर्वंश ! १४

कुणी कुणाचें वाली उरलें नाहीं आतां या जगतीं
स्वार्थानें ही मानव्याची पहा कशी केली माती ! १५
म्हणतों झालों शिक्षित आम्ही सुधारणेचे भक्त खरे
झालें नाहीं मानस दीक्षित मानव्यानें हेंच खरें १६

धर्म, जाति वा पंथ तोडले म्हणतों सारे एक दिलें
स्वार्थाला परि कुणी तरी कां हृदयामधुनी घालविलें. १७
'तुमच्यासाठीं शस्त्र करी हें पहा घेतलें' म्हणूं जरी
स्वत्वरक्षणा आवश्यक तें मनांतली ही गोम खरी १८

परन्तु भरली दृष्टि सारी स्वार्थानें कीं इतुकी
कुणी बिचारा करतो कांहीं वदती त्या कीं खरा पातकी १९
काळें बेरें आहे कांहीं लपलेलें या नरामध्ये
कृतिशून्यांचे शेरे ऐकूं येती अपणां घरामधें. २०
पाहुनि असले विचित्र उलटे सर्व जगाचे व्यवहार.
वाटे जावें सोडुनि त्यातें कुठें तरी हो पार. २१
जाउनि कुठल्या रानी लावुनि ध्यान प्रभूचें साधावें
नको पाश हा--नको मानवीं जीवित सारें घालावें. २२
असेच आले विचार नाना मनांत उसळुनि राजीव
जाउनि बसला रानि खरोखर भावसुकोमल तो जीव २३
कला वाटली त्याला अपुली शिष्या बाला नवतरुणी
हुशार आणिक सुन्दरही ती धनवन्ताची ती रमणी. २४

वाटे कांहीं तरी निराळें--वाटे अपणासमान ती
मानव्यातें जागृत करण्या झटेल अपुली खासच ती. २५
वाटे गेली अपुली दृष्टी सारी मुळांत बदलून
तरुणपणांतिल उच्छृंखलता गेली अपुली लोपून २६

परन्तु कुजके प्रवाद गांवांतुनी सारखे खळखळती
आणिक गेलें कांहींसें ते मातेच्या कानावरती. २७
केवळ अपुला पाश म्हणूनी वैधव्यांतहि ती राही
पुत्र तिचा परि काय बातमी तिच्या कपाळीं देई ! २८

आणि बोलली, 'हातुन कांहीं झालें मोठें जरि नाहीं
अधोगतीला मानस वाहू नकोस देऊ सख्या तरीही २९
चढावयाचा मार्ग चढाया दुर्लभ आहे जरी खरा
अधोगतीवर सहज चालतो मानव अपुला भराभरा.' ३०

आईच्या या शब्दांनीं त्या राजीवातें जागविलें
वाटे आतां सत्त्वर हृदया अवश्य व्हावें सांवरिलें ३१
आणि अगणीं फूल तोडण्या कला यदा ती आलेली
चंचलता मग मनांत उसळी मारूनि वरती ती आली ३२
तिच्या करांतिल काढुनि काटा मनांतलाही घालविला
चंचल मोहक पाश एकदां तोडुनि सत्त्वर दूर दिला ३३
तरी तुटेना तोडविल्यानें पाश मनाचा प्रचंड तो
किती तरी त्या वेळपावतों मनास चाटुनी तो जातो. ३४

आणि अजूनी रात्री बघतां आकाशीं त्या दिसे कला—
चन्द्राची, अन् तिला पाहतां एक उसासा निघे भला ३५
वाटे जितकें पाश तोडणें सोपें तितुकें नसें खरें
जीवितभर तें नैराश्याचें एकच वारें चित्त भरे ३६

कलेस घेउनि संसाराची चालविलेली नौका
मिळती बघण्या--! अहह जाउं दे. बसतो की चटका! ३७
गोपाळाच्या घरीं येउनी दारिद्र्याचें चित्र बघे
तरी तयाचें चित्त घाबरें--उरे न जागीं कसें उगें ३८
कला नि आणिक राजीवाच्या संसाराचें चित्र दिसें
रेघोटचा जरि फांसुनि त्यावर वेंगड झालें पुरें असे ३९
श्रीरामाच्या भक्तगणातुनि जाउनि बसला जरी असे
तरी बिचारा कलेस स्मरुनी कष्टी मधुनी होत असे. ४०
तसेंच त्यानें पाहियलें कीं गोपाळहि तो सुखी नसे
परी कशाला गतगोष्टी त्या म्हणून त्याला न तें पुसे. ४१
परन्तु पाहीं गोपाळाला कधीं कधीं तो दुर्मुखला
'झालें कांहीं काय ?' त्यावरी 'कांहि न झालें' तो वदला ४२
उगाच वाटे मनांतलें वरि उसळुनि यावें दुःख जसें
नैराश्याची छटा पडावीं चर्यॆवर तो तसा दिसे. ४३
आणि जाउनी बाजुस एका आपण बसतो रडावया
अश्रु पाहुनी गोपाळाचे राजीवातें येत दया. ४४
एके दिवशीं असाच बघुनी जाई त्याच्या समीप तो
खांद्यावरती हात ठेउनी त्याला तो वदतो:— ४५
"साजे कां हें गोपाळा तुज एकसारखें जळजळणें
दुःख मनाचें मित्रा कथुनी योग्यच हलकें तें करणें ४६
आनन्दाचा केवळ वाटेकरी तुझा हा मित्र नसे
दुःखाचाही भार धराया तयार झालों गड्या असे. ४७
इतुके दिन मी तुजजवळीं रे येउनि अपुला बसलों ना
मग कां म्हणुनी व्यर्थ अबोला-त्रास असा कां देसि मना ४८

सांग तुझें तें दु:ख राजसा--अश्रु मला नच पाहवती
दु:ख पाहुनी तुझें लोचनें पाण्यानें मम रे डबडबतीं! ४९
दु:खी बघुनी तुला मनाला तिळतिळ हुरहुर लागतसे
सुचतें मजला काम न दुसरें मित्र जोंवरीं खिन्न असे ५०

तुवांच मजला मानव्यामधिं आणुनि आहे बसवियलें
मानव्याचें दीक्षित मानस तुवांच माझें भारियलें. ५१
आणि पाहुनी तुला अशा या स्थितींत वदणें काय तरी
उपदेशाचे शब्द काय ते केवळ लोकांच्याच वरी ५२

'कृपाण कृतिचें हातीं घे' हें गीत गात जो जीव बसे
प्रश्न पडे तो कां मग रानीं जाउनि बसला खिन्नअसे! ५३
'श्रीरामाच्या कृपाप्रसादें मिळतो आम्हां राजीव'
म्हणें असें जो--तोच रडावा कां म्हणुनी मग कीं जीव? ५४

कीं हें जीवित असेंच मिश्रण--भेसळ कीं सुखदु:खांची
एकानें दुसऱ्यास नेंहमीं धीरवृत्ति पढवायाची ? ५५
'जीवित माया-ब्रम्ह सत्य' ही पोपटपंची चालवुनी
एकानें दुसऱ्यास नेहमीं सान्त्वन द्यावें शुष्कगुणी ५६

गोपाळा, तूं तरी नको हा धरूं गड्या रे संकोच
दाखिव अपुल्या हृदयाची तूं विश्वासानें मज खोच. ५७

उघड उघड रे दार अन्तरींचें
आणि दाखवी रत्न दौलतीचें ५८

रत्नें माणिक मोतीं पाचूं
किंवा केवळ साप नि विंचू ५९

कांहीं जरीहि असेल जवळीं दाखिव मजला तें सारें
ठेंचुनि दु:ख टाकूं मनांतिल असलें नसलें तें सारें ६०

परन्तु बघवे मला न पाणी डोळ्यांतिल हें असें तुझें
अश्रु कसे हे मलूल दिसती सुकलेल्या तेजें" ६१
"वा: राजीवा, खूप शहाणा वाटसि मजला खरोखर
परन्तु कळलें शहाणपण तें आतां मजला पुरेपुर ६२
इतुके दिन तूं जवळीं माझ्या असून अजुनी स्वल्प नसे
ओळख माझ्या हृदयाची तुज-आश्चर्यच मन वाटतसे"६३
"झाली नाहीं खरीच ओळख हृदयाची तव मित्रवरा
अन्तरिचें तें गूढ मनाला अजून कळलें न या नरा ६४
सांग सांग तें गूढ मला कां उगाच लपवा छपवी ही
आणि बघूं दे कुठवर चाले बुद्धी माझी तरीच ही' ६५
"काय सांगणें? व्यर्थ कशाला दु:ख व्हायचें तुझ्या मना
बरेंच आहे जोंवर नाहीं तुला तयाची विकल्पना ६६
हं, मग कुठवर आलों होतो--"
'प्रारंभहि मुळि स्वल्प नसे.'
'वा: त्या पाटोलानें दौड मारली,हें कां कांहीं मुळीं नसे६७
"पाटलास त्या जाऊं दे रे स्मशानात वा रानांत
करावयाचें काय तयाचें?--'
"जा तर अपुल्या कामांत' ६८
"कामास न मी जाइन इथुनी निघून अपुल्या रानांत
बोलणार जरि मजशीं नाहिस काय तें तुझ्या हृदयांत"६९
शब्द ऐकतां राजीवाचे गोपाळाचें चित्त ढळे
राजीवातें घट्ट धरूनी सांगूं लागे मनांतलें. ७०
"राजीवा तूं आजच मजला पुरें पुरें रें ओळखलें
मीही आहे तुझ्याप्रमाणें दु:खित, दु:खें चित्त जळे. ७१

झालें माझें लग्न तयाला झालीं वर्षे जरि आठ
या कालान्तरिं दु:खांचे मी केवळ शिकलों रे पाठ. ७२
लग्नानन्तर दुसऱ्या वर्षी वडील गेले मज त्यजुनी
तिसऱ्या वर्षी अपघातानें भाऊ आणिक मम भगिनी ७३
मीच एकटा कसा तरी मग सान्त्वन करितों मातेचें
कसें तरी हीं ढोरें राखुनि घांस कोंबतों अन्नाचे. ७४
विसरूनि गेलों जन्मानें मी होतों कितिही जरि गरिब
दु:खाघातें परन्तु झालों पुराच आतां मी गरिब ७५
काय सांगणें कसें साहलें दु:ख अम्हीं तें भयंकर
वाली अमुचा एकच जगतीं रघुपति राघव परात्पर ७६
रामप्रभूच्या ध्यानामधुनी दु:ख मनाचे विसरावें
सौख्यहीन या संसारामधिं रामजपानें भटकावें ७७
मुळीं न लागे कशांत माझें चित्त--निराशा तीव्र मनीं
कुठें न जाणें कुठें न येणें रमून जावें स्वैर वनीं ७८
कधीं न खाया घांस मिळावा मुलांस माझ्या पोटभर
पत्नी गेली थकुनी माझी खस्ता खातां दिवसभर. ७९
मोलमजूरी ती ही लागे करावयातें वाड्यांत
कसें तरी मग खाण्यापुरतें अन्न येतसे सदनांत ८०
अन्नानें त्या घरचा सारा नायनाट मग घडवियला
घरांतला तो दिवाच अमुचा दुष्टानें त्या मालविला ८१
पाटिल अमुचा कद्रू आहे प्रसिद्ध साऱ्या मुलखाचा
जीवन आहे एक तयाच्या घरीं कुणीसा नात्याचा ८२
ठेवुनि पापी दृष्टी त्यानें पत्नी माझी भुलवियली
पैसा मिळतां आपत्कालीं तीहि बिचारी त्या भुलली ८३

महादुष्ट तो जीवन त्याच्या मनांत होणें पाटील
यास्तव चाले कृष्ण कृत्य हें असलें त्याचें बेताल. ८४
अखेर घेउनि पत्नीला तो सुरसाराहुनि गेला
भाऊजी रघुवीर यांकडे अपुला तळ मग बसवीला ८५
भाऊजी ते खरोखरीचे निर्मळ प्रेमळ हृदयाचें
ढोंग तयांना मुळीं कळेना परन्तु अमुच्या दुष्टाचें." ८६
नांव ऐकतां भाऊजींचें राजीवातें होत कसें
हृदयामधला एक कोपरा उकलुनि बघतें कोण तसें ८७
परन्तु ऐकी पुढे, "भाऊजींनी मन्दिर तें
पुरें जहालें असें सांगती गावामधलें लोकहि ते ८८
कालच गेले येथुनि अमुचे बोलायातें पाटील
म्हणती न्याया राम आपुला विनन्ति त्यांना करतील ८९
पैशाचें त्या आमिष मिळतां परवाना ते देतील
परन्तु आम्ही नेउं न देऊं राम आमुचा चिरकाल ९०
कोनशिलेचा प्रसंग जेव्हां होता केला ते म्हणती
तेव्हां भाऊजींची कन्या विरोध करूनी गेली ती." ९१
"भाऊजींची कन्या ? ती रे कोण ? जाणतो नांव तिचें?"
"मला वाटतें कला असावें नांव तयांच्या कन्येचें." ९२
अशक्य झालें राजीवातें आवरण्यातें आवेग
घळघळ ओघळ नयनामधुनीं येऊं लागे सोद्वेग. ९३
वदे तयाला, "बा राजीवा, कशास आतां रडसी रे
राम आपुला नेउं न देऊं, करूं प्रयत्नातें सारें" ९४
वदे तयाला, "मित्रवरा चल, रामपदाशीं जाऊन
रूप तयाचें पूर्णपणानें घेऊं हृदयीं रेखून." ९५

आणि अंगणीं खाटेवरती पडे यदा तो राजीव
प्रशान्त सुन्दर नभीं विलासे चन्द्रकोर ती रेखीव ९६
शुक्राची ती टपोर तारा, नक्षत्रांची ती माला
सप्तर्षींच्या पुढें दिसे ध्रुव--अन्य तशी ती ग्रहमाला. ९७
खालीं त्यांच्या खाटेवरती विचित्र प्राणी तळमळतो
उगाच स्मरतो गतगोष्टींना-स्मरतां दुःखें तो भरतो. ९८
'कलें, न ओळख हृदयाची तव आजवरीं ग मज झालीं
चंचल, मोहक तुजला समजुनि संगत सोडुन मी दिधली ९९
शुद्धपणाचा सात्विकतेचा मक्ता घेउनि बसलों मी
प्रीती आहे केवळ तवती असें मानिलें मी, कामी. १००
नरहृदयाला स्त्रीहृदयाच्या कोमलतेची कधीं तरी
कशी कल्पना येइल सांगा या वृत्तीनें जन्मभरी ? १०१
'कांटा काढा' म्हणून वाटे प्रेमभाव तो दाखवियला
वैतागानें आई आणिक गांवच अपुला सोडियला १०२
काय वाटलें असेल तेव्हां आईला हें कधीं तरी
रे राजीवा, आलें होतें काय तुझ्या अभ्यन्तरीं ? १०३
काय आइच्या जिण्यांत तिजला सौख्य मिळालें असेल रे
राजीवाचा पाश तियेला म्हणून साही तें सारें १०४
तिच्या जीवनीं असेल तिजला एकच माझी ती आशा
परन्तुफसलीतीही आतां! जिण्यांत दुसरीनचआशा! १०५
काय आपुलें केलें कांहीं तिनें बरें वा वाईट
काय खातसे कोण देतसे औषध तिजला वा नीट १०६
आई, आई, क्षमा करी मज तुला न होतें ओळखलें
राजीवानें पदरीं केवळ दुःख तुझ्या ओतियलें १०७

थोरपणाचे धडे सारखे तुवांच मजला शिकवियलें
वाढूं देऊं नये मनाला कधीं तुवां हें सांगितलें १०८
शिष्या म्हणुनी सहवासीं ती धनवन्ताची नव तरुणी
आली, आणिक तिला सांगतां वाढे आहे खरी गुणी १०९
केवळ सुन्दर किंवा श्रीमान् आहे नाहीं असें मुळीं
खरीच कला हुशार आणिक प्रेमळ आहे मुळांतली ११०
जरी आवडे मला कला ती मनातुनी अन् खरोखर
जरी बोलतां तिच्या सवें मी होतों उत्सुक पुरेपुर १११
तरी मनावर एक भावना शिक्षक मी ती प्रिय शिष्या
कशास येऊं द्यावें पुढतीं भलत्या सलत्या मग दृश्या ११२
जरी मनाला नित्य सांगतों विचार भलते करूं नको
कलेस अपुली प्रिया म्हणुनी कधीं मनाशीं म्हणूं नको. ११३
परन्तु ईशा ! तुझीच करणी विचित्र लीला रमणींची
विचित्र लीला तारुण्याची विचित्र लीला मदनाची. ११४
चोरचोरुनी लपुनी छपुनी आडुन मागें कधीं कधीं
कला प्रेयसी नात्यानें या माझ्या यावी मनामधीं ११५
विवेक ठेउनि जागृत द्यावें हांकुनि या जरि मोहाला
तरी हळूहळू एक कोपरा मनिचा त्यानें आक्रमिला! ११६
परन्तु नाहीं भाव मनांतिल कधीं तिच्याशीं प्रगटविला
प्रयत्न केला कसून त्यातें मनात होता दाबियला ११७
एके दिवशीं बागेमध्यें बसलों होतों निवान्तसा
तोंच पातली कलाहि तेथें--बघून झालों विस्मितसा ११८
त्या वेळेला कां, न जाणे, दिसली विशेष सुन्दर ती
प्रफुल्ल यौवनशाली रमणी दिसली मदना जणूं रती ११९

न्हाणें झालें म्हणून होते केस मोकळे सुटलेले
तें मुखावरीचें तेजहि होतें विशेषतेनें खुललेलें १२०

अस्मानी तें पातळ तनुवर गौर तियेच्या रम्य दिसे
त्या रंगाचा ब्लाउझ अंगीं साधर्म्यानें खुललासे १२१

नाचत धांवत हिंडत होती अल्लडतेनें बागेंत
तिला न ठावें कोणी येथें बसलेलें वा आहेत. १२२

गाणें होती गात मनाशीं वायू मंजुळ करी साथ
दिसली मजला सुन्दर झाला हाच एवढा अपराध १२३

तोडायातें फल पातली झाडापाशीं ती जेव्हां
दुसऱ्या बाजूनें मी गेलों झाडापाशीं अन् जेव्हां १२४

तोडायातें फूल तियेनें हात आपुला वर केला
तेव्हां अमुच्या विचार चित्तीं खटचाळ
ऐसा मग आला १२५

क्षणभर गेलों ओशाळुन मी--लगेच चित्ता सांवरलें
परन्तु वाटे भलतें ऐसें काय अकस्मात् मी केलें १२६

रुसली माझी कला म्हणाली, "कांटयानें काढा कांटा"
आणि फोडिल्या निज रुसव्यातें
शंभर तरि त्या नव वाटा १२७

परन्तु होता राग तिचा तो मजवरचा वरवर, लटका
गेली निघुनी बघेल कोणीं म्हणुनी
झट्कन् म्हणे "नका, १२८
असें तुम्हांला शोभतसें कां ?"
शब्द बोचले या हृदया
आईचेही आठवले ते शब्द मनाला रमवाया १२९

आतां आलें कळून मजला कले तुझें तें ऋजु हृदय
परन्तु होशिल काय पुनः तूं मजवरती ग हो सदय? १३०
आई तुजला सोडियलें मी--
छे: मी जातों तिच्याकडे''
''आई आई'' म्हणतां त्याला कोसळलें मग खरें रडें १३१
परन्तु पाही बाजूला तो निजला आहे गोपाळ
तोही दुःखी परन्तु साही दुःख आपुलें चिरकाल १३२
गोपाळानें दिधलें होतें राजीवातें अवधान
धरू नये कां राजीवानें त्याच्या करितां अवसान? १३३
कोण तरी तो जीवन गेला भाऊजींच्या घरीं कसा
कसें कलेनें--
कशास भलता विचार येथें करित बसा? १३४
माथ्यावरती चन्द्रकोर ती आली होती गगनांत
निजले होते सारे, झालें विश्व सर्वही जणुं शान्त १३५
परन्तु चाले तळमळ अमुच्या राजीवाच्या हृदयांत
उठुनी बसला, आणि निघाला वळुनी
फिरता तो बघत १३६
वाट चालतो कसा कळे ना हृदयीं एकच विचार तो
गर्द रान तें सभोंवताली शान्त--एकटा चाले तो १३७

चन्द्र मावळे रात्र सराया आली-आला गांव पुढें
उठवावें कां उगाच आतां आई तुजला. घराकडे १
कशास जावें इथेंच कोठें अंग जरासे टाकावें
सूर्य उगवतां दर्शन अपुल्या प्रेमळ मातेचें घ्यावें २

घरी दाखवूं तोंड कसें तें आई काळें झालेलें
पुन: जरी मी परतुन आलों तोंड न माझें फुललेलें ३
इथें पडावें जरा वेळ अन् जावें परतुन सुरसारा
असें चिन्तुनी राजीवानें अंग टाकलें भुईसरा ४

डोक्यामध्यें चक्र चाललें एकसारखें चिन्तेचे
झोप न लागे—डोकें झालें सुन्न बिचारें मग त्याचें ५
इतुक्या रात्री कोण चाललें अगदीं इतुक्या घाईंत
कोण असावें ? नराकृती ती दिसते त्याला रस्त्यांत ६

कुणी तरी स्त्री मार्ग चालते अभिसाराचा हेत दिसे
ओळखतों कां आपण हिजला-ही तर गौरी स्पष्ट असे ७
कलेकडे ती झाडलोट अन् करते वरचे घरकाम
आज कशाचें इतुक्या रात्रीं पडलें तिजला हा काम ८

तोंच पातली जवळी बदकूनि थांबुनि ती चटकन लपली
लपते कां ही कांही कळेना अखेर मोठ्याने वदली— ९
"कुणी तरी मज सहाय्य होईल काय ? अतां मी करूं कैसे ?"
वदतां इतुकें मूर्च्छित होउन पडलेली ती हाय दिसे. १०

तेव्हां झट्कन् उठुनि पुढें त्या गौरीजवळी गेलासे
वारा घालुनि उठवी तिज तों पुढुनी कोणी येत असे ११
हातीं काठी घेऊनि आली एक व्यक्ति अन् बरोबर—
दुसरें कोणी—तयास बघतां राजीवातें पुरेपुर १२

विस्मिततेचा धक्का बसला पाही करुनी वर मान
'राजीवा !' हें ऐकुनि वाटे गेले निघुनी निज प्राण १३
भाऊजी मग तेथुनि गेले, वदले, "ध्यानीं ठेव जरा
माधवरावा, गनीम तुमचा हाच विखारी गुप्त खरा." १४
राजीवानें ओळखलें कीं हेच आमुचे गनीम जे
राम आमुचा उचलायाला चाण्डाळासम पुढें सजे १५
सावध झाली गौरी वदते, "सोडा मजला" तरी असे
वारा घालुनि तिजला वदतो, "दैवी झालें काय असें ?" १६
शब्द ऐकतां परके तिजला आली दूर सरें
ओघळलेला पदर आपुला वक्ष प्रांतावरी धरे. १७
श्वास चालला जोरानें अन् हृदय सारखें तिचें उडे
झालें सारें अंग कापरें भीति मनाला तिच्या पडे १८
"भाऊजी अन् जीवन कोठें ?' पुसते मग ती भयभीत
"गेले निघुना दूर' वदे तो कळे तिचा नच त्या देत १९
हळूहळू मग छाटुनि दम ती सावध झाली, हात धरे
राजीवाचा, "क्षमा करा मज" वदते, "कांहीं मला स्मरे २०
हतभागी मी आलें सोडुन पतिला अपुल्या दूर कशी"
(शब्द ऐकतां राजीवातें शंका आली एक तशी) २१
"परन्तु आता कळलें मजला व्यर्थच फसलें वचनाला
जीवनरावा समान नाही दुष्ट जगीं या जगांतला २२
देउनि अधले पैसे मजला सहाय्य त्यानें खूप दिलें
घरकामें ही सोपीं सोपीं करावया मज सांगितलें. २३
एके दिवशीं बालक तान्हे तापानें तें फणफणलें
पैसा नाहीं परन्तु हातीं ओषध त्यातें न मी दिलें २४

बघवेना परि दुःख तयाचें म्हणुनी गेले वाड्यांत
"जीवनरावा, पैसे देतां पोर पडे हो तडफडत." २५

काकुळतीला आलें परि तो हात न उचली द्यायाला
अखेर डोळे गाळत निघते घरास परतुन येण्याला २६

तोंच मागुनी आला वदला. 'देतों पैसे निमिषांत
परी एकदां पुरवी माझा किती दिसांचा तूं हेत. २७
रूप सुन्दरी तूं मदनाची—"

चटकन् थांबे हें वदुनी
"आणि अखेरिस दिधले पैसे चाण्डाळें मज भ्रष्टवुनी २८

पैशापायीं गेलें सारें शील–भीडही मम गेली
कलंकितेचे जिणें–

न तेव्हां मौज जीवनीं मम उरली २९

जीवनरावा होणें आहे गांवींचा त्या पाटील
परन्तु आहे राम तिथें जों शक्य न तोंवर होईल. ३०

वदती कीं तें जागृत दैवत मालक आहे गांवाचा
पाटिलकीचा हक्क वहावा रामाच्या जरि नांवाचा ३१

पाटिलकीचा हक्क चालतो वंशानें हा आजवर
मिळकत आहे खूपच त्यांची किती दिसांहुनि भराभर. ३२

लोभ सुटे मग जीवनरावा पाटिल व्हावें येत मनीं
राम तेवढा कसेंहि करुनी द्यावा येथुनि हालवुनी ३३

म्हणुनी त्यानें येथें आहे बान्धविलेलें मन्दिर हें
नारायणही सोंग घेउनी वेड्याचें मग बसला हे ३४

उगाच अफवा उठवुनि दिधली स्वप्नीं आला राम अशी
खोटी आहे कसें म्हणावें देवाची ही कृती अशी? ३५

आज उद्यांला राम तेथला उचलुनि येथें येईल
पैशाची त्या लालुच मिळतां देति अनुज्ञा पाटील. ३६
परन्तु मजला योग्य न वाटे राम आमुचा उचलावा
म्हणून करितां विरोध लागे करावयातें मम दावा ३७
आजवरी मज डांबुनि ठेवी भाऊजींना विदित नसे
परन्तु फुटलें बेंड आजला लपणें आतां शक्य नसे. ३८
ओरडून मी सांगणार कीं सोंग चाललें धर्माचें
देउळ टाका पाडुन तोडुन देउळ नच तें रामाचें" ३९
इतुकें बोलुन उठली गौरी तोंच तिचा तो हात धरी–
"गौरी, गौरी, कांहीं क्षण तरि मनास अपुल्या घट्ट धरी" ४०
"शक्य नसे, मी पहा सांगतें अताच साऱ्या जनतेला"
"गौरी, गौरी थांब जरा तू ओळखसी नी गोपाळा ?" ४१
पुनः हवा ना तुझा तुला तो तसाच प्रेमळ गोपाळ ?"
शब्द ऐकतां, 'कोण तुम्ही ?' हें पुसते गौरी बेताल. ४२
कानीं सांगे सारें कांहीं तदा वदे ती, 'असें ? चला.'
गेली त्याला सोडुन सदना हतभांगो मग ती बाला. ४३
चला मिळाला भरभक्कम हा एक पुरावा अपणाला
या आनन्दें तोंच तयाचा लागे मग हळुहळु डोळा ४४
पुनः एकदां किती दिसांनीं उगवे आनन्दी गगनीं
उषा सुन्दरी मागुन दिनकर उत्साहाचा झरा मनीं ४५
किलकिल कानीं पडतां उघडे नेत्रा अमुचा राजीव
दिसली त्याला मधु सृष्टीची सुन्दर आकृति रेखीव. ४६
आजवरी जो प्रचण्ड वाटे मनोव्यथेचा कल्लोळ
ज्वाला उठल्या गगनीं त्याच्या तीच उषा ही तेजाळ ४७

मूढ कवी ते वदती त्याला उषादेविच्या प्रीतीचा
रंग गुलाबी गगनीं खुलला उषादेविच्या गालींचा ४८
कुणी उषेला उत्साहाची जननी ऐसें कसे म्हणे
हेंच कळेना एक निराशा जिथें सारखी गीत म्हणे ४९
आज मावळे दुष्ट निराशा उषा सुन्दरी गोड दिसे
उत्साहाची प्रेरक शक्ती दिव्य उषा ती खरी असे. ५०
उठुनी तेव्हां जाऊं लागे घरास अपुल्या भराभर
पश्चात्तापें भरलें त्याचें उत्साहेंही चिदन्तर ५१
गोपाळाची पत्नी दिसली तिनेंच मोठी साक्ष दिली
संग्रामाची ध्वजा खरोखर समोर माझ्या उभारली ५२
करावयाचें युद्ध आमुचा रक्षण करण्या श्रीराम
हवेंच मजला परतुनि जाणें सुरसारातें-हें काम ५३
करुनी आधीं उजळुनि द्यावें मळलेलें तें यश अपुलें
तरीच दावूं आईला हें तोंड यशानें फुललेलें ५४
परन्तु आला आहे येथें म्हणती अमुचा पाटील
राम आणण्या आज अनुज्ञा वृथा तयाला देईल ५५
त्यापूर्वी मी तयास भेटुन शकेन कांहीं जरी करूं
संग्रामाचा प्रश्न तेधवां शकेल बाजूं एक सरूं ५६
काय करावे ? कोठें जावें ? आधीं हें कीं तें आधीं
कशी निस्तरूं मनिची माझी सुखासुखी मी ही व्याधी ? ५७
कुठें मला तो एकलाच हो दिसेल अमुचा पाटील
भाऊजी तर इतमामानें अपुल्या सदनीं घेतील ५८
जावें त्यांच्याकडेच—ते तर मजवर रागें भरलेलें
गौरी जवळीं बघुनि तयांच्या कातुर हृदयीं उठलेलें ५९

(राजीवा रे ! याहुनही तूं महापातकी आहेस
भाऊजींच्या सुनेस केलें कलंकिता तूं आहेस !) ६०
तरी निघाला रघुवीरांच्या घराकडे तो खिन्नपणें
पूर्वस्मृतिनें हृदय तयाचें भरूनी आलें दीनपणें ६१

या रस्त्यानें आपण होतों रोज घराला या येत
तास तासभर होतों येथें कलेस कांहीं शिकवीत ६२
या रस्त्यावर या बाजूला प्रथम पाहिलें मी होतें
'कलेस शिकवा' भाऊजी मज असे म्हणाले जैं होते ६३
भाऊजी रघुवीर नांव हें प्रस्थ केवढें गांवाचें
आणि तयांच्या मुलीस येई भाग्य थोर शिकवायाचें ६४
पहिले दिवशीं किति उत्साहें शिकली सारें नीटपणें
'भाऊजीही प्रसन्न झाले' कला आपणा असें म्हणे. ६५

भाऊजींची मर्जी झाली जरी आपुल्यावरी तरी
पन्नाशीचा पाढा वाचत वसलों नसतों जन्मभरीं ६६
कृपाछात्र हें त्यांचें मिळतें—मिळतां पगार भरपूर
सुधारणेचा कार्यक्रम मी केला असता भराभर ६७
आज उद्यां वा (काय नेम त्या?) कलाहि अपणा देणार
भाग्याला मग मुळींच्च सीमा माझ्या नाहीं उरणार. ६८

मनांतले परि माण्डे माझ्या मनांमध्यें सगळे विरले
रेघोटया वर फासुनि माझें चित्र जागचें तें थिजलें ६९

संभाळाया मनास गेलों निघुनी मी त्या रानांत
तिथेंहि माझें मानस होतें गटगळया परि तें खात ७०
आज यायचें चोरुनी येथें कुणीं न अपणा पुसणार
भाऊजींच्या योगें माझी कलाहि मजवर हसणार ७१

माझी कसली कला कशाला आजवरी ती असलेली
एकसारखी वाट पाहतां अखेर कंटाळुनि गेली. ७२
रागावुनि ती मजवर गेली असेल मजला विसरून
कशास मग मी जावें तिकडे अवमानितसें होऊन ? ७३
परन्तु आहे भेटायाचें पाटलास त्या अवश्य ना
कसें तयाला भेटावें हें सुचे न कांहीं तरी मना. ७४
पाटीलाच्या नांवें लिहुनी चिठ्ठी द्यावी धाडुन
बाहेरचा त्या घ्यावें म्हणजे झालें मग बोलावून ७५
विचार करतो असा पातला भाऊजींच्या घरावरी
बागेमध्यें आला, आलें भरून त्याच्या चिदन्तरीं ७६
केवळ शंका कशास ऐशा हांक मारुनी बघूं जरा
हळूं कलेला बघूं तरी तिज राग येतसे काय खरा ७७
खिडकीखालीं येउन बसला तरी धीर त्या होत नसे
इतुक्यांतच त्या कानिं कलेचें गीत गोडसें येत असे. ७८

किति शोधुं सख्या वनमालीला ग
पाहूं मोहन कृष्णाला. धृ

मी गोकुळ धुंडुनि आलें सगळें
वृन्दावन उपवन मी शोधियलें
यमुना तीरीं जाउन पाहुन आलें
कुणि ठाव ठिकाणा नच दिधला ग
शोधुं कुठें वनमालीला १

अन्तर राया तळमळतें रे
तुझियासाठीं नित झुरतें रे
दुःखें आंतच जळजळतें रे
दुःख मनांतिल सांगु कुणाला ग
शोधुं कुठें वनमालीला. २

वेडी मजला म्हणतिल सारीं
थट्टा माझी करिति परोपरी
हृदया सुख मम नाहीं भीतरि
जाऊं तरि कशि बघण्याला ग
आणुं कशी वनमालीला ३
अन्त:साक्षी सकल जिवांचा
दाह दिसेना कसा मनाचा
धांवा कानीं कां जायाचा
कानीं जाइल हांक सख्याला ग
पाहिन कां वनमालीला ४
गीत ऐकतां राजीवाच्या तोष मनाला होत असे
तळमळ हृदया काय कलेच्या खरेंच अजुनी तीव्र असे? ७९
मजविषयींची कीं दुसऱ्याची गीतच की ती गात बसे
'राजीवा' ही हांक तयाच्या कानांवरती येत असे ८०
करुनी पाही मान उंच तों खिडकीमध्यें तथा दिसे
दिवसां ढवळां कला-न केवळ भास मनाला होत असे ८१
भास न परि तो समोर त्याच्या कला येउनी बसलेली
परस्परांची वृत्ति करावी वर्णित कैसी त्या कालीं ! ८२
राग मानसीं आला होता काय कुणाच्या तरी तदा
काय उखाळया काढुनि होता पटवायाचा वायदा ? ८३
काय कलेला मागायाची होती क्षमाच अपराधा ?
राजीवातें किंवा होतें बोलायाचें मनीं तदा. ८४
कधीं सांगुनी टाकिन सारें मनांतलें मी राजीवा
असें कलेला झालें होतें भेटे मनिचा तिज ठेवा. ८५

अनुरागाचें एकच होतें मनात त्यांच्या अस्तित्व
अनुरागाचें एकच चाले राज्य तयांचें राजीव. ८६
उगाच रुसवा फुगवा चाले कशास त्यांच्यामधें तरी
कशास स्मरणें गतगोष्टींना कारण त्यातें नसें जरीं. ८७
घळघळ ओघळ नयनांमधुनी परस्परांच्या येतात
कलुषितपण तें मनिचें त्यांच्या वाहुनिया सहजीं जात ८८
म्हणुनिच केला प्रश्न कुणी नच गतगोष्टींना स्मरावया
आवरुनी आवेग वदे तो, "वेळ नसे मज दवडाया. ८९
काम आपुलें सांगतसे तो तेव्हा वदते कला तया.
"झाला आहे उशीर आतां-वेळ नसे जरि दवडाया. ९०
वाट पाहते कधिची मी नर तुमचा पत्ता मुळीं नसे
कहर केवढा झाला याचो तुम्हां कल्पना मुळीं नसे. ९१
जीवन नामें आला कोणी भक्त आमुच्या घरामधें
जीवन आमुचें सारें मळलें जीवन ये जों घरामधें ९२
भाऊजी परि पूर्ण मोहिले मोहक त्याच्या वचनांनीं
अध:पात हा तयां कळेना चाले जो अमुच्या सदनीं"९३
'सारे मजला कळलें आहे पाहुनि घेतों तयाप्रती
जीवन आहे कोण माझिया पुढे पहातों क्षुद्रमती. ९४
सारा आहे गांव माझिया कुलशीलानें--"

"पुरे पुरे,

कुलशीलाची स्तुती आपुली अपुल्या तोंडीं नको बरें ९५
आज विचारा गांवामध्यें कोण विचारी तुम्हास ती
म्हातारी ती पडली आहे कुणा न ठावें जिवन्त ती. ९६

तुमच्या नावें खडे फोडती सारे जन या नगरांत
तोंड दावण्या तुम्हांस येथें दांत घशांतच आहेत ! ९७
खूप वाजले धिडवडे ते–"
"कले, बोलसी हें काय "
"गांवामधले प्रवाद निघती सांगतसे मी परि हाय ! ९८
भाऊजी जर तुम्हांस येथें बघतिल माझें सर्वे असे.
तदा उभयतां जावें सोडून लागेलच हें प्राप्त असे ९९
गांवामध्यें कुठें विचारा जीवन राजासमान त्या
त्याच्यावरुनी कुरवंडुनि ते टाकिति अपुल्या
ज्योती या १००
त्यानें आहे बान्धियलें हें मन्दिर अमुच्या नगरांत
धर्मरक्षणा मण्डळ आहे स्थापियलेलें शहरांत १०१
वकील, डॉक्टर, मास्तर सारे एक दिलानें येतात
भाऊजींचें प्रवचन सारें एक दिलानें स्मरतात १०२
सुरसाराहुन राम आणणें उद्यां तयांना आहे हो
आजच आले पाटिल त्यांनीं म्हटलें भाऊजींना'हो '१०३
"कले बोलसी काय तयाचा अर्थ मनाला नच कळतो
येथें येउन वाटे माझा जीव सारखा तळमळतो. १०४
आहे कोठें जीवन त्याला भेटुन बघतों मी, सांग"
"कसें तुम्हांला सांगूं माझें कांपतसे हो सर्वांग. १०५
जीवन घेउनि आला आहे वैनीला तो इतुक्यांत
गर्भपात अन् केला आहे. जाउनि मोठ्या शहरांत १०६
तुम्हांवरी तो आला आहे भयाण असला आरोप
जा जा येथुनि निघुनि करा जा करायचा खटाटोप १०७

झालें जरिहि इतुक्या दिवसामधें आपुलें मीलन तें
अजून नाहीं पूर्ण सुखाचें म्हणून तें मी आवरतें १०८
सांगायाचें तुम्हांस होतें सांगितलें मी तें सारें
करावयाचें काय करा तें तुम्हींच आतां चट्सारें" १०९
अश्रू भरूनी आले तेव्हां नयनिं कलेच्या निमिषांत,
"परन्तु माझें सहाय्य मनिचें तुम्हांस केवळ आहेंत. ११०
सांगायाचें होतें केवळ मनिचें माझ्या राजीवा
सांगितलें मी आज तयाला-समाधान हें मम जीवा. १११
होइल अन्तीं मीलन अमुचें गोड गोड ही आस मनीं"
तुकें बोलुन घरांत अवचित गेली कला परी निघुनी ११२

*●*

अतां कोठुनी शक्य भेटणें आईला या दिवसांत
घेतों म्हणतां भेट आपणा जाऊं नेदिल ती परत १

या वेळेला असेल अपुला पाहत अपणा गोपाळ
दिसलों नाहीं म्हणून झाला असेल हृदयीं उताविळ २

करावयाचें कार्य कराया शक्ति न अंगीं राहील
मजविषयीच्या चिन्तेनें तो होउन जाइल बेताल. ३
कोण तरी मग त्या जनतेला प्रोत्साहन तें देईल
सुरसारांतिल जागृत दैवत उचलुनि ते खल नेतील ! ४

चला एकदां भाऊजींना सांगुनि पाहूं सारें तें
घेतिल भलतें कार्य आपुलें मागें सूज्ञ विचारें ते ५
मजवर आहे केलेला जो प्रचण्ड त्यांनीं आरोप
मुळांतुनी तें उपटुन टाकूं जसें विषारी कुणि रोप ६
कला सोडुनी गेली जेथुन तिथें राहिला उभा जरा
डोक्यावर तों नयनाश्रूचा थेंब गळाला स्पष्ट खरा ७
बघतो वर तों खिडकीमधुनी मागें सरलें कुणी तरी
कला असावी असें वाटुनी गंहिवर आला हृदन्तरीं ८
कला न रुसली मजवर हें मज निमिषापूर्वी जरि दिसलें
तिच्या प्राप्तिचें अन्तर अजुनी समीप तसुभर नच आलें ९
जीवन टाकी कलासाधनीं धोंड माझिया पथामधें
संशयसागर गभीर पसरे जीव तरंगे तयामधें १०
संशय टाकूं निस्तरूनी मी कसा ? कशाची भीति मला ?
भाऊजींच्या पुढतीं जाउन विचारतों मी... ११
असें मनाशीं ठरवुन बघुनी पुन: एकदां कलेकडे
निश्चय करुनी समोर झाला जिथें भेटती ते तिकडे १२

वाटेंतच पण तयास भेटे जानरावजी पाटील
"राम राम" हा ठरीव उपचार उपरोधानें करतील. १३
"कुणीकडे हो इकडे केव्हां आले ? होतें काम तुम्हां
तुम्हीं यायचे इथें न होतें ठाउक आधीं काल अम्हां १४
मिळून दोघे आलों असतो नवीन अमुच्या गाडींत
जोडी अमुची पाहुनि तुमचा प्रवास होता मौजेंत १५
अडीचशें मी मोजुन दिधले रंग तयांचा पाहुनिया
शंभर कोसांमधें तयांना जोड न दुसरा मिळावया १६
भाऊजी हे दोस्त आमुचे म्हणुन तयांना भेटाया
आज धांउनी आलों होतों अतां निघालों परताया. १७
"काय यायचें परत आजला ? जाऊं अपुल्या गाडींत'
'नको, नकोजी, कशास इतुकें, जाइन पायीं मी परत' १८
"पायीं ? छे छे: गाडी असतां जावें कां म्हणुनी पायीं!"
"माझें काम न अजुनी झालें—आज व्हायचें तें नाहीं" १९
"राम राम जी येतों' वदुनी सरले पुढतीं पाटील
राजीवाने परन्तु वळुनी हांक मारली, 'पाटील' !" २०
तोंडावरचें राजीवाच्या गेलें निघुनी सौम्यपण
अन् क्रोधानें तोंड जाहलें किंचित् त्याचें क्रूर, पण— २१
राग आवरे, करुनि हांसरें तोंड तयांना तो वदतो,
"भाऊजीचें नूतन मन्दिर आज इथें हें मी बघतों. २२
पाहियलें तें काय तुम्ही हो ? नसेल तर घ्या पाहुनि तें"
'वा:वा: आल्या क्षणींच दर्शन घेउन आलों मन्दिर तें.' २३
"प्राणप्रतिष्ठा कधीं व्हायची? मूर्ति कोणती बसणार?"
तेव्हां करूनी तोंड वांकडें पाटिल त्यातें बघणार ! २४

"श्रीरामाची मूर्ति आणिली आहे सुन्दर जयपुरची
प्राणप्रतिष्ठा उद्यां मुहूर्तीं मंगल तेथें व्हायाची" २५

"पुनः कशाला येणें जाणें ?अतां कशाला जात असां ?
प्राणप्रतिष्ठा बघुन उद्यांची
जाऊं परवांच्या दिवसां" २६

"आहे कांहीं काम मला हो सुरसारांतच निकडीचें
प्राणप्रतिष्ठेसाठीं नाहीं बहुधां येणें जमायचें" २७

"पाटिलदादा, ऐकतसे मी सुरसाराहुन श्रीराम
आणणार ते येथें वदती मूर्ती अपुली अभिराम." २८

"छे छे: भलतें कसें घडे हें ! सांगितलें हें तुम्हा कुणीं ?
राम आमुचा हलवायातें कोण पाहतो हो धजुनी?" २९

"समजा झालें तसें जरी तर विरोध सगळे तया करूं"
"छे छे: कसला विरोध अन् काय–
छे छे: विरोध सर्व करूं" ३०

लटपटपंची ओळखली ती राजीवानें, क्रुद्धपणें
डोळे रोखुन बघतो त्यातें, वदतो मग तो क्रोधानें ३१

"पाटिलदादा लपवाछपवी किती कुणाशीं करणार ?
गमजा तुमच्या माझ्यापुढतीं निष्फळ साऱ्या ठरणार. ३२

पैशासाठीं दैवत अपुलें उचलायातें सिद्ध असे
जो नर त्यातें जगण्याचा
मुळि या जगतीं हो हक्क नसे. ३३

कळलें आहे सारें मजला. किती मिळाले हो पैसे ?
हजार रुपये मोजुन असतिल तुम्ही घेतले छन्‌छन्‌से ३४

पैसे घेऊन वाडा अपुला बांधा गाडुनि द्या हंडा
किंवा हिंडा गांवोगांवीं–उडवा रोज नव्या रांडा ३५
ध्यानीं ठेवा पैसा सहजीं तुम्हांस पचणारा नाहीं
परिणामीं तें काय व्हायचें सांगत आतां मी नाहीं. ३६
रामासाठीं केवळ चालू पाटिलकी तुमची आहे
रामच जातां काय तुम्हांला दिडकीही शिल्लक राहे? ३७
खुशाल उडवा हजार रुपये दोन चार ते वर्षांत
कुत्राही मग हाल न खाइल-त्रसा सारखे मग रडत. ३८
विचार करुनी करावयाचें काय करा तें हो अपुलें''
''पाटिलदादा'' म्हणुन जीवनें तोंच तयाला बोलविले ३९
''कां हो पाटिल, कोण गांवचा
मनुष्य तुमच्या कां आहे ?''
ऐटीनें तो जीवन त्यातें असें तेधवां पुसताहे. ४०
''कां हो ? झालें तोंड असें कां ?
आतां विचार कसला हा
पुढचें आम्हीं पाहुन घेतों तरि नांवाचा जीवन हा.'' ४१
''जीवनरावा,'' राजीवातें तदा राहवे मग नाहीं,
''संभाळा हो, भलत्याशीं मुळि
गांठ आपुली हां नाही. ४२
जाणतसे मी सर्व आणतों उघडकीस तुमचें बेंड
या गांवातुनि निघेल तुमची आज उद्याला हो धिंड'' ४३
''जीभ आपुली आवर पंढा कुणासवें तूं वदतोस ?
काय नांव रे मशका ?
व्यर्थच बडबड कां तूं करतोस ?'' ४४

"या देहाला लोक बोलती प्रेमें अमुचा राजीव
जन्मापासुन आजवरी हा प्रेमावर वाढे जीव." ४५
"या प्रेमानें रघुवीरांचें नांव प्रेमळा मळवीलें
भाऊजींना वृद्धपणीं तू भलतें दूषण लावियलें. ४६
सून तयाची वेडी झाली तुझाच लागे तिज ध्यास
खाते फिरते करतें सारें परन्तु केवळ तव ध्यास ४७
"आजच तिजला घेउन आलो मुंबइवरुनी बिचारिला
गर्भपात तो केला म्हणुनी धक्का हृदयाला बसला." ४८
"ठीक ठीक! तें पाहुन घेतों सारें कांहीं निमिषांत
चिन्ता कांही करूं नका हो, जमेल सारें यथास्थित" ४९
"बस बस ! बडबड करूं नको रे, चला तुम्ही हो पाटील
काय अर्थ त्या शब्दामध्यें टवाळ बेरड चवचाल." ५०
राजीवानें पाहियलें ते दोघे बसले गाडींत
मिळून गेले सुरसाराला स्पष्टच सारें कीं दिसत. ५१
क्षणभर गेला गांगरूनी तो काय करावे सुचेच ना
कसें धजावें पुढें तयाची मुळीं कल्पना येई ना, ५२
वैनीनें कां म्हणुनी माझा उगाच धरिला मग ध्यास !
सारें उलटें माझ्यावर हें. कसें करावें मग त्यास ५३
बाकीचें मी पाहुन घेइन परन्तु याचें कसें करूं ?
जीवावरचा कलंक माझा कसा बरें मी निरा करूं ? ५४
कला तरी कां करील मजला मदत अशा या दिवसांत
काय तियेला तरी यांतलें असेल थोडेही विदित ? ५५
भाऊजींना स्पष्टपणानें काय विचारुनि मी घेऊं ?
परन्तु ते तर मजवर अतिशय रागवलेले, कसे करूं ? ५६

आज निघाले जीवन अमुचे सुरसाराचे पाटील
आणि उद्यांला संग्रामाची रणभेरी ही माजेल ५७
परी एकटा काय आपुला करील तेथें गोपाळ ?
काय करूं मी ? असाच जातों, होवो मग जें होईल.५८
आणि निघाला तसाच, आला ओलांडुनि अपुलां गांव
वळून बघतां डोळ्यांवाटे अश्रू गाळी राजीव. ५८
हा रे देवा ! किती जिवाला फिरविसि ऐसें तूं आतां
फिरव वाटलें तितुकें-परि मग यश दे अन्तीं मज बघतां ६०
काय येउनी गांवीं जावें बघुनि न अपुल्या आईला
माझ्यासाठीं तिला न मिळतें सौख्य जीवनीं बिचारिला ६१
योग्य न हें ना निघुनी जाणें--जाऊं भेटूं आईला
घेऊं आशीर्वाद तियेचा परतुनि जाऊ गांवाला ६२
फिरूनि निघाला, आला गांवीं घराजवळ तो मग जातो
दार बन्द पण आंतुनि कसला तरी शब्द ऐकूं येतो. ६३
कान देउनि ऐकतसे तो शब्द कलेचा त्या भासे,
वदते, "आई राजीवांची प्रकृती मजला छान दिसे ६४
आज उद्यांला येतिल फिरूनी भेटायातें तुम्हांप्रती"
'कां पण आजच भेट न घेतां निघुनी गेला घराप्रती? ६५
कले, मनाला एकच आतां आशा जगतीं ही आहे
तुम्हां उभयतां सुखांत ऐसें कधि डोळ्यांनी मी पाहे.' ६६
"इश्श, काय हें, झोपा आंता सुखांत आहे राजीव."
शब्द कलेचे ऐकुनि आला आंत बिचारा राजीव ? ६७
राजीवातें बघतां झटकन् आईनें त्या आवळिलें
मातृप्रेमा बघुनि कलेचे नेत्र आसवांनीं भरले ! ६८

वराच झाला वेळ कुणीही शब्द न काढीं मुखांतुनी
राजीवातें करी न आई अंगापासुनि दूर क्षणीं. ६९
राजीवानें अखेर खाटेवरती तिजला निजवियलें
"अतां झोपतें शांतपणें मी राजीवा अन् वरें कळे!" ७०
म्हणतांना हें वाक्य जराशी म्हातारी ती कां हंसली
याचें उत्तर दृष्टि कलेची स्पष्टपणें देती झाली. ७१
"कले, विचारूं एक तुला मी प्रश्न ?" विचारी राजीव
ऐकतांच हें धसकन् झाला मुग्ध कलेचा तो जीव ७२
मनापासुनी होती जरि ती इच्छित अपुल्या राजीवा
गोड प्रश्न हा येतां तिजला वाटे मग संकोच नवा. ७३
वाढत जाई श्वास, तियेचा उरोभाग ही उडतो
कपोल झाले लाल, कंपही तिच्या शरीरिं मग भरतो. ७४
'हो' म्हणवे ना म्हणून खालीं मान घालुनी उभी असे
प्रश्न विचारू नये तयानें वाटत तिजला मनीं असें. ७५
'होशिल कां तूं माझी?' हा कां प्रश्न निराळा विचारणें
देतें अर्पुन हृदय प्रियकरां नित्य प्रेयसी शान्तपणें. ७६
,होशिल कां तूं माझी ?' कां मग त्यानें तिजला विचारणें
अपमानच कां प्रश्नानें त्या तिच्या प्रीतिचा नच होणें ७७
परन्तु होता राजीवाचा प्रश्न निराळा अता खरा,
"वैनीनें कां ध्यास घेतला माझा हेतू काय खरा?" ७८
"निज दुःखानें वैनी झाली आहे वदती वेडी ते
परन्तु नाहीं वेडेपण तें स्पष्टच मजला हें दिसतें ७९
झाला आहे संभ्रम तिजला कोंडुनि गेले विचार ते
म्हणून निघति न स्पष्टपणानें तोंडावाटे शब्दच ते. ८०

परन्तु होती म्हणत सारखी, ‘राजीवा, तें देऊळ
पाडुनि टाका, मोडुनि टाका, ढोंग मला नच
बघवेल ?” ८१

“झालें माझें काम अतां मी आज जातसे सुरसारा
जीवन आणिक पाटिल अमुचे अतांच गेले तिथें जरा.८२

आजवरी तूं मम मातेला जसें रक्षिलें नीटपणें
माझ्यासाठीं आणिक थोडा वेळ तियेला हो जपणें ८३

वाटे जाणें तेथें अवश्य आहे परन्तु जाणें जमें न त्या
काय जाउनीं तेथें करणें हृदयें असल्या धडधडत्या. ८४

परन्तु जाणें तेंथें आहे अवश्य मजला याच घडी
संग्रामाची रणभेरी ही वाजतसे रे घाल उडी.” ८५

आणि बोलुनी अखेर गेला सोडुन सदना राजीव
आवरलेला अश्रुपूर मग गाळी भोळा तो जीव ! ८६

रस्त्यानें जरि सारखा पळतसे राजीव चित्तीं तरी
मातेचें स्मरुनीच प्रेम अवघें ना हर्ष त्या अन्तरीं
जातांना कधि वाटलें परतुनि जावें घरा सांप्रत
वाटे योग्य न तें परन्तु घडणें दु:खामुळें आहत. १

चित्तीं एक विचार काय घडलें तेथें असावें असा
गोपाळांस हुरूप काय नुरला कार्यांत या साहसा
आले ना! असतील काय अपुलें साहाय्य त्या द्यावया
किंवा ते उचलून राम अपुला येतील तासांत या २

कोणीही न विरोध दाखवुनि त्यां नेऊं असे कां दिलें ?
रामाचें असलें विडम्बन तयें कां सर्वही साहिलें ?
किंवा होत असेल काय अवघें तेथें अतां कन्दन
कोणाची सरशी असेल? अपुली? पावेल कां जीवन ? ३

दुर्दैवें जरि जाहलों जित अम्हीं तें श्रेय जाईल हो
जाई तें निघुनीच छत्र अमुचें, संहार तेव्हांच हो
रामानें किति रक्षिलें नगर तें सारे तिथें जाणती
'रामानें दिधला आम्हांस असला राजीव' ते बोलती ४

राजीवा ! परि संकटांत न तुझें साहाय्य त्यांना लाभलें
'येतां संकट-काळ होय जवळीं ऐसा न कोणी मिळे ?
राजीवा ? जरि त्या वनात पडुनी रात्रींत त्या राहसी
कोल्हयांनीं धरुनी तुला खचित कीं नेलें असे मृत्युसी ५

रेघोटया परि काढुनी तुजवरी गोपाळ नामें कुणीं
रामाच्या भजकें पुन: परतुनी रे लाविलें जीवनीं
पोरीच्या रुसव्यामुळेंच सहसा गेलास वैतागुन
मातेला विसरून आणि बघसी मृत्यूस पाचारून. ६

आहा रे शतमूर्ख लंपट मना धि:कार तूतें असो !
मानव्या विपरीत आचरण तें धिक्‌धिक् जिणें तें असो! !
'आहे मी किति हा सुशिक्षित' असा जो गर्व तूं वाहसी
एका क्षुद्र निरक्षरें पळविला हें सर्व तूं पाहसी ७

अन् आतां तिथूनी निघून पळुनी आलास गांवाकडे
बातां कां मग मारिल्या उगिच तूं–ना जीभ तेव्हां अरे
जा जा, सत्वर जा, असेल बघता तो गोपाळ रे
जाऊं काय पळून काय उठुनी जाऊं कसा मी बरें ? ८

ऐसें येउन मानसीं लगबगीं चालावया लागला
जातांना परि त्या मधेच थकवा कां यावया लागला ?
चाले तो तरि सारखा हरघडी तो एक चित्तान्तरीं
येतो त्यास विचार काय घडलें आहे तिथें मन्दिरीं ९

येणारे तिकडून त्यास दिसले गाडीमधें बैसुनी
जातो धांवत तो तया जवळ त्या पाहील न्याहाळुनी
"राजीवा" म्हणुनी तयास जन ते जोरांत हांकारिती
जातों धांवत तो जणूं अडवितो गाडी अतां धांवती १०

तदा थांबली गाडी वदती, "चला चला हो राजीव
गोपाळानें पाचारण हें तुम्हांस केलें हतदैव. ११

चला संपलें भाग्य आपुलें झाला जखमी गोपाळ
शिरले सारे तेथें जाउनि भ्रष्ट जाहलें देऊळ १२

गोपाळानें शिकस्त केली राम आपुला लढवाया
होता त्यानें वार उचलला जीवनास त्या माराया १३

परी कळेना कां दुर्दैवें काठी हातांतुन गळली
आणि शत्रुची एकच काठी डोक्यावर त्याच्या बसली. १४

त्या पूर्वी जें दिलें जीवनें गांवामध्यें व्याख्यान
त्याच्यायोगें सारी जनता विसरुनि गेली निज मान १५

वदला त्यांतें, "श्रीरामानें स्वप्नीं येउनि सांगितलें
'मजसाठीं जें बांधियलें तें मन्दिर मजला आवडलें १६

या साठीं मी येथुन उठुनी तिथें यावया इच्छितसें
गेलों जरिही सुरसारावर प्रीत सारखी तीच असे' १७

श्रीरामाच्या आज्ञेचें या पालन झालें जों नाहीं
नारायण तो तोंवर वेडा खराच होउनिया राही. १८

श्रीरामाच्या इच्छेला या विरोध करण्या कोण जगीं
समर्थ आहे? शक्ति कुणाच्या आहे असली ती अंगी? १९

खुळचा कल्पना सोडुनि द्या त्या राम आमुचा इथें असो
कुठेंहि असला देव तयाला येतें सारें तरी दिसों २०

नारायण तो पहा आणिला येथें आम्हीं हो आहे
तुम्हांकडे तो केविलपणा करुनि चेहरा बघताहे २१

चला चला, तर जयघोषानें निरोप रामाला द्यावा
प्रसंग या विण दुःखद दुसरा कुणावरी
असला यावा ?" २२

मानभाव ते शब्द ऐकुनी सारे जन त्या फसले
राम आणण्या त्याच्यासम ते मिळून सारे मग गेले. २३

जयघोषांतच टाळघोळ अन् मृदंग वाजे फडाफड
गोपाळाचे अनुचर त्यावर तुटून पडलें धडाधड. २४

परन्तु अवघे मोजुन होतों अम्हीं बिचारे पन्नास
उरलेले ते सारे गेले मिळून अमुच्या शत्रूस २५

काय लागतो पाड तिथें मग ? जखमी झाला गोपाळ
श्रीरामाचा एकच चालू घोष तिथें मग राहील. २६
चला चला, हो मन्दिर त्यांनीं असेल आतां वेढियलें
उद्यां सकाळीं राम न्यावया असेल सारे सजलेले.'' २७
"चला चला, तर" म्हणून बसला गाडीमध्यें राजीव
सारें खेडें दिसलें त्याला जणूं जाहलें निर्जीव. २८
गोपाळाच्यापाशीं जाउन वदतो त्यातें, "गोपाळा
वीर खरा तूं, शूर खरा तूं मित्र खरा तूं मिळे २९
मला. घेइ विसावा क्षणभर,"
"छे छे: आलों आतां तुझ्यासवें
बरी जाहली जखम पहा हो-शौर्य मिळालें मला नवें" ३०
कुरवाळुनि त्या परि गोपाळा हळूच निजवी राजीव
आणि निघाला काय करावें बघावयातें तो गांव ३१
त्यातें बघतां चट्कन् सारे जमले त्याच्या भंवताली
राजीवाचे शब्द ऐकण्या जनता सारी टपलेली ३२
वदे तयाना आवेशानें, 'राम आपुला देउं नका
रक्षणकर्ता तोच–"
ओरडे कुणी, "आम्हांला चिथवुं नका." ३३
"जरा ऐकुनी घ्या तर सांगे तुम्हांस जें मी शान्तपणें
योग्य वाटलें तुम्हांस तुमच्या स्वाधीनच तें तें करणें ३४
नारायण तो वेडा नाहीं स्वप्न कुणाला नच पडलें
बनवाबनवी सारी हें मज अतांच खात्रीनें कळलें ३५
जीवन अपुले, तुम्ही जाणतां तयास, अपुले कुलदीप
त्यांना होणें पाटिल आहे, म्हणून झटती ते खूप ३६

श्रीरामाच्या नांवावरती पाटिलकी ही चालतसे
जागृत दैवत असें सर्वही जनता त्यातें मानतसे ३७
मिञा अमुचा जीवन वाटे राम येथुनी हलवावा
पाटिलकीचा हक्क पाटला मारुनि आपण मिळवावा. ३८

भाऊजी रघुवीर जयांनीं बांधियलें तें देऊळ
सून तयांची विधवा आहे एक बिचारी सुनिर्मळ ३९
चाण्डाळानें भ्रष्टविलें तिज आहे जीवनरावांनीं
परन्तु दिधले कानावरती हात तयांनीं ठरवूनी ४०

धर्मशील ते भाऊजी या चाण्डाळानें भुलवियले
ढोंग न बघुनी भाऊजी ही मोहक वचनांनी फसले. ४१
कालच अपुले भेटुन आले भाऊजींना पाटील
हजार रुपये घेऊन आले अतां गप्प ते बसतील. ४२

जाल खलाच्या मोहक वचनें फसून सारे काय तुम्ही ?
राम आपुला खोवून बसण्या तयार झालां काय तुम्ही? ४३
धर्म अपुला बुडवाया कां तयार झाला अहा तुम्हीं ?
देव आपुला भ्रष्टविण्यातें तयार झालां काय तुम्हीं ?
श्रीरामातें विसरूनि जाण्या तयार झालां काय तुम्हीं ?
पापकर्म हें करावयातें तयार झालां काय तुम्हीं ? ४५
काय तुम्हांला निज धर्माची चाडच नुरली खरोखरीं ?
काय जीवनीं जगून असल्या लाभ व्हायचा तुम्हां तरी? ४६

थू:तुमच्या रे जिनगानीवर ! भरा बांगड्या हातांत !
रांडांमध्यें जाउन बडवा ढोल आपुले मौजेंत ४७
खुशाल व्हा रें निज धर्माला निज देवाला बेमान
मृत्यूनंतर नरकामध्यें पिचत पडा रे चिरन्तन ४८

असेल कांहीं रक्त खेळतें तुमच्या अंगीं आर्याचें
तरी पुढें व्हा मरण्यासाठीं ! जगा जिणें हें वीरांचें ४९
असेल कांहीं चाड तरी या मागुन माझ्या प्रभूकडें
नसेल येणें तरी एकटा जाउन त्यांच्यावरी पडें " ५०

इतुकें बोलुन श्रीरामाचा करुनि निघे तो जयघोष
श्रोत्यांमधुनी लगे निघाला प्रतिध्वनीचा उन्मेष ५१
भराभरा ते धाऊन आले काठचा घेउनिया हातीं
लहान मोठे सारे तेथें उत्साहानें मग जमती ५२

' राम आमुचा नेउं नका चाण्डाळांनों" ते वदती
श्रीरामाचा एक गजर ते सर्व मुखांतुनि ओरडती. ५३
आले सारे भवती जमले, उठुनी आला गोपाळ
म्हणे, "गडचांनों, जिवना होउनि पुढें उभा
हा ठाकेल." ५४

जीवन बघतो प्रचण्ड उलटा जमलेला तो जनमेळा
धूम ठोकतो आणि बिचारा परतुनि नगरा तो गेला.५५
"चला, करू या पाठलाग त्या मारुन टाकूं" कुणि म्हणती
"चला पाटलाकडे जाउनी पैसे घेऊं" कुणि म्हणती ५६
"चला जाउनी देऊळ टाकूं पाडून त्यांचें" कुणि म्हणती
"तुम्हां न शोभें कृत्य असें हें" वदे तयांना तो सुमति५७
रामरक्षणा एकच झाला प्रचण्ड तुमचा कल्लोळ
सार्थक झालें खरें जिण्याचें मुक्ती सारे पावाल." ५८
पुढची तेव्हां करायातें सर्व व्यवस्था राजीव
गोपाळातें घेऊन संगें सोडुन गेला तो गांव ५९

भाऊजी ते घालत होते फेऱ्या अपुल्या पडवींत
वाटे येतिल इतुक्यामध्यें राम घेउनी निज भक्त. १

आज व्हायची प्राणप्रतिष्ठा झालें अपुलें मग काम
कन्याशाळा बान्धुनि द्यावी लगेच दुसरी अभिराम. २

कला देउनी टाकूं अपुल्या नन्तर जीवनरावांना
सुखें मिटावे नेत्र आपुले जगतामधुनी जातांना ३

काय करावें पोरीनें त्या कलंक अपणा लावियला
काळें करुनी तोंड आपुलें कुठें कारटा तो गेला ४

ठावें असतें आधीं कीं हा ठरेल पुढती कुळबुडवा
कशास दिधली सहवासीं त्या कला आपुली असती वा ५

परन्तु त्याच्या वडिलांची मी कीर्ति ऐकलेली होती
अकस्मात ते मृत्यु पावले वार्ता कानीं आली ती. ६

तेव्हांपासुनि पुढें पाहतां राजीवातें वाटतसे
अनाथ पोराला त्या द्यावें सहाय्य आपण थोडेंसें ७

या साठीं मी दिधलें लावुन परन्तु उधळी हे गूण
आणि दावतो प्रभाव अपुला माझ्यावर हा उलटून ८

काय नेम त्या ? कलेस त्यानें भ्रष्टविलेलें असेल कां ?
चण्डोलाची वृत्ति पाहुनी येतें हृदयीं ही शंका. ९

काय करावें असेल तसलें ? कशी जीवना द्यावी ती ?
कळलें जर हे जीवन तरि ही कां तिज स्वीकारुनि घेती ? १०

काय करावी तयावरी मी अब्रूसाठीं फिर्याद
घ्यावी कोर्टामधुनी कांहीं तरी तयाची कां दाद ? ११

घरांतलीं तीं कुलंगडीं कां कोर्टापुढतीं माण्डावीं
'गेली माझी इज्जत' ग्वाही निज वदनानें कां द्यावी ? १२

परन्तु अजुनी का नच आले जीवन अपुले परतून ?
श्रीरामाची मूर्ति आणणें जमलें नाहीं कां अजुन ? १३
काय तयांना विरोध त्यांनीं असेल केला भयंकर ?
पाटिलदादा देउनि गेले परि आश्वासन पुरेपुर १४
कालच येथें पाहियलें मी परन्तु आला राजीव
उपाटखुंटी कोण तिथें मग आला दुसरा वा जीव १५
'शशिकला रघुवीर' नांव हें उच्चारित तों येइ कुणी
पाही, आला डांक घेउनी, रसीद टाकुनि जात क्षणीं १६
रसीद कसली उचलुनि बघती भाऊजी तों तया दिसे
बाराशेंचें पार्सल आलें मूर्तित्रय तें त्यांत असें. १७
रामाची ही मूर्ति आणिली कशी कलेनें कशास्तव
बाराशेंचा खर्च असा हा कशास केला अवास्तव ? १८
मला न पुसतां कां म्हणुनी ही मूर्ति आणिलेली आहे
काय कारटी अपुली त्यांच्या कटांत सामिल कां आहे ? १९
राजीवानें काय तियेला मथवुनि दिधलें असेल कां ?
झालें सगळें असें कसें हें,

' घरीं कारटी आहे कां ? २०

सुखरामा ती कला कुठें रे"

"घरांत बाई नाहींत.'

"गेली कोठें ?"

"कुणास ठाउक ! '

"चाळे बरवे नाहीत" २१

"जा जा, पाहुनि आण तियेला मसणामधुनी आण तिला"
सुखरामाची घाबरगुंडी उडे त्वरेनें बघण्याला. २२

इतुक्यांतच ती आली,
"गेली कले कुठें तूं होतीस ?"
"गेलें होतें भाऊजी मी नित्य प्रार्थना करण्यास.' २३
"बँकेचें तें पुस्तक घेउनी"
"तसें नव्हे हो तें कांहीं"
"लटपटपंची माझ्यापुढतीं चालायाची हं नाहीं २४
मूर्ति आणिल्या कशास ?"
"छे: हें कुणीं तुम्हांला सांगितलें?"
"रेल्वेची बघ रसीद आली"
"बघूं"
"असं द्या. मज कळलें २५
एकसारखा लपवाछपवी"
"उघडकीस ती येईल
सांगायातें सारें अपुले राजीव इथें येतील." २६
राजीवाचें नांव पुन: तूं माझ्यापुढतीं घेतेस ?"
(खरेंच चुकलें, कसें नांव मी 'त्यांचें घ्यावें ?")
"निघतेस- २७
घरांतुनी तूं याच क्षणाला घेउन जा त्या राजीवा"
राजीवाचें नांव ऐकुनी येत सुशीला, "राजीवा, २८
"या हो धांवुन वाट पाहतें, देउळ टाका पाडून
धर्माचें जें सोंग चाललें मुळींच तें मज बघवे न." २९
भालावरती हात ठेउनी भाऊजी मग बसले ते
झालें सारें कांहीं उलटें कसें निस्तरूं आतां तें ? ३०

राजीवाचें कुठुनि कळे ना भूत शिरे हें मम सदनीं
कुलशीलाची अब्रू गेली—मुलगी गेली बिघडूनी ३१
माधव गेला मला तेधवां धक्का जरिही बसलेला
पुन: न आला कधीं उमाळा—परन्तु हा तर ठरलेला। ३२
घडीघडीला माझ्या नशिबीं नवाच धक्का पुढें असे
जिवंत जणुं हा ज्वालामुखिचा पर्वत माझ्या मनिं धुमसे ३३
वाटे गेला सोडुन काळें तोंड करूनी राजीव
अतां जाहलें सर्व यथास्थित सांवरला मी निज जीव ३४
मधें जरा ती बहके अमुची कला म्हणाली एक दिनीं
करी प्रार्थना नेमाने मी तदा वांटलें खरीं गुणी ३५
परी कारटी खटचाळ मजला फसवायाला तसें म्हणे
आणि आज हें बाराशेंचें मूर्तित्रय मी कां घेणें ? ३६
चूकच झाली तिच्याच नांवें उघडुनि दिधली मी बँक
मला वाटलें हिच्यावांचुनी कोण दुजे सांगे हक्क ? ३७
"कले, कले, ये इकडे, झालें काय तुझ्या ग हृदयांत ?
दुर्लौकिक कां व्हावा माझा असें मनाला कां गमत ? ३८
"कुठें स्थापिसी मूर्ति आणुनी ? मन्दिर तूंही बांधियलें ?"
"भाऊजी, मज क्षमा करावी, मघांच सगळे सांगितलें. ३९
राजीवांच्या तोंडुन सगळें कळेल सारें तुम्हां प्रती
मीहि पाहतें वाट—"
कोण ते धांवत तेथें तों येती ? ४०
"भाऊजी, हो झाला आहे सुरसारीं हाहा:कार
राजीवानें कहर मांडिला तिथें सारखा भयंकर. ४१

गोपाळातें बसवुनि दिधलें जीवनरावें जरि स्वस्थ
तरी मागुता येउन त्यानें अम्हांस केलें अस्वस्थ. ४२
लगेच सोडुन गांव निघाला पाहुन जीवन मग फिरले
राममन्दिरीं जाउन त्यांनीं कांहीं खेडुत वळवियले. ४३
पैसे देउन किती जणांना जीवनरावें मिळवीलें
आणि पुनः ते त्यांच्यासवें तिथें जाउनी हो बसले ४४
परी कोठुनी कळे बातमी दुर्दैवानें राजीवा
परतुनि आला तसाच फिरुनी आला धांवुन तो गांवा ४५
एकच केला हल्ला त्यानें जमले सारें भंवताली
जीवन आणिक गौरीदेवी घोळक्यांत त्या सांपडली. ४६
गोपाळानें उगारलेला होता काठीचा हात
पुढतीं बघतां गौरीदेवी परन्तु झाला भयभीत. ४७
धडकन् पडला खालीं गेलीं वदती त्याची तों शुद्ध
किंचाळुनि अन् गौरीदेवी त्याही पडल्या बेशुद्ध ४८
झाला सारा एक मारका जखमी झाला राजीव
तरी निकरानें कांही लढती तोडुनि अपुला ते जीव. ४९
वार्ता आली नाक्यावरती पोलिस तेथें मग आले
केला त्यांनीं गोळिबार अन् लगेच सारें निभावलें ५०
परन्तु त्यांनीं जीवनरावां सांगितलें कीं, भिऊं नका
सध्यां कांहीं दिवस येथुनी राम आपुला नेंऊं नका." ५१
साक्षी झाल्या कांहीं, कांहीं पडले त्यांच्या अटकेंत
जीवनरावहि आले येथें आतांच अपुले आहेत. ५२
परन्तु येणें तुम्हांपुढें त्या अशाप्रमाणें नच रुचतें
म्हणुन आले नाहित येथें—बसले अमुच्या घरींच ते.' ५३

भाऊजी मग सत्वर गेले जीवनरावा भेटाया
कला तेधवां विव्हल झाली जाइल सारें कां वाया ? ५४
"जखम केवढी राजीवांना ?" कला तयांना विचारते
"आहे मोठी बरीच वदती, अम्हांस नाहीं ठावें तें." ५५
धसकन् झाला जीव कलेचा काय करावें म्हणे मनीं
सुखरामातें घेउनि गाडीमधें बसूनी निघे झणीं ५६
आली धांवुन राजीवाच्या खाटेपाशी उभी असे
डोळ्यामधुनी ओघळ तेव्हां एकसारखा येत असे. ५७
राजीवाच्या डोक्यावरची जखम काळजीची होती
राजीवाची वृत्ति परन्तु प्रसन्न तरिही ती होती. ५८
"चलतां कां ? छे: चलाच माझ्यासवें आपुल्या शहरांत"
"हो हो, येइन, अवश्य होइन बरा एक मी दिवसांत." ५९
गाडीमध्यें बसवुनि त्यातें कला घेउनी मग आली
"घरीं न जाणें योग्य, पाहतां आई होइल घाबरली." ६०
असें सांगुनी शूश्रूषेच्या केन्द्रीं नेउनि ठेवी त्या
स्वतां रोज ती करते सेवा अन्त:करणें धडधडत्या. ६१
एके दिवशीं जवळीं बसवुनि वदला तिजला राजीव,
"कले खरोखर निज स्वभावें तूंच शोभसी राजीव ६२
मी तर पुरुषासमान असुनी गेलों पळुनी ग पुरुष
पिता विरोधी असतां दाविसि धैर्य केवढें अमानुष ६३
मीच पातकी उगाच तुजला शिकवत असता सांगितलें
धडे पुस्तकी सोडुन भलतें कशास तुजशीं मी बोले? ६४
जरी वाचसी पुस्तक अपुलें केला असता अभ्यास
पहिला नंबर मिळवुनि दिधला मोद पित्याला असतास ६५

आय्. सी. एस्. चा नवरा तुजला–"
"इश्श, झोप घ्या जरा न्नरें"
तोंड आपुलें वळवुन पुसले तयाचे तिनें करें ६६
कोर्टामधला खटला झाला सुरूं मिळाली तारीख
भाऊजी मग वदले, "जीवन, पाहूं आपण, तो मूर्ख ६७
काय बोलतो, मला वाटतें आपसांत हें मिटवूं या
सारे मिळुनी विचार यावर करून कांहीं पाहूं या." ६८
शब्द ऐकतां जीवनरावा वाटे झालें हें बरवें
ना तर कोर्टामधें निघालें असतें सारें तिथें नवें. ६९
आपण बनवूं खुशाल येथें सगळया अपुल्या जनतेला
आहे अपुला एक पुरावा वैनीचा तो देण्याला ७०
निरोप गेला राजीवातें वदे तदा तो "मज फार,
पसन्त आहे आपसांतला श्रीरामाचा दरबार." ७१
ठरला त्यांचा दिवस जाहले भाऊजी मग अध्यक्ष
दोन चार ते वकील आले तिथें असावीं कीं साक्ष. ७२
आणि निघाली कुलंगडीं तीं एकामागुन एकेक
गौरीदेवी, गोपाळाची, आणि कलेची प्रत्येक ७३
पूर्णपणें ती साक्ष जाहली ठरलें गौरी निर्दोष
जीवनरावें केला सारा आहे येथें हैदोस. ७४
त्यावर वदला जीवन, "केलें मान्य जरी मी हें सगळें
काय सुशीला वैनींचेंही म्हणणें नाही विचारिलें." ७५
भाऊजीही त्यावर म्हणती "अवश्य आणा तिला इथें"
वाटे त्यांना आतां येइल खास पुरावा खरा इथें ७६

राजीवानें गोपाळाची असेल केली बनावट
गौरीदेवी पत्नी क्षणभर म्हणून झालें हें नीट ७७
परन्तु माझ्या घरींच केला राजीवानें पराक्रम
तो तर जाइल कोठें ठरविल राजीवातें निष्काम ! ७८

लगेच पुढतीं आणियलें मग वैनीलाही तिथें तदा
राजीवातें बघतां पुढतीं रडे सुशीलाहि एकदां ७९
भाऊजींनी विचारलें तिज, "बोल सुशीले सर्व खरें
कोण नराधम कुलशीलाची राख करी ही अशी बरें ८०

स्पष्ट सांगुनी टांक एकदां करूं नको तूं संकोच.
राजीवाचें नांव तयाच्या समक्ष घेउनी तूं वाच– ८१
अपुला पाढा दुर्दैवाचा राजीवाच्या शौर्याचा."
परन्तु खालीं पाहत ओघळ गाळी बाला अश्रूंचा. ८२

राजीवाचें नांव ऐकतां उसळुन सारें ती वदते
परी अतां कां शुद्धीवर जणुं खाली बघुनीं ती रडते. ८३
आवरूनी मग आवेगातें वदे सुशीला, "क्षमा करा,
राजीवांवर उगाच दिधला बोल तुम्ही तो नसे खरा." ८४

शब्द ऐकुनी भाऊजी ते विस्मित झाले भयंकर
तेज न उरलें जीवनरावा कां हो तुमच्या मुखावर ? ८५
"काय जाहलें सांग सुशीले स्पष्टपणें तूं चटसारें"
भाऊजी तिज म्हणती त्यांच्या नेत्रीं मुळिही तेज नुरे. ८६

"क्षमा करा मज. झाला माझा खराच आहे अपराध
मीच पातकी-कुळबुडवी मी–मीच करी हो अपराध ८७
जीवनरावें सहजपणानें केली माझ्याशीं सलगी
क्षुधापीडितासमान त्यांच्या चिकटून बसलें मी अंगीं ८८

करिन तुझ्याशीं विवाह म्हणुनी मज वेडीला आश्वसिलें
मी ही वेडी खरें मानुनी बोल तयांचे ते फसलें. ८९
लुटूं दिलें मी जीवनरावा..."
शब्द निघती मग पुढचे
उठुन पळाया लागे जीवन तोंच भाऊजी धरायचे. ९०
"कां हो पळतां आतां कुठवर मजला ऐसे फसवाल ?
मूर्ख अरेरे मीच खरोखर, किती जिवाचे हे हाल ! ९१
गुलाब समजुनि तुला जीवना हृदयाशीं कवटळले
राजीवातें निर्दयतेनें आणि हांकुनी मीं दिधले ९२
भलतें बोलुन गेलों केला भलता असला संहार
यास खरोखर कारण मी हो मीच पातकी खरोखर ! ९३
क्षमा करा मज राजीवा, मी पायां पडतों हो तुमच्या"
गंगा यमुना डोळ्यामधुनी येत सारख्या सकलांच्या ! ९४

कोर्टामधला खटला चालू नवें मिळालें त्या रूप
धागेदोरे सारे जुळले रंग चढे मग त्यां खूप १

येऊं देणें इष्ट वाटलें तितुक्या गोष्टी कोर्टांत
आल्या आणिक चालू झाला खटला साऱ्या वर्षांत ! २

कोण मानतो त्या खटल्याला न्यायनिवाडा कोण म्हणे
पुस्तक पाहुनि होतो जेथें न्याय कोण ही तया म्हणे ! ३

कोर्टामधला खटला चालू जीवन विरुद्ध राजीव
कोर्ट संपतां दोघे दिसती मित्रच जणुं ते आजीव. ४

भाऊजींनीं भरवियला जो श्रीरामाचा दरबार
त्यांत निवाडा झाला सारा जीवन बदले साचार. ५

असो. तेधवां भाऊजींनीं घरीं आणिलें गोपाळा
प्रचण्ड त्याचा नगरामध्यें सत्कारहि मग हो केला. ६

राजीवाची भेट जाहली तदा सुशीला जें वदली
त्या योगें ती भ्रमिष्टतेला विसरुनि अपुल्या मग गेली ७

भाऊजींनीं स्वता जाउनी मूर्तित्रय तें आणविलें
स्वतां तयांनीं मन्दिरांत त्या श्रीरामातें बसवियलें. ८

कोण सोहळा त्या दिवसाचा वर्णावा कुणि तरी कसा?
शब्द न पुरती वर्णावा तो उत्सव केवळ मंगलसा. ९

भाऊजींना सार्थक वाटे अखेर झालें हो अपुलें
पश्चात्तापें परन्तु जीवन हृदयीं अपुल्या कोन्दटले १०

अपराध्याला थोरपणानें क्षमा जिथें ती होत असे
पश्चातापें अपराध्याचें मानस पवित्र होत असे ११

परन्तु झाला न्यायनिवाडा कोर्टामधल्या खटल्याचा
हुकुम जाहला जीवनरावा इतरासम मग शिक्षेचा १२

या बाजूचे अन् त्या बाजूचे मिळून झाले आठ जण
नउ महिन्यांची सजा तयांना दिधली होती ठोकून! १३

जातांना मग जीवनरावें राजीवातें हृदयाशीं
घट्टपणानें धरलें तेव्हां जळल्या पापांच्या राशी ! १४

REFBK-0011267

★●★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११२६७